विकसित व्हावे ! अर्पित होऊनी जावे !!
'स्व'-रूपवर्धिनी

# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त २०२२




**वारसा अमृताचा.. वेध शताब्दीचा...!**

CalCon®

## Our Vision

Our aim is, not to let any process industry, suffer production loss due to non- availability of process measuring instruments.

## Our Purpose

We want to make sure that every process industries instrumentation need shall be catered, with our PROBLEM WIL BE SOLVED, policy.

## Our Mission

To give complete time bound solutions, with competitive price, justifying the value.

Use appropriate technology, backed by committed, efficient and trained technical support team for complete peace of mind of client, to run their operation.

To build long term relationship and trust.
To be among the biggest stockiest of measuring instruments with in-house calibration and certification facility.

**WE ARE SPECIALIZED IN:**

**Calcon Instrumentation & Sales LLC (Calibration Laboratory)**



Pressure | Temperature | Linear | Electrical | Mass

**Calcon Technical Supply & Services LLC (Process Measuring Instruments Trading)**




## OUR SATISFIED CUSTOMERS:

- Dubai Metro (Serco), GE Energy & Power, Nestle, PEPSI, National Oil Well etc...
- Atlantis, Hilton, Taj, Habtoor, Novatel, Ramada, Address Dubai Mall, Federal Foods etc....
- Farnek, Serco, Imdaad, Etisalat, Bk Gulf, Emrill, Lootah BC Gas, Middle Est Fuji, etc....
- Wade Adams, BILT, Imdaad Emmar, Sobha Group, Eagle Electromechanical,






Earning
Trust
Above All...

**Calibration Laboratory**
Calcon Instrumentation & Sales LLC
(ISO9001-2015)
P.O. Box: 119246, Dubai, UAE
Eamil: calibration@calconuae.com
Tel: +971 4 222 8181
Fax: +971 4 222 8141

**Process Measuring Instruments Trading:**
Calcon Technical Supply & Services LLC
P.O. Box: 119246 Dubai – UAE
Email: sales@calconuae.com
Tel: +971 4 22 73 447
Fax: +971 4 2273407

• Pressure • Temperature • Flow • Level • Calibration Services

www.calconuae.com

# ‘स्व’-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २०२२

**संपादक**
श्री. सुनील कुलकर्णी
**संपादकीय मंडळ**
श्री. शिरीष पटवर्धन
सौ. मंजूषा कुलकर्णी
सौ. कोमल धायरकर,
श्री. निखील लोणकर
**दूरध्वनी संपर्क**
श्री. सुनील कुलकर्णी
भ्रमणध्वनी : ९६०४०१६७१५
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) ०२०-२६३३६६०९
(वर्धिनी कार्यालय) - ९०११३८६३८६
किंमत रूपये ५/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/- (विशेषांकासह)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट ‘स्व’-रूपवर्धिनी
या नावाने काढावा.

## अंतरंग

❖ हृद्गत
❖ अध्यक्षीय मनोगत
❖ विशेष लेख
❖ विभागशः वार्षिक वृत्त
❖ आर्थिक आवाहन
❖ दैनंदिन शाखा व प्रकल्पांचे पत्ते

❖ **छपाई** - प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक ‘स्व’-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी, यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

**वार्षिक विशेषांक** **मुखपृष्ठ - श्री. सतीश कुलकर्णी, जिनियस ॲड-मिशन**

# ‘स्व’–रूपवर्धिनी कार्यकारिणी


**सन्माननीय सभासद – ✻ पद्मश्री मा. प्रतापराव पवार ✻ मा. डॉ. प्रमोद चौधरी**

**संस्थापक सदस्य**

✻ कै. पु. व. श्रॉफ ✻ कै. दत्तोबा तांबे ✻ कै. रा. प. देसाई
✻ कै. कृ. ल. पटवर्धन ✻ कै. अ. न. गोगावले ✻ श्री. श्री. शं. सामळ
✻ कै. कां. गि. शहा ✻ कै. कृ. गो. लवळेकर

## विश्वस्त मंडळ

**अध्यक्ष**
पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

**उपाध्यक्ष**
श्री. उदय गुजर, श्री. शिरीष पटवर्धन, श्री. विवेक सावंत

**कार्याध्यक्ष**
प्रा. डॉ. संजय तांबट

**सहकार्याध्यक्ष**
श्री. पराग लकडे, श्री. किशोर सोंडूर

**कार्यवाह**
श्री. विश्वास कुलकर्णी

**कोषाध्यक्ष**
श्री. विलास कुलकर्णी

**सहकोषाध्यक्ष**
श्री. सुमित डोळे

**सहकार्यवाह**
श्री. विनोद बिबवे (शाखा विभाग)
श्री. अमोल उंदरे (युवा आणि व्यावसायिक विभाग)
डॉ. विनेश नगरे (विस्तार प्रकल्प)
सौ. मंजूषा कुलकर्णी (महिला विभाग)

**सदस्य –** श्री. अजय कदम (प्रशासन आणि आस्थापना)
डॉ. सौ. मनिषा नारकर (वर्धिका आणि युवती विभाग)

**विश्वस्त मंडळाचे मानद सदस्य**

✻ श्री. रामभाऊ डिंबळे ✻ श्रीमती पुष्पा नडे ✻ पद्मश्री श्री. मिलिंद कांबळे
✻ श्री. अविनाश धर्माधिकारी ✻ डॉ. श्री. भूषण पटवर्धन ✻ एअर मार्शल(निवृत्त) श्री. प्रदीप बापट

**निमंत्रित सदस्य**

✻ श्री. अशोक शिवले (विस्तार प्रकल्प) ✻ श्री. अरविंद केळकर (विशेष व्यक्तीसंपर्क)
✻ श्री. अद्वैत कुलकर्णी (चऱ्होली प्रकल्प) ✻ श्री. निलेश धायरकर (युवा) ✻ श्री. शुभम जगताप (शाखा)
✻ श्री. करण पाटील (विज्ञान तंत्रज्ञान) ✻ श्री. माधव दाबके (संस्था संपर्क) ✻ श्री. चंदन हायगुंडे (स्पर्धा परीक्षा केंद्र)
✻ श्री. मंदार पोफळे ✻ सौ. दीपाली थोरात ✻ सौ. किरण राठी–भट्टड ✻ सौ. शिल्पा पोफळे–केळकर



**पंजीकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट नोंदणी क्र. :** MAH/588/Pune/80
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.०८३९३०२६० PAN No. : AAATS 5461K**



संपर्काचा पत्ता : – ‘स्व’–रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११.
दूरध्वनी : – (कार्यालय) – मो. :९०११३८६३८६
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (श्री. शिरीष पटवर्धन), ८६००१०१३०७ (श्री. विश्वास कुलकर्णी), ९८२२८२३७५७ (श्रीमती पुष्पा नडे), ९०२९०७४५२१ (श्री. निलेश धायरकर)
ई–मेल : wardhinee@gmail.com वेबसाईट : http://www.swaroopwardhinee.org


**धनादेश ‘स्व’–रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

We have updated 80G, 12A, CSRI, FCRA certificates as per charity commissioner, Ministry of Corporate Affairs and Ministry of Finance's requirements for the trust.

## ‘स्व’-रूपवर्धिनी म्हणजेच

* सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था.
* व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक संस्था.
* आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार.
* विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा.
* राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक ‘राष्ट्रीय प्रकल्प’.
* परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखवणारी, आपुलकी निर्माण करणारी संस्था.
* अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक अनौपचारिक शैक्षणिक प्रकल्प आहे.



कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन
(संस्थापक-‘स्व’-रूपवर्धिनी)
(१९२०-२००४)

राष्ट्रोन्नति एक मात्र ध्यान हेच चालु दे
राष्ट्रजीवनात जीव जीवनान्त पाहु दे ।।

कर्मयोग हा ज्वलंत स्वीकारी तू नितांत
दिव्य तुझ्या हवनातुनि दीपमाळ उजळु दे ।।

# हृदगत

– मा. रामभाऊ डिंबळे

'स्व'–रूपवर्धिनीच्या वार्षिक वृत्ताच्या वेळेला आपणा सर्वांशी संवाद साधण्याचा मी प्रयत्न करत आहे. संवाद म्हणजे कामामागे आपली भूमिका काय आहे, आग्रह काय आहे ते आपल्यापर्यंत पोहोचावे.

वर्धिनी ४० वर्षानंतरच्या या परिपक्व काळात आता राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाला हात घालणारी एक आगळीवेगळी संस्था झाली आहे. प्रारंभीच्या कौतुकाच्या पलीकडे जाऊन आपल्या कामाचा योग्य दिशेने विस्तार करणे आवश्यक आहे. अन्यथा आपण जे काम करतो त्यातील अपूर्वाई संपेल. आपण येत्या २५ वर्षाचा काळ हा कसा बदलणारा आहे, त्या काळामध्ये काय काय घडणार आहे, आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रात कोणते नवे प्रश्न उभे राहणार आहेत, कोणती नवी उत्तरे त्यांना मिळू शकणार आहेत याचा औपचारिकरित्या आढावा घेतला पाहिजे.

आपला हेतू आणि कार्यपद्धती स्पष्ट आहे. आपल्याला समाजामधील उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित घटकातील प्रतिभावंत मुला–मुलींसाठी काम करायचे आहे. त्यांना प्राप्त परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी त्यांच्यात आमूलाग्र बदल करण्यासाठी आपण झटले पाहिजे. बदलाची बीजे पेरणारे शेतकरी म्हणजेच किशाभाऊंच्या शब्दात 'सेवेकरी'. हे सेवेकरी आपल्याला निर्माण करायचे आहेत आणि तेही याच घटकांमधून.

काम करताना समाजात संधीची असमानता सर्वत्र दिसते. पण सर्व गटातील प्रत्येक माणसामध्ये काही क्षमता आहेत; हा शास्त्रीय विचार आपल्या कामाच्या मुळाशी आहे आणि म्हणून निवडलेल्या घटकातील मुलांना आपण घडवतो आहोत, शिकवतो आहोत, सेवेकरी करण्याचा आग्रह धरत आहोत. हे करताना आपण प्रयोग केले पाहिजेत. आपल्याला नवंनवीन कल्पना सुचल्या पाहिजेत आणि ते जर आपण केले तर हे नवीन शास्त्र उदाहरण म्हणून सर्वांना देऊ शकू असे मला वाटते. उदाहरणार्थ प्रत्येक मुलाला समजून घेऊन मार्ग दाखवणारा, त्याच्या प्रेरणा जागृत करणारा, त्याच्यात बदल घडवून आणणारा मेंटॉर – प्रगती पालक, प्रत्येक मुलासाठी जोडला जाणं.

एक नवीन शैक्षणिक योगदान आपण करू शकू ते म्हणजे व्हर्च्युअल क्लासरुम. जिथे अज्ञान आहे, अडचण आहे तिथे झोपडवस्तीतल्या तळ्यातल्या टप्प्यापर्यंत उत्कृष्ट शिक्षणाची, दूरशिक्षण पद्धतीची व्यवस्था आपण पोहोचवू शकतो.

दोन वर्षापूर्वी सुरू केलेल्या अठरापगड विद्यालयाच्या प्रयोगाला पुनश्च सुरुवात व्हायला पाहिजे. आपण गेल्या काही वर्षांमध्ये चऱ्होलीला जे कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र उभे केले आहे त्यामध्ये कौशल्य शिक्षण हा मुलांना आयुष्यात उभं करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग ठरू शकेल हे गृहीत धरून एक यंत्रणा उभी केली हे मोठं यश आहे. याद्वारे एक वेगळा मार्ग मुलांच्या भवितव्यासाठी उपलब्ध झाला आहे. याचा विस्तार व्हायला हवा.

आपण आग्रहपूर्वक असे म्हणत आहोत की सेवेकरी निर्माण करायचे आहेत. या कार्यकर्त्या सेवेकऱ्यांना त्यांच्यापेक्षा उपेक्षित अवस्थेत जगणाऱ्या बांधवांसाठी काहीतरी प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली पाहिजे,

शिकवले पाहिजे. या दृष्टीने आपण गेली पाच-सहा वर्षे कातकरी बांधवांमध्ये काही काम करत आहोत. समाजात सखोल बदल घडवणारे असे काही आपण योजले आहे.

डॉ. माशेलकरांनी ज्या नव्या युगाचा, 'पोस्ट इंडस्ट्रीयलिस्टिक ट्रान्स्फॉर्मेशन'च्या गोष्टी आपल्यापुढे मांडल्या आहेत त्याचा आपण प्रत्यक्षात उपयोग करून घेतला पाहिजे. आपले सगळे उपक्रम नित्य क्रमानुसार चालू आहेत. कार्यकर्त्यांसमोर नवी आव्हाने स्वीकारण्याची उमेद प्रत्यक्षात वाढलेली दिसेल त्या दिवशी आपण फार मोठा टप्पा गाठलेला असेल. मला या टप्प्याची खूप आतुरतेने वाट पहावीशी वाटते.

## मुखपृष्ठाविषयी...

*'वंदे मातरम'च्या जयघोषात अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिवीरांनी आत्मबलिदान दिले. अनेकांनी सत्याग्रह केले, अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि १५० वर्षांनंतर भारतीय स्वातंत्र्याची पहाट उगवली. याला आता पंचाहत्तर वर्षे झाली आहेत. विकासाच्या दिशेने १९४७ साली सुरु झालेला स्वतंत्र भारताचा हा प्रवास आज जगातील एक सामर्थ्यशाली देश मानला जाण्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचला आहे. आपल्या प्राणप्रिय देशाला या गौरवाच्या स्थितीपर्यंत आणण्यामध्ये स्वतंत्र भारतातील अनेक नागरिक, शास्त्रज्ञ, नेतेमंडळी, अनेक क्षेत्रातील प्रज्ञावंत यांचे मोलाचे योगदान आहे.. प्रतिदिन उगवणारा सूर्य आपल्याला प्रत्येक नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठी आशादायी किरणे देतो, शक्ती देतो, मार्ग दाखवतो. भूतकाळात घडलेल्या प्रेरणादायी घटनांचा वसा आणि वारसा घेऊनच आपण स्वातंत्र्याच्या शताब्दीकडे वाटचाल करणार आहोत. मुखपृष्ठावरील मुले याचेच प्रतीक आहेत.*

*गेल्या पंचाहत्तर वर्षात ज्या अनेक संस्मरणीय, प्रेरणादायी घटना आपल्या देशात घडल्या आहेत त्यांची विशेष नोंद या कार्यवृत्ताच्या प्रत्येक पानावरील तळटीपांमध्ये घेतली आहे. यासाठी श्री. अविनाश धर्माधिकारी यांच्या '७५ सोनेरी पाने' या राष्ट्रजीवनाच्या सगळ्या क्षेत्रांचा धांडोळा घेणाऱ्या ऐतिहासिक अशा ७५ यशोगाथांची माहिती देणाऱ्या पुस्तकाचा आधार घेतला आहे.*

२७ ऑक्टोबर १९४७ ला काश्मीरच्या महाराजा हरिसिंग यांनी जम्मू काश्मीर संस्थान भारतात विलीन करण्याच्या करारावर सही केली.

## अध्यक्षीय मनोगत

# ‘भारत @ १००’साठी सप्तसूत्री

**– डॉ. रघुनाथ माशेलकर**

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव सध्या सुरू आहे. आपण ‘इंडिया @ ७५’ साजरा करीत आहोत. त्याचबरोबर आणखी २५ वर्षांनी म्हणजे जेव्हा स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होतील, त्यावेळचा भारत कसा असेल म्हणजेच ‘इंडिया @ १००’ याचीही चर्चा सुरू झाली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत काय केले आणि पुढील पाव शतकात काय करणार आहोत, याची चर्चा नक्कीच व्हायला हवी; परंतु हे करताना देशातील वास्तव लक्षात घ्यायला हवे. आपल्याकडील शहरीकरण वाढत असले तरी बहुतांश लोकसंख्या अजूनही खेड्यांत राहते हे विसरून चालणार नाही. ‘इंडिया’ आणि ‘भारत’ या दोन संज्ञा वेगवेगळ्या अर्थाने वापरणे आपल्याकडे नवीन नाही. त्याचाच आधार घेऊन बोलायचे झाल्यास, असे म्हणता येईल, की ‘इंडिया @ ७५’ ची चर्चा ‘भारत @ ७५’ शिवाय करता येणार नाही. त्यामुळे भारताबद्दलही बोलायला हवे. तसे केले तरच देशाच्या शताब्दीचा व्यापक विचार करता येऊ शकेल.

करोना साथरोगाच्या काळातील आपला अनुभव ताजा आहे. संपूर्ण जगावर हे संकट आले असले, तरी भारताला त्याचा मोठा फटका सहन करावा लागला. विशेषतः येथील गरीबांचे जगणे मुश्कील होऊन गेले. करोनामुळे लाखो बांधव दारिद्र्यात लोटले गेले. वंचना, भेदभाव, बेरोजगार, मानवी अडचणी यात वाढ झाली आहे. देशातील ७०% लोक खेड्यात राहतात आणि १७% लोक झोपडवस्त्यांत राहतात. या सर्वांचा विचार आपल्याला करावाच लागेल. त्यांना विसरून चालणार नाही; त्यांना वगळून देशाची प्रगती होणार नाही; उलट विषमता वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे आपण ‘भारत @ १००’ बद्दल बोलल्याशिवाय ‘इंडिया @ १००’ बद्दल कसे बोलू शकतो ?

**आपल्या स्वप्नातला ‘भारत @ १००’ कसा असेल ? माझ्यासाठी तो पुढील सात तत्त्वांवर आधारित असायला हवा : संतुलित (बॅलन्स्ड), सुसंस्कृत (कल्चर्ड), सुविद्य (एज्युकेटेड), समृद्ध (ॲफ्ल्युएंट), सुशासित (वेल गव्हर्न्ड), सुरक्षित (सिक्युअर्ड) आणि स्वानंदी (हॅपी).**

**※ संतुलित भारत –** आपण संतुलित अर्थव्यवस्था, वातावरण, पर्यावरण, समानता आणि नीती असलेल्या भारताचे स्वप्न पाहू शकतो का ? अशा भारतात संपूर्ण लिंगसमानता असेल. हे आपले अंतिम स्वप्न का असू नये ? वर्गरहित आणि जातरहित भारताचे स्वप्न आपण पाहू शकतो का ?

**※ सुसंस्कारित भारत –** भारताने आपली समृद्ध संस्कृती, वारसा आणि मूल्ये विशेषतः सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता यांचे जतन, संवर्धन आणि प्रसार करायला हवा. असा भारत जो आपल्या धर्मासह इतर धर्मांचाही



स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कणखर नेतृत्वाने १७ सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले – हा दिवस मुक्तीदिवस म्हणून साजरा होतो.

आदर करील. यातील काही मूल्ये अलीकडच्या काळात आपण गमावत असल्याचं पाहून मला दुःख होते.

❋ **सुविद्य भारत –** या भारतात मूल्याधारित शिक्षण असेल. चांगला माणूस घडविण्यासाठी सर्वांगीण शिक्षण असायला हवे.

❋ **समृद्ध भारत –** मध्यम उत्पन्नाच्या सापळ्यातून भारताने बाहेर पडावे आणि आर्थिक उद्दिष्ट गाठावे. त्याच वेळी सर्वसमावेशक प्रगतीचे उद्दिष्टही पूर्ण करायला हवे, जेणेकरून कोणीही मागे राहता कामा नये.

❋ **सुशासित भारत –** भारतात मतैक्य, कायद्याचे राज्य, पारदर्शकता आणि जबाबदारी यांच्या आधारावर शासन चालावे. सर्व लोकशाही मूल्यांचे संरक्षण व्हायला हवे. नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असावे आणि अभिव्यक्त झाल्यानंतर त्याच्या स्वातंत्र्याबद्दल चिंता वाटायला नको.

❋ **सुरक्षित भारत –** अंतर्गत आणि बाह्य बाबतीत भारत सुरक्षित असावा. यामध्ये अन्न सुरक्षा, आरोग्य सुरक्षा आणि ऊर्जा सुरक्षा यांचा समावेश होतो. असमानता, अल्पसंख्यांकांची उपेक्षा वाढल्याने सामाजिक सौहार्द बिघडते आणि समाजात मागे पडलेल्यांची असुरक्षितता वाढते. त्यामुळे सुरक्षित भारताबद्दल सर्वांगीण दृष्टिकोन असायला हवा.

❋ **स्वानंदी भारत –** या भारतात केवळ मूठभर नव्हे, तर सर्व १४० कोटी नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य असावे. अंतर्गत आणि बाह्य शांततेतून हा आनंद यायला हवा.

या प्रत्येक सूत्रांचा विचार केला, तर तुमच्या असे लक्षात येईल की, 'भारत @ १००' आपण गांधीवादी तत्त्वांशिवाय उभारू शकत नाही. आता संतुलित भारताचे उदाहरण पाहू. गांधीजींचा अस्पृश्यतेविरुद्धचा लढा सर्वज्ञात आहे. त्यातूनच वर्गरहित समाजाचा आपला विचार आला आहे. भारतीय महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठीचा गांधीजींचा आग्रहही सर्वज्ञात आहे. त्यातूनच लिंगसमानतेचा विचार महत्त्वाचा ठरतो. प्रत्येकाच्या गरजेनुसार सर्व काही पुरेसे आहे मात्र, हव्यासासाठी नाही असे गांधीजी म्हणत. त्यातूनच प्रेरणा घेऊन अर्थव्यवस्था, वातावरण, पर्यावरण, समानता आणि नीती या पाच मुद्द्यांवर समानतेचा मुद्दा यात मांडला आहे.

गांधीवादी मूल्यांचे संवर्धन, प्रसार आणि अवलंब झाला, तरच या सात सूत्रांच्या अंमलबजावणीत यश येईल असे म्हणता येईल. त्यामुळेच 'भारत @ १००' चे आपले स्वप्न साध्य करण्यासाठीचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतील. सर्व चांगल्या गोष्टींची पुनरावृत्ती व्हायला हवी. निस्वार्थ सेवा हे गांधीवादी तत्त्व आपल्या स्वप्नातील 'भारत @ १००' साध्य करण्यासाठी आशेचा किरण आहे.

**– (या आशयाचा लेख दै. महाराष्ट्र टाईम्समध्ये याआधी प्रसिद्ध झाला आहे. कृतज्ञतापूर्वक त्यातील काही अंश या ठिकाणी छापत आहोत.)**

२६ नोव्हेंबर १९४९ – डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मसुदा समिती सदस्यांनी राज्यघटनेचा अंतिम मसुदा जाहीर केला. (– राज्यघटना दिवस.)

विशेष लेख

## स्वातंत्र्याच्या शंभरीत शिक्षणाची भरारी कुठवर ?

**– डॉ. शरद कुंटे**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने गेल्या ७५ वर्षांत आपण काय प्रगती केली याचा आढावा घेतला गेला. त्या आधारे पुढील २५ वर्षात म्हणजे शतकमहोत्सवी वर्षापर्यंत कोणकोणत्या क्षेत्रात भारताने प्रगतीचा कोणता टप्पा गाठलेला असेल, या संबंधीची चर्चा आता सुरू झालेली आहे. शिक्षण क्षेत्रात येत्या २५ वर्षात कोणते उद्दिष्ट गाठता येईल याचीही चर्चा सुरू झालेली आहे. शिक्षणक्षेत्र हे संपूर्ण समाजाची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आणि आध्यात्मिक पातळी उंचावणारे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे या क्षेत्राची प्रभावी वाटचाल होणे अत्यंत गरजेचे आहे.

येत्या २५ वर्षांत भारताची ६४ % जनसंख्या ही वय वर्षे तीसच्या आतील तरुणांची असणार आहे. त्यामुळे या तरुणांची जडणघडण करणाऱ्या शिक्षण क्षेत्राच्या वाटचालीचे महत्त्व अधोरेखित करावे लागेल. ज्या प्रमाणावर या तरुण वर्गाची जडणघडण या २५ वर्षात केली जाईल, त्याच प्रमाणात भारत विकासाचा अधिकाधिक उंच टप्पा गाठेल हे निश्चित आहे.

**शिक्षण क्षेत्राकडून समाजाच्या अपेक्षा**

शिक्षण क्षेत्राकडून समाजाच्या नेमक्या अपेक्षा तीन मुद्द्यांमध्ये व्यक्त करता येतील.

१) प्रत्येक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. म्हणजे शारीरिक विकास, मानसिक किंवा भावनिक विकास, बौद्धिक विकास, व नैतिक किंवा आत्मिक विकास घडून आला पाहिजे.

शारीरिक विकासामध्ये विद्यार्थ्याची ताकद, दम, सहनशक्ती, दीर्घकालीन काम करण्याचा चिवटपणा, धैर्य, अशा क्षमता विकसित झाल्या पाहिजेत व या बरोबरच त्याचे सर्वसाधारण आरोग्य उत्तम राखले जाणे आवश्यक आहे.

मानसिक अथवा भावनिक विकासामध्ये त्याच्या मनात कुटुंब, शाळा, शिक्षक व मित्र परिवार यासंबंधी आत्मीयता निर्माण झाली पाहिजे. तसेच आपला समाज, आपली भाषा, आपला प्रदेश, आपला इतिहास, आपली परंपरा, आपली संस्कृती, आपला धर्म व आपला देश यांच्याविषयी आस्था निर्माण झाली पाहिजे. या आपलेपणातून त्याला काही ना काही स्वरूपात काम करावेसे वाटले पाहिजे.

मानवी विकासामध्ये विविध बौद्धिक क्षमतांचा विकास अपेक्षित आहे. ज्ञान संपादन करण्याची इच्छा निर्माण होणे, ग्रहणशक्ती वाढणे, मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन करणे, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता प्राप्त होणे, परिस्थितीचे विश्लेषण करून योग्य निर्णय घेणे, पूर्णपणे नवीन निर्मिती करणे यासारख्या क्षमता विकसित व्हायला हव्यात.

आत्मिक प्रगतीमध्ये स्वतःबरोबरच इतरांच्या विकासाचा व इतरांच्या आनंदाचा विचार त्या व्यक्तीला करता आला पाहिजे; तसेच त्यांच्याशी आत्मीयतेचे नाते जोडणे हे सहज घडले पाहिजे. प्रसंगी स्वतःच्या सुखाचा थोडा त्याग करण्याची मनस्थिती निर्माण झाली पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांचा, कुटुंबातील इतर व्यक्तींचा, ज्या संस्थेत आपण काम करतो त्या संस्थेचा विकास व्हावा यासाठी काही परिश्रम करण्याची त्याची मानसिकता असली पाहिजे. निसर्ग जतन करण्याची मानसिकता हा आत्मिक विकासाचाच एक भाग आहे. नागरिकाची सर्व कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडणे हा त्याचा स्वभाव बनला पाहिजे.

२) शिक्षणसंस्थेकडे आलेला प्रत्येक विद्यार्थी सर्व बाबतीत आत्मनिर्भर झाला पाहिजे व त्यांच्या भरवशावर संपूर्ण समाज आत्मनिर्भर झाला पाहिजे.

व्यक्ती आत्मनिर्भर होणे याचा पहिला टप्पा तो स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम होणे हा आहे. नोकरीसाठी आवश्यक त्या गुणवत्ता त्याला शिक्षणातून उपलब्ध झाल्या पाहिजेत. किंबहुना नोकरी करण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय चालवून अनेकांना रोजगार मिळवून देण्याची त्याची क्षमता व मानसिकता असली पाहिजे. अशा आत्मनिर्भर व्यक्तीमुळे त्याचे कुटुंब आणि अशा लक्षावधी आत्मनिर्भर व्यक्तींमुळे संपूर्ण देश आत्मनिर्भर बनतो. देश आत्मनिर्भर होणे याचा अर्थ देश आर्थिकदृष्ट्या, व्यापारीदृष्ट्या, औद्योगिकदृष्ट्या आणि विज्ञान व तंत्रज्ञानदृष्ट्या स्वावलंबी होणे, संरक्षणाच्या बाबतीत सक्षम होणे असा होतो. अशा प्रकारे व्यक्ती व समाजाला स्वावलंबी बनविण्याच्या कामात शिक्षणाची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची आहे,

३) समाजाची प्रगती होणे याचा अर्थ समाजाचा शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक स्तर उंचावणे. भारत हे विकसित राष्ट्र होण्यासाठी समाजाची सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे व या दृष्टीने शिक्षण क्षेत्राची भूमिका अत्याधिक महत्त्वाची आहे.

**प्राचीन शिक्षणपद्धतीचे सामर्थ्य**

प्राचीन काळापासून भारताची शिक्षणपद्धती सर्व विश्वामध्ये सर्वोत्तम मानली जात असे. येथील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी जगभरातून विद्यार्थ्यांची रीघ लागत असे. प्राचीन शिक्षणाची काही मूलभूत वैशिष्ट्ये होती. सर्वात पहिले हे की, छोटी छोटी गुरुकुले प्रत्येक गावात चालत होती, प्रत्येक व्यक्तीला शिक्षण देत होती. स्त्रियादेखील सुशिक्षित होत्या. त्यामुळे आपला समाज जवळजवळ १००% सुशिक्षित होता. शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर अत्यंत आदर्श – म्हणजे १:५ इतके कमी असे. प्रत्येकाची क्षमता लक्षात घेऊन आवश्यक ते व्यावसायिक शिक्षण दिले जाई. सर्वांना एकच सरधोपट शिक्षण अशी पद्धत नव्हती. सर्वांना शिक्षण मोफत उपलब्ध होते. कुणीही बेकार राहत नसे. विद्यार्थ्यांची नैतिक व अध्यात्मिक प्रगती करून घेण्यावर भर असल्याने सर्वसाधारण समाजाची नैतिक पातळी अतिशय उच्च दर्जाची होती. चोऱ्यामाऱ्या किंवा इतर गुन्हेगारीचे प्रमाण अत्यल्प होते.

भारताची शिक्षण पद्धती उत्तम दर्जाची होती, म्हणून भारताची आर्थिक प्रगती सर्वाधिक वेगाने होत होती. १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत जागतिक पातळीवर भारताचा जीडीपी हा २५% हून अधिक होता. इंग्रजांनी जाणीवपूर्वक आणलेल्या शिक्षण पद्धतीमुळे आपल्या देशाला उतरती कळा लागली.

**स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या शिक्षण व्यवस्थेतील उणिवा**

१) सुशिक्षितांची संख्या वाढली; परंतु शिक्षणाची गुणवत्ता घसरली.

२) शिक्षणाला अनुकूल वातावरणाचा अभाव.

३) शिक्षणसंस्थांच्या आर्थिक दुरावस्थेमुळे शाळांच्या इमारती अथवा अन्य शैक्षणिक साधनसामग्री यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली.

१५ ऑगस्ट १९५१ – उच्चशिक्षित, जागतिक दर्जाचे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी खरगपूर येथे पहिली आयआयटी अस्तित्वात आली.

४) शिक्षक संख्या कमालीची अपुरी. ज्या ठिकाणी शिक्षण पोहोचलेच नाही अशी कितीतरी भौगोलिक व सामाजिक क्षेत्रे पूर्णपणे दुर्लक्षित राहिली.

५) विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्याच्या बाबतीत आजची शिक्षणव्यवस्था पूर्णपणे असफल ठरलेली आहे. त्यामुळे बेकारांची संख्या अतिशय झपाट्याने वाढत आहे.

६) चांगल्या दर्जाच्या शिक्षकांचा अभाव आहे. शिक्षकांना समाजामध्ये सन्मानाचे स्थान प्राप्त करून दिले गेले नाही. त्यांच्या प्रशिक्षणाची चांगली व्यवस्था नाही. असलेले शिक्षक आपल्या कामाकडे एक दुय्यम उद्योग या स्वरूपात पाहतात. याचा एकत्रित परिणाम शिक्षणाचा दर्जा खालावण्यात झालेला आहे.

७) शिक्षकांना उत्तम शैक्षणिक साधने उपलब्ध करून गुणवत्ता वाढविणारे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. शिक्षणात 'आयसीटी'चे प्रमाण खूप कमी आहे. शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भडिमार केला जातो.

८) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवायचा आहे, ही दृष्टीच शिक्षकाला आजपर्यंत दिली गेली नाही किंवा त्यासाठी योग्य मार्गदर्शनाची व्यवस्था उत्पन्न व्हायला हवी होती. काय शिकवावे व कोणत्या पद्धतीने शिकवावे याचे स्वातंत्र्य शिक्षकाला दिले गेले नाही. अशा अनेक मूलभूत त्रुटींकडे दुर्लक्ष केले गेले.

९) आजची शिक्षणव्यवस्था सर्व विद्यार्थ्यांना एकाच मापात तोलणारी आहे. विशेष बुद्धिमान विद्यार्थ्यांना वेगळे प्रशिक्षण देऊन त्यांना अधिक प्रगत बनविण्याची कोणतीही व्यवस्था नाही. तसेच इतर विद्यार्थ्यांपेक्षा शारीरिक, मानसिक अथवा सामाजिक कारणांमुळे मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांना आधार देऊन त्यांना शिक्षणक्रमात टिकवून ठेवण्याची कोणतीही व्यवस्था झाली नाही.

१०) केवळ घोकंपट्टीचे शिक्षण देण्याऐवजी व्यावसायिक शिक्षणावर व कौशल्य विकासावर अधिक भर दिला जावा व विद्यार्थी रोजगारक्षम बनविले जावेत हे मूळचे असलेले उद्दिष्ट कधीच प्रत्यक्ष व्यवहारात आणले गेले नाही. असा विकास घडविण्याची सक्षम व्यवस्था ७५ वर्षांत झाली नाही.

११) शाळेतील शिक्षकांनी  कसे शिकवावे याचे प्रशिक्षण देण्याची डीएड किंवा बीएड सारखी काही ना काही व्यवस्था उपलब्ध आहे; परंतु महाविद्यालयीन शिक्षकांना असे कोणतेही प्रशिक्षण दिले गेले नाही. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांच्यात ज्ञानदानाची प्रक्रिया योग्य पद्धतीने होऊ शकलेली नाही.

१२) शिक्षण व उद्योग यांच्यात कोणतेही नाते प्रस्थापित होऊ शकले नाही. त्यामुळे या दोन्ही व्यवस्था परस्परपूरक होऊ शकल्या नाहीत.

१३) धर्म व शिक्षण यांच्यात फारकत करण्याच्या शासकीय धोरणामुळे नैतिक शिक्षणास पूर्णपणे दूर ठेवण्यात आले. त्यामुळे समाजासाठी आपण काही त्याग केला पाहिजे, ही वृत्ती निर्माण होऊ शकली नाही. देशभर पसरलेल्या व्यापक भ्रष्टाचाराचे मूळ या शिक्षणव्यवस्थेतच आहे.

१४) सरकारने शिक्षण हा प्राधान्य विषय मानला नाही. त्यामुळे शिक्षणासाठी पुरेशी आर्थिक तरतूद शासनाने कधीही केली नाही. त्यातून शिक्षण, संशोधन हे दोन्ही विषय मागे पडले

१५) शिक्षणव्यवस्थेमध्ये शासनाची अक्षम्य अशी ढवळाढवळ होत राहिली; शासकीय अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार शैक्षणिक धोरण ठरत गेले व त्यामुळे शिक्षणाकडून असलेल्या कोणत्याही अपेक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण राबविण्यासाठी इच्छाशक्ती हवी**

आजवर शिक्षण विषयात सुधारणा घडवून आणण्यासाठी शासनाने अनेक समित्या नेमल्या; परंतु यातील एकाही समितीच्या सूचना पूर्णपणे अमलात आणल्या गेल्या नाहीत. तशी इच्छाशक्ती शासन दाखवू शकले नाही. २०१४ साली मोदी यांचे सरकार केंद्रस्थानी आल्यानंतर शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्रचनेसाठी नेमलेल्या  कस्तुरीरंगन



ऑक्टोबर १९५१ ते फेब्रुवारी १९५२ – पहिली लोकसभा निवडणूक –
एकूण मतदार १८ कोटींपेक्षा जास्त.

समितीच्या अहवालावरून 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' हे घोषित करण्यात आलेले आहे. या धोरणाची गांभीर्याने अंमलबजावणी झाली, तर स्वातंत्र्यानंतर आपल्या शिक्षणप्रणालीत उद्भवलेले बहुतेक सर्व दोष दूर होऊन विकसित शिक्षणपद्धती निर्माण होऊ शकेल. त्याद्वारे आत्मनिर्भर विद्यार्थी व आत्मनिर्भर समाज उभा राहील. ही प्रक्रिया पुढच्या २५ वर्षात घडून यावी, अशी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या निर्मात्यांची अपेक्षा आहे. असे खरोखर घडून आले तर स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत शिक्षण क्षेत्राची प्रगती कुठवर झालेली असेल, याचे काही ठळक मुद्दे या निमित्ताने आपल्या समोर मांडण्याचा हा एक नम्र प्रयत्न.

शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी अपेक्षेनुसार झाल्यास खालील उद्दिष्टे भारतीय स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत साध्य झालेली आपल्याला पाहायला मिळू शकतील.

१) शिक्षण हा शासनाच्या दृष्टीने प्राधान्य विषय मानला जाईल व त्यासाठी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६% एवढी रक्कम अंदाजपत्रकात नियमितपणे राखून ठेवली जाईल.

२) शालेय शिक्षणातून होणारी गळती शून्यावर येईल. प्रत्येक मुलाला सक्तीचे व उत्तम दर्जाचे शिक्षण मिळेल. दूरस्थ ग्रामीण व वनवासी क्षेत्रेदेखील शिक्षणाच्या प्रभावाखाली येतील. महिलांच्या शिक्षणाविषयी अनास्था दूर झालेली असेल. हिंदू समाजातील विविध मागास, अतिमागास जाती, मुस्लिम समाज यांच्यात शिक्षणाची पुरेशी आस्था निर्माण होईल व हे सर्व समाज घटक सुशिक्षित होतील.

३) साक्षरता याचा अर्थ अर्थसाक्षरता, संगणक साक्षरता, तंत्र साक्षरता, उद्योग व व्यापार क्षमता या दृष्टीने सक्षम सर्व समाज असा झालेला असेल.

४) पायाभूत गटाच्या शिक्षणक्रमातच धर्म शिक्षणाचा अंतर्भाव केला जाईल. व्यक्ती, समाज व पर्यावरण यांच्या समतोल  विकासाची धारणा या पायाभूत गटातच दृढ करता येईल. अशा प्रकारचे संस्कार देणारे शिक्षण या मुलांना दिले जाईल.

५) प्राथमिक शिक्षणापासून मातृभाषेबरोबरच संस्कृत व अन्य भारतीय भाषांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला जाईल. आपला वैभवशाली इतिहास, आपले महापुरुष, आपले प्राचीन वाङ्मय व आपल्या परंपरा यांचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला जाईल. योग, आयुर्वेद, संगीत, अध्यात्म, कुटुंबव्यवस्था या भारतीय संस्कृतीच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा; तसेच आपल्या देशबांधवांच्या कर्तृत्वाचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला जाईल.

६) माध्यमिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाईल.  त्यांना आपल्याला आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य आणि आपल्या विकासाचा मार्ग ठरवण्याची संधी माध्यमिक स्तरापासूनच दिली जाईल

७) शिक्षकांना चांगला पगार, समाजात उत्तम प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हा प्राधान्याचा विषय असेल. शिक्षकांचे नियमित प्रशिक्षण व प्रबोधन केले जाईल.

८) शिक्षण व उद्योगक्षेत्र यांच्यातील सुसंवाद शालेय व महाविद्यालयीन स्तरावरही प्रस्थापित होण्याची प्रक्रिया येत्या पंचवीस वर्षात पूर्णत्वास जाईल.

**या काही गोष्टी घडल्या/केल्या तर अपेक्षित बदल नक्की घडून येतील –**

१) शिक्षण व्यवस्थेचे पूर्ण नियंत्रण शिक्षण तज्ज्ञांकडूनच केले जावे. अन्य सनदी सेवांप्रमाणे 'इंडियन एज्युकेशन सर्विस' सुरू करण्यात यावी. या परीक्षेद्वारे निवडलेल्या व्यक्तींमार्फत शासनाच्या वतीने शिक्षण क्षेत्र नियंत्रित करण्याचे काम व्हावे. गरज पडेल ती मदत उपलब्ध करून देणे एवढाच शासनाचा सहभाग रहावा. कोणतेही अशैक्षणिक काम शिक्षकांवर शासनाकडून लादले जाऊ नये. शिक्षणसंस्थांना त्यांनी काय शिकवावे, कोणत्या पद्धतींनी शिकवावे, त्यासाठी आधारभूत पुस्तके कोणती असावीत यासाठी आवश्यक असलेले पूर्ण

स्वातंत्र्य दिले जावे.

२) संपूर्ण शिक्षण मातृभाषेतून देण्याची व्यवस्था करतानाच अन्य कोणत्याही माध्यमातून शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य पालकांना असावे. सर्व भाषांमधून उच्च शिक्षण घेता येण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा व साधने सर्व वर्गांना उपलब्ध करून दिली जावीत.

३) शिक्षणाची जबाबदारी शासनाची आहे. पण शिक्षण केवळ शासनाने दिले पाहिजे असे नाही. त्यासाठी विविध प्रयोग करण्याची, योग्य शुल्कासह विविध अभ्यासक्रम चालविण्याचे स्वातंत्र्य खाजगी संस्थांना असावे. त्यामुळे शिक्षणक्रमात विविधता येईल, अभ्यासक्रमांची व्याप्ती व खोली वाढेल. देशाच्या सर्व प्रकारच्या गरजा या विविधांगी शिक्षणक्रमातून पूर्ण करणे शक्य होईल. खाजगी संस्थांमध्ये शिक्षण घेताना त्या संस्थांची फी ज्या विद्यार्थ्यांना परवडणार नाही, त्यांना अल्प दराने शैक्षणिक कर्ज सहजपणे उपलब्ध करून देण्याची सुविधा शासनाद्वारे व्हावी. नोकरी लागल्यावर ते कर्ज विद्यार्थ्याने फेडावे. पूर्णपणे स्वतःचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शिक्षणसंस्था योग्य प्रकारे काम करत आहेत, याकडे राष्ट्रीय शिक्षण आयोगाने लक्ष ठेवावे.

१०) समाजाचा फार मोठा वर्ग अशा स्थितीत असेल की, ज्याला शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून दिल्यानंतरही खाजगी संस्थांमध्ये जाऊन शिक्षण घेणे शक्य होणार नाही. अशा वर्गाची पूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी. हे शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यास परवडेल असे शुल्क आकारून किंवा पूर्ण मोफत दिले जावे.

११) शासकीय शिक्षणक्रमात देखील नेमक्या अभ्यासक्रमाची निर्मिती, शिक्षक प्रशिक्षण व तो अभ्यासक्रम राबविणे याची पूर्ण जबाबदारी शिक्षणतज्ज्ञांकडे सोपवावी.

१२) समाजाचा एक मोठा हिस्सा खाजगी संस्थांकडे वेगळ्या प्रकारच्या शिक्षणासाठी जात राहील. त्यामुळे शासनावरील खर्चाचा बोजा आपोआप कमी होईल. येत्या २५ वर्षांत खासगी शिक्षणसंस्था यंत्रणा पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील. अशा संस्थांना अनुदान देण्याची जबाबदारी शासनाने घेऊ नये. शासकीय शाळांचीच आर्थिक जबाबदारी सरकार घेईल अशी व्यवस्था विकसित होईल.

१३) शासकीय विद्यालयांमध्ये उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जावे. शाळेची इमारत, शाळेतील अन्य शैक्षणिक साहित्य व प्रत्यक्ष शिक्षणाची गुणवत्ता याकडे शिक्षणतज्ज्ञांनी लक्ष दिले पाहिजे. शिक्षण या विषयाला शासनाने प्राधान्य दिले, तरच ही गुणवत्ता राखली जाईल व सार्वत्रिक तसेच सर्वोत्तम शिक्षण समाजापर्यंत पोहोचवण्याचे शासनाचे उद्दिष्ट पूर्ण होईल.

१४) उद्योगांनी आपल्या 'सीएसआर'मधून शाळांना आर्थिक मदत द्यावी. महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान द्यावे, व संशोधन कार्यात सहकार्य करावे. महाविद्यालयांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण कोर्सेस सुरू करण्यास मदत करावी. महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये किमान एक वर्ष अनुभव घेण्याची संधी उद्योगांनी द्यावी. यातून कौशल्य प्राप्त कर्मचारी उपलब्ध होतील. चांगल्या कौशल्याच्या विद्यार्थ्यांना उद्योगांनी त्यांच्या नोकरीत सामावून घ्यावे. या बदल्यात त्या उद्योगांना योग्य ती कर सवलत शासनाने द्यावी. उद्योगांच्या विकासासाठी आवश्यक असणारे संशोधन कार्य प्राध्यापकांनी करावे, यासाठी महाविद्यालयांनी प्रोत्साहन द्यावे.

१३) उद्योगांनी महाविद्यालयातच कौशल्य निर्मिती व प्रशिक्षण अभ्यासक्रम चालवण्यास प्रोत्साहन द्यावे. त्यातून महाविद्यालय व उद्योग या दोन्हीच्या कामात सुविधा निर्माण होईल.

१४) व्यवसाय प्रशिक्षण हा शिक्षणाचा गाभा असला पाहिजे. अशा व्यावसायिक शिक्षणक्रमास माध्यमिक स्तरापासूनच प्रारंभ व्हावा. यामुळे गरजू विद्यार्थी आपले शिक्षण चालू असताना अथवा नंतर नोकरी चालू असताना या कौशल्यांचा उपयोग करून जोड उद्योग करू शकतील.



१९५२ च्या ऑलिंपिक स्पर्धेत खाशाबा जाधव यांनी कुस्तीतले ब्राँझपदक पटकावले.

१५) उच्च माध्यमिक स्तरावर ज्यांना भावी आयुष्यात स्वतःचा व्यवसाय उद्योग सुरू करायचा आहे अशा विद्यार्थ्यांचा गट व ज्यांना उच्च शिक्षण घ्यायचे आहे, अशा विद्यार्थ्यांचा गट वेगळा करावा. ग्रामीण भागात शेतीपूरक उद्योग किंवा शेतमालाचे मूल्यवर्धन करणारे उद्योग चालविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जावे. शहरी भागात जवळ असलेल्या मोठ्या उद्योगधंद्यांना आवश्यक असलेली कौशल्ये शिकविण्याचे प्रशिक्षण दिले जावे. या कौशल्य विकासाशिवाय स्वतःच्या आवडीच्या काही विषयांचे शिक्षण घेण्याची मुभा विद्यार्थ्यांना असावी. 'सायबर सिक्युरिटी' हा विषय उच्च माध्यमिक स्तरावर सर्वच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असला पाहिजे.

१६) उच्च शिक्षणक्रमामध्ये संशोधन विषयास प्राधान्य असले पाहिजे. ज्या विद्याशाखेत विद्यार्थी प्रशिक्षण घेत असेल, त्या शाखेमध्ये काही ना काही संशोधन करण्याची पात्रता त्या विद्यार्थ्यांमध्ये यावी. आपल्या विद्याशाखेमध्ये जगभरात कोणत्या प्रकारची प्रगती चालू आहे ते जाणून घेण्याची दृष्टी त्या विद्यार्थ्याला यावी. प्रत्येक गोष्ट वर्गात शिकविली जाण्यापेक्षा विद्यार्थ्याला स्वतःहून शिकता येईल, असे वातावरण व व्यवस्था उच्च शिक्षण संस्थांमधे निर्माण केली जावी.

१७) दूरशिक्षण पद्धतीस अधिकाधिक प्रोत्साहन दिले जावे. ज्या ठिकाणी प्रत्यक्ष प्रयोग करण्याची आवश्यकता आहे, विशिष्ट उपकरण वापरण्याची आवश्यकता आहे, अशा कामासाठीच महाविद्यालयात जावे. दैनंदिन व्याख्याने, चर्चासत्रे, दूरशिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येतील. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासणे, विद्यार्थ्यास पुढील अभ्यासासाठी योग्य दिशा देणे, यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याचा व शिक्षकांचा समोरासमोर संवाद होणे आवश्यक आहे. हा संवाद महाविद्यालयातच आयोजित केला जावा. प्राध्यापकांचे हेच प्रमुख काम असावे. यातून त्या विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वास आकार देणे व विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे योग्य मूल्यमापन करणे हेही शक्य होईल.

१८) शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तके अभ्यासणे नव्हे. त्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा, इतर व्यायाम प्रकार, विविध कला, नाट्य, वक्तृत्व, यांच्या स्पर्धा शाळा व महाविद्यालयांमध्ये आयोजित केल्या गेल्या पाहिजेत व या स्पर्धांमध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होतील याकडे शिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे.

१९) मूल्यमापन पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल केला जावा. विषयाचे ज्ञान, उपयोजन व नवीन निर्मितीसंबंधी विद्यार्थ्यांच्या कल्पना स्पष्ट होतील अशा प्रकारचे मूल्यमापन असावे आणि ते संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या टप्प्यांवर केले जावे. विद्यार्थी वर्षभर विविध उपक्रमांमध्ये किती प्रमाणावर सहभागी होतो, त्यापैकी कोणत्या उपक्रमांमध्ये तो विशेष कौशल्य प्रकट करतो, त्याचे इतर मित्रांबरोबर व शिक्षकांबरोबर वर्तन कसे असते हाही भाग मूल्यमापनात असावा. विद्यार्थ्याला त्याने मिळवलेल्या यशाच्या प्रमाणात श्रेयांक (क्रेडीट) देऊन ठराविक संख्येची श्रेयांक (क्रेडिट) पूर्ण केल्यावर वरच्या वर्गामध्ये प्रवेश दिला जावा. अनुत्तीर्ण ही संकल्पना मागे पडेल, कारण सर्व विषयांमध्ये सारखे कौशल्य मिळवणे प्रत्येकालाच शक्य होत नाही. एखाद्या विषयात विशेष प्राविण्य विद्यार्थी मिळवू शकत असेल तर त्याला त्या आधारावर वरच्या वर्गांमध्ये जाण्याची संधी देण्याचे धोरण आखले जावे. ज्या विषयात गती नाही, तो विषय बदलण्याची सुविधा नव्या धोरणात असावी.

२०) देशातील/जगभरातील विविध घडामोडींचे यथार्थ ज्ञान व्हावे यासाठी कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, राजकीय व जागतिक घडामोडींवर आधारित विविध चर्चासत्रांचे आयोजन महत्त्वाचे ठरेल.

**भारत ज्ञानशक्तीतील महासत्ता बनला पाहिजे**

आगामी काळ हा ज्ञानाधारित विकासाचा असणार आहे. शिक्षण हे ज्ञानविज्ञान क्षेत्रात भारताला सर्वश्रेष्ठ

१९५३ मध्ये कलकत्त्याच्या इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटने तत्कालीन प्रमुख प्रसिद्ध संख्याशास्त्रज्ञ पी. सी. महालनोबिस यांच्या मार्गदर्शनाखाली पहिला 'ॲनलॉग कॉम्प्युटर' तयार केला.

बनविण्याचे प्रभावी साधन आहे. ज्ञान क्षेत्रात भारत महासत्ता बनेल, तर त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून विज्ञान-तंत्रज्ञान, आर्थिक, व्यापारी व संरक्षण क्षेत्रातही तो महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे येत्या २५ वर्षांत आपली शिक्षण व्यवस्था ज्ञानशक्तीचे प्रभावी केंद्र बनविण्याच्या उद्देशाने विकसित केली जावी. याकरता केंद्र व राज्य शासन, विविध संशोधन केंद्रे व देशातील प्रमुख औद्योगिक संस्था यांना एकत्रित येऊन नियोजन करावे लागेल. आपल्या देशातील त्या त्या क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना विदेशामध्ये अभ्यास दौऱ्यावर पाठविणे तसेच विदेशांतील त्या त्या क्षेत्रातील प्रथितयश व्यक्तींना आपल्या शिक्षणसंस्थांमध्ये येऊन मार्गदर्शन करण्यास संधी देणे हा एक नित्य चालणारा उपक्रम असावा लागेल. देशाच्या सामाजिक, आर्थिक समस्या सोडविण्याच्या दिशेने सकारात्मक बदल घडविणाऱ्या प्रत्येक प्रयत्नास, संशोधनास मोठे पारितोषिक देऊन उत्तेजन देण्याचे धोरण राबवावे लागेल.

व्यापार व उद्योगाच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी आपले शिक्षण हे जगभरातील विविध देशांना ज्ञान निर्यात करण्याच्या क्षमतेचे बनले पाहिजे. पूर्वीप्रमाणे जगभरातील विद्यार्थी आपल्या विद्यापीठांमध्ये शिकण्यासाठी यावेत यासाठी विविध ज्ञानशाखांचा उत्तम विकास करावा लागेल. तसेच आपल्या देशातील उत्तम प्राध्यापक जगभरातील इतर विद्यापीठांमध्ये शिकविण्यासाठी जातील, तसेच आपल्या शिक्षणसंस्था विविध देशांमध्ये प्रस्थापित होऊन ज्ञानदानाचे काम प्रभावीपणे करतील यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. शिक्षणाचे असे निर्यात धोरण स्वीकारल्याने भारताची जगभरात प्रतिमा उजळेल, भारतीय संस्कृतीचाही जगभर प्रचार-प्रसार होईल व यातून भारताच्या अर्थव्यवस्थेला ही मोठा आधार प्राप्त होईल. येत्या २५ वर्षांत आपण या उंचीपर्यंत आपली शिक्षण व्यवस्था नेऊ, असा मला विश्वास वाटतो.

- (डॉ. शरद कुंटे हे पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी यापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-क्षेत्रीय बौद्धिक प्रमुख, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रांत-सहमंत्री, एकता मासिक न्यास-अध्यक्ष या पदांवर काम केले आहे. त्याचबरोबर बापूराव दाते चरित्र, अमरनाथ आंदोलन गाथा, कर्मयोगी अब्दुल कलाम, शिक्षणाचे भारतीयीकरण अशा अनेक पुस्तकांचे लेखन केले. तसेच २०२० च्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे ते सखोल अभ्यासक आहेत)



जानेवारी १९५४ - मुंबईच्या तुर्भे येथे ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट स्थापन झाली.

# उज्ज्वल उद्या तरी...

– सौ. नयना सहस्त्रबुद्धे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना मा. पंतप्रधानांनी अमृतकालाची संकल्पना मांडली. येत्या २५ वर्षात भारत कोणत्या स्तरावर, उंचीवर पोचेल याबद्दलचं चिंतन, संकल्पचित्र त्यांनी मांडले किंवा समाजाने ते पाहावे, मांडावे असे आवाहन त्यांनी केले. महिला क्षेत्रात काय घडेल याचे कल्पनाचित्र मात्र संमिश्र दिसते, काळ्या, पांढऱ्या व राखाडी रंगाने भरलेले !

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेल्या प्रगतीत महिला सशक्तीकरणाचा मोठा पल्ला आपण गाठलेला आहे, तरीही महिला सुरक्षा, समानता, सर्व क्षेत्रात महिलांची भागीदारी व सामिलकी यांच्या पातळींवर बराच पल्ला भारताला व जगालाही अजून गाठायचा आहे. समानतेचं प्रतिमान म्हणून जर आपण लिंग समानता (जेंडर इक्कालिटी इंडेक्स) निर्देशांकाकडे पाहात असू, तर भारताचा १४६ देशांच्या गटात १३५ वा क्रमांक आहे, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. जेंडर समानतेच्या दृष्टीने विचार केला तर स्त्री चळवळीच्या यशानंतर बरंच अंतर जग चालून आले आहे; पण शाश्वत विकास लक्ष्य क्र ५ चे उद्दिष्ट २०३० मध्ये तरी दृष्टीपथात दिसत नाही. गेल्या ७५ वर्षात शिक्षणाच्या क्षेत्रात आपण उत्तम गती घेतली, ती गाडी आता पुढेही पळत राहील. सांख्यिकी आयोगाच्या २०१७-१८ च्या अहवालानुसार साक्षरतेचं प्रमाण ७८% तर महिला साक्षरतेचं प्रमाण ७०% आहे. येणाऱ्या काळात शालेय व शालान्त शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणामध्ये महिलांचे प्रमाण व क्षमता विशेषत: विज्ञान-तंत्रज्ञान-संशोधन क्षेत्रात तसेच नोकरी व्यवसायातही वाढतील. अन्य सर्व क्षेत्रांत मात्र महिला सहभागाची टक्केवारी आजही १० ते २५% च्या आसपासच दिसते, क्षेत्र राजकारणाचं असो, खेळ असो, नोकरी असो , स्वतंत्र व्यवसाय असो किंवा कामगार क्षेत्र!

राजकारणात लोकप्रतिनिधी म्हणून समान संधी मिळत नसली तरी, आरक्षण, एकूणच समानतेबाबत होणारी चर्चा व प्रयत्न, माध्यमांचा प्रभाव, अदृश्य भिंती तोडून श्रेष्ठ कामगिरी करणाऱ्या स्फूर्तिस्थाने बनलेल्या स्त्रिया यामुळे महिलांचे मतदानाचे प्रमाण वाढत आहे. पती, परिवार वा धर्म-जात यांच्या प्रभावाशिवाय स्वतंत्र मतदान करण्याचे प्रमाणही वाढत आहे, हे सुचिन्ह आहे. यावरून महिला सक्षम होत असल्याचे दिसते व मतपेटीतून धोरणात्मक बदल व सत्ता परिवर्तन करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त होत आहे. त्याच्या जोरावर येत्या २५ वर्षात आज दिसणारी सहभागाची, संधींची कमतरता त्या भरून काढू शकतील, निर्णय प्रक्रियेतला असमतोल दूर करू शकतील हे आश्वासक चित्र स्पष्ट दिसत आहे.

खेळाच्या क्षेत्रात महिला उत्तम कामगिरी करत आहेतच, जागतिक पातळीवर त्या पोचतील, व यशस्वी होतील. विज्ञान तंत्रज्ञान , संशोधन, राजकारण, अंतरिक्ष, सैन्यदले, नवोन्मेषी व्यवसाय, व्यापार, परराष्ट्रनीती सर्व क्षेत्रात महिलांनी प्रवेश केला आहे, पदे मिळवली आहेत व प्रभावही टाकला आहे. स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत अमृतकाल बहरायला नि:संशय पोषक अशी समाजस्थिती आहे. गाडी सुरू आहे, तिची गती वाढेल.

सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रात मात्र भारत आज भेलकांडताना दिसतो आहे. आगामी २५ वर्षांत ती आव्हाने अधिक गंभीर होतील. जागतिकीकरणानंतर कुटुंबांचा आर्थिक, सामाजिक, वैचारिक व संस्कारांचा पोत बदलला आहे. त्याचा सर्वात जास्त परिणाम स्त्रियांवर व कुटुंबसंस्थेवर होईल. समाजाची आर्थिक क्रयशक्ती वाढली; पण सुबत्ता वाढली का, हा प्रश्न आहे. जागतिकीकरणाने महिलांनाही अमाप संधी दिल्या; पण मूल्यव्यवस्थेचा पाचोळा केला. गळेकापूस्पर्धा, जीवघेणी लक्ष्ये, ती गाठण्यासाठी काहीही व सर्व काही करणे त्यात व्यावसायिक नीतिमत्तेचा (बिझनेस एथिक्स), सामाजिक नीतिमत्तेचा, पर्यावरणाचा, कौटुंबिक समाधानाचा बळी गेला आहे. बहुतेक सर्वांची मानसिकता स्वकेंद्री, स्वार्थी, भौतिक सुखाच्या मागे जाणारी, यशाला तीच ती ढोबळ आर्थिक परिमाणे लावणारी झाली आहे. जगाचे सपाटीकरण झाले आहे. कपडे, खाद्यवस्तू व पद्धती, कार्यपद्धती समान होत

१ जुलै १९५५ पासून 'स्टेट बँक ऑफ इंडीया' अस्तित्वात आली.

चालली आहे. त्यातून समान व सपाट विचारपद्धती व मूल्यव्यवस्था आकाराला येत आहे. त्यात भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये, परंपरा व वैचारिक बैठक लयाला गेली आहे. शारीरिक व मानसिक आरोग्याचे प्रश्न उभे राहिले आहेत. वृद्ध व लहान मुलांच्या संगोपनाचे प्रश्न, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न भेसूर झाले आहेत.

शिक्षण, नोकरीमुळे स्त्रिया आत्मनिर्भर झाल्या असल्या, तरी पुरुषांच्या पारंपरिक मानसिकतेत व दृष्टिकोनात तेवढा बदल होताना दिसत नाही. माध्यमे हिंसा व लैंगिकतेला खतपाणीच घालताना दिसतात. नीतिमत्तेचे बंध सैलावलेले दिसतात. स्वनियमनाचा विचारच उरलेला नाही. अशा काळात समाजाची वाटचाल पाशवी मार्गावर होत आहे. स्त्रियांना हिंसेला तोंड द्यावे लागत आहे. धनदांडगे देश, काही देशांची युद्धखोर भूमिका, दहशतवाद, हिंसा, शस्त्रास्त्रे निर्माण करणाऱ्या बलाढ्य कंपन्या, धार्मिक उन्माद व ध्रुवीकरण, भ्रष्टाचार अशा अनेक घटकांची अभद्र युती झालेली आहे किंवा प्रसंगोपात होत राहते. यांत महिला लक्ष्य ठरत आहेत, बळी पडत आहेत. त्यामुळे असुरक्षित असलेली स्त्री अधिकच असुरक्षित होईल. त्याचा परिणाम स्त्रिया, कुटुंबव्यवस्था व समाजावर होईल. कारण स्त्रियांचे प्रश्न हे त्यांचे वा 'स्त्री' गटाचे प्रश्न नाहीत; तर सर्व समाजाचे प्रश्न आहेत.

स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवाच्या आसपास सामाजिक जीवन नवविचार व चळवळींनी भारलेले होते. स्त्री चळवळ, कामगार, पर्यावरण, ग्रामविकास, विज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन, विद्यार्थी चळवळ या त्यातल्या महत्त्वाच्या चळवळी. सपाटीकरणाच्या काळात अनेक चळवळी आता मंद झाल्या; येत्या काळात त्यांच्या पुढेही काळसुसंगत राहण्याचे मोठे आव्हान असेल. स्त्री चळवळीने हाती घेतलेले हुंडा, असमानता, कौटुंबिक हिंसाचार हे प्रश्न संपलेले नाहीत पण जगण्याच्या वेगापुढे समाजाकडून मिळणारा प्रतिसाद कमी होतो आहे. मात्र, नवे-जुने स्त्रियांचे प्रश्न सोडवायचे; तर सर्वांचा सक्रीय पाठिंबा गरजेचा आहे.

आजही स्त्रिया व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर आहे. शारीरिक, लैंगिक हिंसा करून नंतर जीवे मारून टाकण्याच्या किती तरी बातम्या येतात. येत्या २५ वर्षात जेंडर सुरक्षिततेचा प्रश्न अजूनच गंभीर रूप धारण करेल. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्व-संरक्षणक्षम, सक्षम बनवायला हवे आहे.

तंत्रज्ञानाचे खाजगी अवकाशावर झालेले आक्रमण हे अनेक प्रश्नांना जन्म देत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने, यंत्रमानवाने जीवन सोपे, तरीही जटिल केले आहे. आता तर जर्मनीने कृत्रिम गर्भाशयाचे तंत्रज्ञान व 'जेनेटिकली इंजिनियर्ड डिझायनर बेबी', - ''हवे तसे मूल'' जन्माला घालण्याचं तंत्रज्ञान विकसित केलं आहे. बिल गेट्सने मातेचे स्तन्य दूध निर्माण करणाऱ्या प्रयोगशाळेत गुंतवणूक केल्याचे वाचनात आले. म्हणजे या क्षेत्रातली स्त्रियांची 'नैसर्गिक' मक्तेदारीही निकाली निघेल. यंत्रमानव काम करेल, एकट्या व्यक्तीला कंपनी रोजगार देईल. कृत्रिम बुद्धिमत्ता सिनेमाची पटकथा लिहील, कल्पनाशक्ती वापरायच्या ऐवजी नोटिफिकेशन पाठवून विचार क्षमता, कार्यक्षमताच संपवून टाकेल की काय, अशी साधार भीती वाटते.

'सर्वे भवन्तु सुखिनः' ही भारताची मूळ वैचारिक बैठक! त्यात सर्व समावेशक दृष्टीकोन, सहभाग, सुसंवाद, सहवेदना, दान, संपत्तीत समाजाचा वाटा, अडलेल्याला मदत अशा भावभावना गुंतलेल्या असतात. परस्पर अवलंबित्वातून आलेलं साहचर्य (फक्त सक्ती नव्हे) व सहकार्य यांवर कुटुंब व समाजरचना, मानव व निसर्गरचना अवलंबून असते. एकमेकांच्या हिताचा, रक्षणाचा, संवर्धनाचा, पूरकतेचा विचार त्यात आहे. या आव्हानांचा विचार केला नाही तर इंटरनेट व गॅजेट्सनी जोडलेला, पण प्रत्यक्षात माणसांपासून तुटलेला समाज आणि घर, नाती व आजही कुटुंबाचा केंद्रबिंदू असलेली स्त्री भोवंडून जाईल. सुवर्णकाळात भारताला परम वैभवापर्यंत घेऊन जाणे हेच आव्हान व जबाबदारी आहे.

- (सौ. नयना सहस्त्रबुद्धे - 'स्त्री भान' पुस्तकाच्या लेखिका, भारतीय स्त्री शक्तीच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष व सध्या बँक ऑफ महाराष्ट्र, दिल्ली मध्ये सहाय्यक महाव्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत.)



१९५५-५६ - हिंदु कोड बिल लोकसभेत संमत.

# केंद्रिय कार्यक्रम




स्वातंत्र्यदिन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना
श्री. विवेक देशपांडे



वर्षारंभ उपासना



गणेशोत्सव पथनाट्य



मल्लखांब प्रात्यक्षिक सादरीकरण



कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, चऱ्होली

# शाखा विभाग



वार्षिक क्रीडादिन



वर्धक विभाग - उन्हाळी शिबिर



स्थळभेट



वर्धिका विभाग - उन्हाळी शिबीर



वर्धक विभाग - हिवाळी शिबिर



क्रीडादिन विजयी वर्धक, डॉ. विनेश नगरे यांच्या समवेत

# युवा विभाग



युवक शिबिर २०२२



आसाम अभ्यास दौरा



गड मोहिम



निर्मल वारी – विशेष उपक्रम



नवरात्रोत्सव विशेष कार्यक्रम




मासिक प्रबोधन वर्ग

# उत्थान विभाग
# फिरती प्रयोगशाळा



१० वी १२वी यशस्वी विद्यार्थी सत्कार



कार्यकर्ता मासिक प्रशिक्षण वर्ग



लोहगड सहल



प्रयोगशाळा - गुणवंत विद्यार्थी सत्कार



ग्रामीण भागातील शाळेत सत्र घेताना



शिष्यवृत्ती वाटप

विस्तार विभाग

# विस्ताराचे नवे क्षितिज : चऱ्होलीतील कौशल्य विकास केंद्र

गेल्या ४२ वर्षांपासून एक कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाचा होत आलेला विस्तार जवळून पाहण्याचा आणि या विस्ताराच्या सर्व टप्प्यांत छोट्या–मोठ्या भूमिका घेत सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. मंगळवार पेठेत वर्धिनीची पहिली शाखा सुरू झाली, कै.किशाभाऊ पटवर्धन सर, कै. राजाभाऊ लवळेकर सर यांच्यासारख्या शिक्षणक्षेत्रातील अनुभवी संस्थापक कार्यकर्त्यांच्या विचारातून. शाखेतील वर्धकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक कार्यक्रमांची रचना उभी राहू लागली. निवासी शिबिरे हा त्यातील एक उपक्रम. १९८१ साली मुंबई येथे झालेल्या प्रवासी/निवासी शिबिराच्या निमित्ताने मुंबई दूरदर्शन केंद्र बघायला वर्धकांना नेले होते. वर्धिनीच्या कामामागचा विचार ऐकून तेथील अधिकाऱ्यांनी आलेल्या कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांची एक मुलाखतच घेतली आणि प्रसारित केली. ती पाहून श्रीमती कुंतीताई मुजुमदार यांनी संपर्क केला आणि त्यांच्याशी झालेल्या अनेक भेटी व गप्पांमधून वर्धिनीची दुसरी शाखा सुरु झाली. पर्वतीच्या उतारावरील झोपडीधारकांना पुनर्वसनासाठी बिबवेवाडीमध्ये पुणे महानगरपालिकेने ओटे बांधून दिले. महापालिकेतील एका अधिकाऱ्याने कै.किशाभाऊ पटवर्धन सर यांना सांगितले की, आपण जे काम करीत आहात त्याला उपयुक्त अशी एक वस्ती नव्याने बिबवेवाडीत उभी राहत आहे आपण त्या ठिकाणीही काम सुरू करावे. या टप्प्यांवर कै. दि. दा. जोशी सरांच्या मार्गदर्शनाखाली तिसरी शाखा सुरू झाली आणि हळूहळू वर्धिनीच्या शाखा विस्ताराचे एक नियमित चक्रच सुरू झाले. त्यातून आज १६ शाखा कार्यरत झाल्या आहेत. कै. दि. दा. जोशी, कै. वसंतराव दाते, कै. रा. प. देसाई, श्री. रघुनाथ नरवणे सर, श्रीमती कुंतीताई मुजुमदार, श्रीमती चंद्राताई दलाया अशा अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी या शाखा विस्तारामध्ये, शाखा स्थिर करण्यामध्ये आणि त्यातून लहानाचे मोठे होणाऱ्या वर्धकांना घडवण्यात मोठे योगदान दिले. युवक–युवती कार्यकर्त्यांची फळी त्यातून उभी राहिली आहे आणि सातत्याने त्यात वाढ होत आहे.

**अडचणीतून विस्ताराच्या दिशेने...**

पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने महापालिकेच्या शाळांमध्ये वर्धिनीच्या शाखा सुरुवातीपासून भरत होत्या. परंतु शाखेसाठी दिलेल्या शाळेची परवानगी महानगरपालिकेने अचानक रद्द केल्याने १९८१ ते १९८३ या कालावधीत वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील शाखेला जागाच उपलब्ध नव्हती. त्यामुळे रोजची शाखा भरवताना खूप कसरत व्हायची. त्या वेळी सर्व संस्थापक विश्वस्त सक्रीय होते आणि त्यामुळे त्यांनी निर्णय केला की, वर्धिनीला स्वत:ची जागा मिळवू आणि तिथे संस्थेचीच वास्तू निर्माण करू. तेव्हाचे उपाध्यक्ष कै. अण्णासाहेब गोगावले यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू झाली आणि १९८५ मध्ये वर्धिनीला मंगळवार पेठेतच एक भूखंड मिळाला. त्याच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण झाला आणि संस्थेची स्वत:ची वास्तू उभी करण्याच्या संकल्पाला गती मिळाली. कोणतेही कर्ज न घेता वर्धिनीने १९८८ मध्ये दोन मजले आणि १९९३ मध्ये उर्वरित दोन मजले बांधून व्यक्त केलेला संकल्प विश्वस्तांनी सिद्धीस नेला. ५००० चौरस फुटाच्या भूखंडावर सुमारे ८००० चौरस फूट जागा वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी उपलब्ध झाली. यासाठी वर्धिनीच्या प्रत्येक विश्वस्ताने निधी संकलनासाठी केलेल्या व्यक्तिगत प्रयत्नातून आणि विशेषत: कै.किशाभाऊ पटवर्धन सरांनी मुंबईला सातत्याने जात नवे नवे देणगीदार मिळवत संकलित केलेल्या मोठ्या निधीमुळे प्रकल्प पूर्णत्वाला गेला. या वास्तुमुळे संस्थेच्या विस्ताराला एक गती मिळाली.

१९८८ पासून मग नवे नवे विषय हाताळायला आता संधीही होती आणि हाताशी हक्काची स्वत:ची जागाही.

त्यामुळे पाहता पाहता बालवाडी, मुलींची पहिली शाखा, दुपारच्या वेळात घरी एकट्या असणाऱ्या मुलामुलींसाठी आजोळ प्रकल्प, स्वयंअध्ययन केंद्र, माता बाल संगोपन केंद्र, गरजू महिलांसाठी शिवणवर्ग, होम नर्सिंग अभ्यासक्रम, साक्षरता वर्ग, बचत गट असे किती तरी उपक्रम टप्प्याटप्प्याने सुरु झाले, विस्तारले आणि मंगळवार पेठेतील वास्तू गजबजून गेली.

१९९६ मध्ये विज्ञानभारतीच्या मदतीने आणखी एक पाऊल वर्धिनीने टाकले आणि ते होते फिरती प्रयोगशाळा प्रकल्पाचे. पुण्याभोवतीच्या, विशेषत: मुळशी खोऱ्यातील अनेक खेड्यांमधील शाळांसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरला. हजारो विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानावरचा विश्वास रुजवता आला. प्राज लिमिटेड कंपनीने दिलेल्या जीपमुळे हा प्रकल्प गतिमान आणि परिणामकारक व्हायला खूप मोलाची मदत मिळाली. आज हा प्रकल्प मुळशी, हवेली, मावळ, सासवड, वेल्हे अशा अनेक तालुक्यांमध्ये विस्तारला आहे.

२००० साली स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले. आज या केंद्राचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातील गरजू पदवीधर युवक–युवती येत आहेत. आजवर झालेला हा विस्तार आश्वासक, उत्साहवर्धक आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र– चऱ्होली**

आजवर झालेल्या बहुतेक प्रकल्पांचे काम, तयारी प्रामुख्याने वर्धिनीच्या मंगळवार पेठेतील वास्तूमधून चालते आहे. चालू असलेल्या प्रत्येक प्रकल्पाचा विस्तार होणे शक्यही आहे आणि आवश्यकही. परंतु या वास्तूत आता कोणत्याही प्रकल्पाचा/ उपक्रमाचा विस्तार होणे अवघड आहे. १९८९ सालापासून गरजू मुली व महिलांसाठी जे उद्योग प्रशिक्षण वर्ग सुरू झाले. त्यातून महिला स्वावलंबी तर होत होत्याच पण त्या त्यांच्या त्यांच्या घराच्या खऱ्या अर्थाने कर्त्या झाल्या. त्यामुळे कुटुंब–घरे कशी बदलतात हे शेकडो उदाहरणांतून प्रत्यक्ष अनुभवता आले. त्यामुळे विश्वस्तांच्या, विशेषत: कै. किशाभाऊ आणि कै. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांच्या मनात असे सातत्याने येत होते की मुली आणि महिलांच्या उद्योग शिक्षण–प्रशिक्षणासाठी एक स्वतंत्र वास्तूच असायला हवी. म्हणजे भरपूर कोर्सेस सुरू करता येतील आणि शेकडो घरांतील महिलांना स्वावलंबी होण्यासाठी मदत करता येईल असा संबंधित विश्वस्तांनी संकल्प केला आणि एका विश्वस्तांनी चऱ्होली येथे भूखंड उपलब्ध करून द्यायचे मान्य केले. त्या दिशेने काम चालू असतानाच आकस्मितपणे या विश्वस्तांचे दु:खद निधन झाले. स्वतंत्र वास्तूचे स्वप्नं अर्धवट राहणार, अशी स्थिती निर्माण झाली. २००४ साली संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन सरांचे वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले. २००७ साली वर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष कै. पुरुषोत्तमभाई श्रॉफ असे म्हणाले की, आम्ही जे स्वप्नं पाहिलं आहे ते पूर्ण करण्याची जबाबदारी पण आमचीच आहे आणि संस्थेचा अध्यक्ष या नात्याने हे स्वप्न साकारण्यासाठी मी माझी स्वत:ची चऱ्होली येथेच असलेली एक एकर जागा वर्धिनीला दानपत्राने देतो आहे. दानपत्राने त्यांनी त्यांची जागा दिली आणि महिलांसाठी एक स्वतंत्र उद्योगशिक्षण केंद्र उभारणीच्या स्वप्नाने पुन्हा एकदा उभारी घेतली.

जागेसंबंधीची अत्यंत क्लिष्ट, वेळ खाणारी, संयमाची परीक्षा पाहणारी सर्व कामे मार्गी लावता लावता मध्ये अनेक वर्षे गेली. कारण जागा नावावर होती खरी; पण त्या जागेवर जायला रस्ताच नव्हता. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेत हा रस्ता होता पण तो प्रत्यक्षात यायला वाट पाहणे एवढीच गोष्ट हातात होती. जवळपास दहा वर्षे यात गेली आणि २०१८ साली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला चऱ्होलीतील वास्तूचा बांधकाम आरखडा सादर झाला. महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी दिलेल्या संपूर्ण सहकार्यामुळे जानेवारी २०१९ मध्ये आरखडा मंजूरही झाला. यथावकाश भूमिपूजनही झाले. पण परीक्षा संपली नव्हती. आधी प्रचंड पावसाने आणि मार्च २०२० मध्ये जगभर करोना विषाणूने घातलेल्या धुमाकुळामुळे वास्तू बांधकामात अडथळे येत होते; पण संकल्प ठाम होता आणि बांधकाम करणारे मेसर्स बीकॉन

कन्स्ट्रोटेकची टीमही ठाम होती. त्यामुळे हळुहळू इमारत आकाराला येत होती. त्याला लागणाऱ्या निधीसाठी समाजाला वेळोवेळी आवाहन केले जात होते आणि त्यातून भारत पेट्रोलियम, मर्सिडिस बेन्झ, प्राज लिमिटेड, एम.एन.जी.एल., पर्सिस्टंट अशा उद्योगसंस्था; तर गंगा-यमुना ट्रस्ट, ज्वेलेक्स फाउंडेशन यासारख्या विश्वस्त संस्था, यशवंत अध्ये, बलदोटा, शिरीष पटवर्धन अशा अनेक व्यक्तींनी दिलेल्या देणग्यांमधून ही देखणी वास्तू आकाराला आली आहे, पूर्ण झाली आहे. हा बांधकामाचा पहिला टप्पा आहे. तळमजला आणि वर तीन मजले असलेल्या या वास्तूत आता ३०,००० चौरस फुट जागा उपलब्ध झाली आहे.

बेसिक टेलरिंग, फॅशन डिझायनिंग, असिस्टंट नर्सिंग आणि विविध पॅरामेडिकल कोर्सेस या वास्तूमध्ये नव्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार आहेत. नृत्यासारख्या विषयातून किंवा एखाद्या क्रीडा प्रकारच्या नैपुण्यातून सुद्धा करिअर घडू शकते हे लक्षात घेऊन असेही विषय या वास्तूत सुरू करण्याचा मानस आहे. हे विज्ञानाचे युग आहे आणि आता रोजच्या जगण्यामध्येही कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स)/यंत्रमानव विज्ञान (रोबोटिक सायन्स) असे विषय प्रत्यक्षात उपयोगात येऊ लागले आहेत. या विषयात असलेली भविष्यातील संधी लक्षात घेऊन या विषयातील एक अद्यावत प्रयोगशाळा उभारण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

या वास्तूच्या बांधकामाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये गरजू मुलींसाठी वसतिगृह आणि आता उभ्या असलेल्या प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे वरील दोन मजले याचे बांधकाम केले जाईल.

वर्धिनीच्या आतापर्यंतच्या विस्ताराच्या टप्प्यावरील हा मोठा विस्तार आहे आणि या ठिकाणची वास्तू पूर्ण उपयोगात यायला लागल्यावर वेगवेगळ्या कोर्सेसच्या माध्यमातून दरवर्षी शेकडो गरजू मुली व महिला या स्वावलंबी होत राहतील. हे दृश्य लवकरात लवकर पाहता यावे यासाठी आता आपल्या शुभेच्छा तर हव्या आहेतच; पण आपला मौल्यवान वेळ, आपले ज्ञान, आपला अनुभव, आपला संपर्क याचीही वर्धिनीला आवश्यकता आहेच. आपण या वास्तूला नक्की भेट द्यावी ही या निमित्ताने विनंती.



संकल्पाच्या पूर्तीसाठी पाऊल पुढती पडले
उघडले, नव विकास दालन उघडले ।।धृ।।

शिकण्याची इच्छा उत्कट, परि नकारघंटा हाती
कित्येक ऐशा दुर्लक्षित नारी, दिसती अवतीभवती
संकुलात या त्यांचे स्वागत, जोडूनी दोन्ही करांनी
दीपवून टाका आसमंत सारा, अपुल्या पराक्रमानी
सत्यात आणा स्वप्न, जे मनात होते रुतले ।।१।।

नवसंकल्पांना, नवस्वप्नांना, येथे पंख फुटावे
साकारण्या त्या साऱ्यांना, बळ येथे लाभावे
भवन हे असे फुलावे, जसा पारिजाता बहर
सुगंध सृजनाचा पसरावा, आसमंती चौफेर
मिळते दाद हिमतीला, पाऊल ज्यांनी उचलले ।।२।।

४ मार्च १९५८ – पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी सुनिश्चित विज्ञान-तंत्रज्ञान धोरण जाहीर केले.

# केंद्रीय वृत्त

**✻ २६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन ✻**

वर्धिनीच्या इमारतीत प्रसिद्ध लेखिका मा. सौ. मृणालिनी चितळे यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. त्यांनी अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आपण प्रत्येकाने आपल्या देशाप्रती असलेला आदर आपल्या कृतीतून, कर्तव्यातून व्यक्त करण्याचे आवाहन केले. ऋतुजा अभ्यासिकेत परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते कर्मचारी बांधवांचा सत्कार करण्यात आला.

**✻ वर्षारंभ उपासना ✻**

तब्बल दोन वर्षानंतर प्रत्यक्ष उपस्थितीत दि. २ एप्रिलला चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा ओंकारेश्वर मंदिरात मोठ्या उत्साहाने साजरा झाला. ओंकारेश्वराचा गाभारा आणि उपस्थितांची मने गायत्री मंत्र उपासनेच्या मंगल स्वरांनी भारावून गेली. 'ध्येय आपुले विकसित जीवन, राष्ट्रासाठी व्हावे अर्पण', या निश्चयाने नूतन वर्षाचा प्रारंभ संस्थेचे कार्याध्यक्ष मा.श्री.रामभाऊ डिंबळे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने झाला. ७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या मा. रामभाऊंच्या जीवनपटाचा प्रेरणादायी प्रवास श्री. संजय तांबट यांनी त्यांच्या घेतलेल्या प्रकट मुलाखतीतून उलगडला. अभ्यासू, धाडसी, उत्साही, सतत कार्यमग्न असणाऱ्या रामभाऊंच्या आयुष्यातले अनुभव ऐकताना कार्यकर्ते भारावून गेले. यामध्ये अगदी खेड्यातून आलेला, रांगड्या बोलीभाषेत बोलणारा मुलगा स्वतःच्या कष्टाने, अभ्यासाने संस्कृतसारख्या भाषेत प्रभुत्व मिळवतो. लहान वयापासून कै.अप्पा पेंडसे यांच्या तालमीत घडलेल्या रामभाऊंनी पुढे प्रबोध उद्योगचा पसारा वाढवला आणि अनेक सामाजिक कामात ते आजही सक्रीय आहेत. प्रेरणा, चेतना, उत्साह वाढवणाऱ्या गुढीपाडव्याचे औचित्य साधून वर्धिनी परिवारातील सदस्यांनी एकमेकांना भेटून उत्साहपूर्ण वातावरणात नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मुलाखतीमधून मिळालेल्या प्रेरणेतून स्वतःच्या विकासासोबतच समर्पणासाठीचा सामूहिक संकल्प सर्वांनी केला.

**✻ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष उपक्रम ✻**

या वर्षी 'स्व'–रूपवर्धिनीमध्ये १४ एप्रिलला रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. उत्थान विभागाच्या, समर्थ रामकृष्ण आणि भगिनी निवेदिता शाखेच्या युवक आणि युवतींनी डिजिटल माध्यमातून व प्रत्यक्ष संपर्कातून केलेल्या रक्तदानाच्या आवाहनाला पूर्व भागातील नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देत **८९ रक्तदात्यांनी** रक्तदान केले, तर स्वामी दयानंद सरस्वती शाखेनेही बिबवेवाडी परिसरात रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीर यशस्वी केले. रक्तदान शिबिरामध्ये **९२ रक्तदात्यांनी** रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा वसा जपला. याच दिवशी झालेल्या आरोग्य शिबिरामध्ये दंत तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप, बीपी व शुगर तपासणी, मशिनद्वारे हाडांची कॅल्शियम तपासणी अशा सर्व गोष्टींची तपासणी व औषधे वाटप करण्यात आले. परिसरातील ४५० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला.


१९ डिसेंबर १९६१ – पोर्तुगाल राज्यपालांची बिनशर्त शरणागती – गोवा भारतात सामील झाला.

### ※ जयंती – ऐक्यासाठी.. बंधुभाव जपण्यासाठी ※

शिवराय व भीमराय हे दोन महापुरुष समाज जोडणारे व्यक्तिमत्त्व. त्यांच्या विचारांचा जागर दि. २४ एप्रिल रोजी पारगे चौकात करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि त्यासाठी उद्योग करण्याची प्रेरणा तरुण उद्योजक मैत्रेयी कांबळे हिने मांडली. 'आपण आपली बुद्धिमत्ता, आपली कौशल्ये योग्य तो पराक्रम करण्यासाठी खर्चिली पाहिजे', असे निवृत्त पोलीस अधिकारी भानुप्रताप बर्गे यांनी मांडले. १२ गटांना विधायक कार्य पुरस्कार देण्यात आला. यात गणेशोत्सव मंडळ, बौध्द विहार, शिवजयंती उत्सव समिती यांचा सहभाग होता. ३७५ पेक्षा अधिक नागरिक, परिसरातील आठ सार्वजनिक मंडळातील कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित होते.

### ※ अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन ※

या वर्षी श्री. विवेक देशपांडे (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र, पर्यावरण संरक्षण सहसंयोजक) यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. रुग्ण सहाय्यक वर्गातील सर्व विद्यार्थिनींनी राष्ट्रभक्तीपर पद्य सादर केले. देशपांडे सरांनी मार्गदर्शन करताना प्रत्येकजण स्वत: पर्यावरण संरक्षणासाठी कशा पद्धतीने योगदान देऊ शकतो हे स्पष्ट केले.

स्वातंत्र्यदिन कार्यक्रम शाखांमध्ये वेगवेगळ्या उपक्रमातून साजरा झाला. 'हर घर तिरंगा' हे अभियान चांगल्या रीतीने राबविले. क्रांतिज्योती शाखेतील वर्धिकांनी व स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी गटश: वस्तीत फिरून रस्त्यावर पडलेले झेंडे उचलून स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे जमा केले. स्वामी विवेकानंद शाखेत देशभक्तीवरील पद्ये मुलांनी सादर केली. धर्मवीर शंभूराजे शाखेत मुलांनी स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांना आदरांजली वाहिली. शाखेच्या मैदानात भारतमातेचा जयजयकार करत संचलन झाले. समर्थ रामकृष्ण शाखेत पालक आणि वर्धक यांच्यासाठी चित्रकला स्पर्धा झाली. बक्षीस वितरण मा. पुष्पाताई नडे यांच्या हस्ते झाले. स्वामी दयानंद शाखेने परिसरात पथसंचलन केले. अप्पर इंदिरानगर बसस्थानक चौकात शिववंदना, वंदेमातरम व विश्वकर्मा चौकात राष्ट्रभक्तीपर पद्याचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाची सांगता संविधान वाचनाने झाली. या कार्यक्रमास नागरिकांनी आणि पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

### ※ गणेशोत्सव ※

'स्व'-रूपवर्धिनीच्या ढोलताशाच्या वादनाला साथ असते ती त्याच्या मागे-पुढे नाचणाऱ्या शाळकरी मुलांच्या झांज, ध्वज, लेझीम, टिपरी, टाळ यांसारख्या पथकांची. वर्धिनींच्या शाखांवर एक-दीड महिना आधीपासूनच पथकांसाठीची लगबग सुरू होते. यंदाच्या वर्षी पथकांमध्ये ३ झांज, ३ ध्वज, १ लेझीम, १ टाळ आणि १ टिपरी या पथकांचा समावेश होता. अत्यंत सुंदर प्रात्यक्षिकांचे वर्धक-वर्धिकांमार्फत सादरीकरण झाले. दोन वर्षाच्या काळानंतर मुले नव्या जोमाने व उत्साहाने पथकातील सहभागाचा आनंद लुटत होती.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध प्रकारांचा पथकांमध्ये समावेश केलेला होता. 'भारतीय संविधान हाच योग्य आणि विवेकी मार्ग आहे' यावर देखील मुलांनी सादरीकरण केले. राष्ट्रकुल स्पर्धेत पदक मिळवलेल्या खेळाडूंची झलक आपल्याला पथकात पहायला मिळाली.

डोळ्यांचे पारणे फेडले ते लक्ष्मी रोडवर सादर केलेल्या 'अफजलखान वधाच्या' देखाव्याने. याची दखल विविध वृत्तवाहिन्यांनी घेतली. नऊ ठिकाणी पथकाच्या माध्यमातून श्री गणरायाच्या चरणी सेवा दिली. तसेच अनंत चतुर्दशीला मानाचा चौथा गणपती तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत वर्धकांनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. नेत्रदीपक असलेली शिवकालीन युद्धकला देखील याच मिरवणुकीत नागरिकांना पहायला मिळाली.

पथकात एकूण ४०० वर्धक-वर्धिका व युवक युवतींनी सहभाग नोंदवला. यावर्षी गणेशोत्सव प्रमुख म्हणून

१ जुलै १९६३ – पाँडिचेरी राज्य भारतातील केंद्रशासित प्रदेश म्हणून आकाराला आले.
फ्रेंच सरकारने १ नोव्हेंबर १९५४ ला पदुच्चेरीचा ताबा भारत सरकारला सोपवला होता.

श्री. अमोल शेलार यांनी जबाबदारी पाहिली.

*** जागर प्रबोधनाचा, आवाज परिवर्तनाचा ***

सध्या पुण्यात असणाऱ्या अनेक समस्यांपैकी सर्वात ज्वलंत समस्या म्हणून नदी प्रदूषणाकडे पाहिले जाते. याच समस्येवर आधारित **'नदी संपावर गेली आहे'** या पथनाट्याच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी केले. या पथनाट्याच्या माध्यमातून पुण्याच्या एकेकाळी वैभव असणाऱ्या मुळा–मुठा नद्यांची गटारे झालेली आहेत. तिची सध्याची परिस्थिती पथनाट्याच्या माध्यमातून पुणेकरांसमोर मांडली गेली.

पथनाट्य बसवण्यापूर्वी काही शाखा व अभ्यासिकांमधील मुला–मुलींनी नदीपात्राला प्रत्यक्ष भेट दिली. नदीची वास्तविक स्थिती पाहिल्यानंतर वर्धक वर्धिकांनी गांभीर्याने आणि पोटतिडकीने विषय मांडणी केली. यामध्ये पाच शाखा व उत्थान विभागाच्या पाच अभ्यासिका यांचा सहभाग होता. पुण्यातील सर्व पेठांमधील नामवंत गणेश मंडळांमध्ये तसेच गर्दीच्या ठिकाणी व नदीच्या आजूबाजूच्या परिसरांमध्ये जवळपास १५६ ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण झाले. ज्यात सुमारे २०५ युवक–युवती व वर्धक–वर्धिकांनी सहभाग नोंदविला. अशा प्रकारे हजारो लोकांसमोर प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले.

*** विसर्जनानंतरची नदी भेट ***

स्वामी अखंडानंद शाखेतील वर्धक विसर्जनानंतर डेक्कन येथील विसर्जन घाटावर प्रत्यक्ष जाऊन आले. गणपती विसर्जनानंतर नदीची झालेली अवस्था, गणपतीच्या मूर्तींचा झालेला अवमान, कचऱ्याचे साम्राज्य पाहून ते अस्वस्थ झाले.

गणेशोत्सवाचे १० दिवस पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करीत होतो. नद्यांमध्ये गणपतीचे विसर्जन करू नये, निर्माल्य नदीत टाकू नये असा संदेश वर्धक देत होते. त्यापैकी किमान काही लोकांचे जरी मनपरिवर्तन झाले असेल तरी आमचा हा उद्देश सार्थकी झाला आहे असे म्हणता येईल. कारण दहा दिवस गणेशाची मनोभावे पूजा अर्चा करतात व विसर्जनानंतर त्याच्याकडे ढुंकूनही पाहत नाही. अशाने आपणच आपल्या देवतांची विटंबना करतोय आणि आपल्या जीवनदायिनी असणाऱ्या नद्यांना आपणच प्रदुषित करीत आहोत, अशी भावना निरीक्षणाअंती युवकांनी बोलून दाखवली. ह्या सर्व समस्येवर उपाय म्हणजे गणपती बाप्पाचे हौदात विसर्जन करणे, मूर्तीदान करणे, निर्माल्य संकलन अशा पर्यावरण पूरक उपक्रमामुळे नदी प्रदूषित होणार नाही याची जाणीव वर्धकांना झाली.

*** दीपावली स्वरप्रभात ***

**पथनाट्यास कारण की...**

१२ सप्टेंबर रोजी शिवतेजनगर अभ्यासिकेतील मुलांसोबत नदीपात्रात जाण्याचे नियोजन केले. या अभ्यासिकेने या वर्षी पहिल्यांदाच नदीसंवर्धनावर आधारित असणारे पथनाट्य सादर केले. एक आठवडाभर सराव करून गणेशोत्सवादरम्यान अनेक ठिकाणी सादरीकरण करण्यात आले. पण फक्त पथनाट्य न करता गणेशोत्सवानंतर प्रत्यक्ष नदीची काय अवस्था होते याबाबत मुलांना समज यावी यासाठी नदीपात्र भेट घेण्याचे ठरले. आम्ही ज्यावेळी संपूर्ण नदीपात्र फिरलो. त्यावेळी अनेक ठिकाणी गणेशमूर्तींचे भग्न अवशेष, निर्माल्य, कचरा हे सगळं मुलांनी प्रत्यक्ष पाहिलं आणि 'दादा आपण शक्य तेवढा कचरा गोळा करूयात आणि यापुढे किमान आपल्याकडून तरी आपली नदी प्रदूषित होणार नाही याची काळजी घेऊया,' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली. ही प्रतिक्रिया ऐकून आपण केलेले पथनाट्य मुलांच्या मनात खऱ्या अर्थाने रुजले आहे, याचे समाधान वाटले.

– **रोनक खाटेर** (स्वामी अखंडानंद शाखा)



२२ ऑक्टोबर १९६३ – भाकरा नांगल प्रकल्प – तत्कालीन जगातला क्रमांक दोनचा सर्वात मोठा सिंचन आणि जलविद्युत प्रकल्प.

यंदा दि. २२ ऑक्टोबर २०२२ (धनत्रयोदशी) रोजी 'स्व'–रूपवर्धिनी कलामंच आयोजित 'दीपावली स्वरप्रभात' हा कार्यक्रम वर्धिनीच्या मुख्य वास्तूत घेण्यात आला. या कार्यक्रमाचे हे चौथे वर्ष होते.

यावेळी **श्रीरामगाथा** हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये श्रीरामांचा जीवनपट उलगडेल अशी गीतरामायणातील ५६ अजरामर गीतांपैकी १४ गीते संस्कृत आणि मराठी या भाषांमध्ये सादर करण्यात आली. यातील गीतांचे गायन रोहित गुळवणी, सानिका वाघ आणि श्रिया शिंदे यांनी केले, तबल्याची साथ कौशिक केळकर आणि केदार टिकेकर यांनी केली. कौशिक हा आपल्या कलामंचाचा कार्यकर्ता आहे. सिंथेसायजरची साथ क्षितिज भट, संवादिनीची साथ माधव लिमये, बासरीची साथ अथर्व वैशंपायन यांनी केली. याचबरोबर यातील गीतांवर सर्वेश्वरी साठे हिने नृत्य सादर केले. झी २४ तास आणि साम टी.व्ही.वरील प्रसिद्ध वृत्त निवेदक भूषण करंदीकर यांनी या कार्यक्रमाचे निवेदन केले. स्वर्गीय ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांचा उत्तुंग वारसा ही तरुणपिढी पुढे नेत आहेच, सोबतच मूळ गीतांची संस्कृत भाषांतरित गीते, त्या गीतांमधील भावभावनांचे दर्शन घडेल असे सादर केले जाणारे नृत्य, मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांची कथा आजच्या पिढीला आवडावी अशा शब्दांमध्ये केले जाणारे निवेदन या नावीन्यपूर्ण बदलांनी ह्या कार्यक्रमाची गोडी आणखीन वाढली आहे.

**❋ मातोश्री रमाबाई आंबेडकर मातृशक्ती पुरस्कार ❋**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन आणि 'स्व'–रूपवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षीचा चौथा **'मातोश्री रमाबाई आंबेडकर पुरस्कार' श्रीमती सुनिता सुनील लांजेकर** यांना ज्येष्ठ मूर्तीशास्त्रज्ञ व डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरु आदरणीय डॉ. गो. ब. देगलूरकर यांच्या हस्ते दि. १६ जुलै रोजी प्रदान करण्यात आला. वर्धिनीच्या ओंकार सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेश पांडे, अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. संजय चाकणे, वर्धिनीचे कार्याध्यक्ष श्री. रामभाऊ डिंबळे व अध्यासन प्रमुख डॉ. सुनील भंडगे उपस्थित होते.

'आज वर्धिनीमध्ये माझ्या आईचा सन्मान होतो आहे. आमच्या कुटुंबासाठीही हा खूप मोठा आणि आनंददायी क्षण आहे. देगलूरकर सरांच्या हस्ते आईला हा महत्त्वपूर्ण पुरस्कार मिळतो आहे. तो मला ऑस्करपेक्षाही मोलाचा वाटतो' असे भावपूर्ण उद्‌गार वर्धिनीचे युवक कार्यकर्ते व प्रसिद्ध दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी काढले.

**'स्व'–रूपवर्धिनी भेट... एक भारावलेला अनुभव !**

'स्व'–रूपवर्धिनी गेली ४३ वर्षे वस्त्यांमध्ये अविरत व बहुविध काम करणारी संस्था. बुद्धिमत्ता सर्वत्र विखुरलेली असते. प्रगतीमध्ये परिस्थिती, गरिबी अडसर ठरू नये यासाठी प्रयत्न करणारी संस्था. मुलांसाठी शैक्षणिक काम, महिलांना सक्षम बनवणारे प्रशिक्षण वर्ग, ग्रामीण भागातील अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र अशा अनेक विभागांमार्फत चालणारे काम. दैनंदिन शाखेत वस्ती अभ्यासिकेत खेळ, अभ्यास, सहली असे अजून कितीतरी उपक्रम. नर्सिंग शिक्षण पूर्ण झाल्यामुळे मुली कमवत्या झाल्यामुळे, त्यांचा समाजातील वाढता सन्मान, स्त्री कमावती झाल्यामुळे घराचं, 'तिचं' पालटलेलं रूप, ७६ वर्षांच्या आजी ज्या गेली २५ वर्ष महिलांना शिकवून साक्षर करत आहेत. वस्तीतली मुलगी जिला वैकुंठ कुठे हेही माहीत नव्हतं तिने भीतीदायक कोविड काळात स्मशानात केलेलं काम, असे कितीतरी अंगावर शहारे आणणारे अनुभव ऐकले. 'सेवा है यज्ञकुंड समिधा सम हम जले', या भावनेने काम करणारे साधेसुधे निगर्वी तरुण, उच्चशिक्षित जीवनव्रती बघून मन भारावले.

**– समर्थ भारत कार्यकर्ता गट**

ऑक्टोबर १९६५ – अलाहाबादमध्ये माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान' ही घोषणा दिली.

# शाखा विभाग

'स्व'–रूपवर्धिनीचे काम आज विविध विभागांमध्ये विस्तारले आहे. या कामाचा श्री गणेशा झाला तो शाखा विभागाने. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचे वर्धन करून नेतृत्व निर्माण हा शाखा विभागाच्या कामाचा मुख्य उद्देश. आज शाखा विभागांतर्गत विविध उपक्रम वर्धिनीत घडलेल्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या बळावर राबवले जात आहेत. विभागाचा विस्तार होत आहे.

**एकूण वस्त्या – ६४, शाखा – १७, वर्धक – ५७०, वर्धिका – १०५, वर्षभर चालणारे उपक्रम – १७५+, स्वयंसेवी कार्यकर्ते–१२८, क्रीडा शाखा–१, एकूण कामाचे तास–१९,५००, संपर्कित शाळा–७६, कलागट – १**

## तासिका विभाग

**※ शैक्षणिक संक्रमण उत्सव २०२२**

करोनाच्या काळात शाळा बंद असल्यामुळे पडलेला शैक्षणिक खंड बरेच नुकसान करून गेला. या काळात अभ्यासाचा आलेला कंटाळा झटकून काढणं महत्त्वाचं होतं. त्याचसोबत आनंदाने व रंजक पद्धतीने शिक्षण देणं गरजेचं होतं. त्यासाठीच संक्रमण उत्सव शैक्षणिक पद्धतीने घेण्यात आला. भाषा विकास, गणित, परिसर अभ्यास, प्रश्नपेढी आणि शैक्षणिक साहित्य निर्मिती या विषयांच्या माध्यमातून एक महिना सर्व शाखांमध्ये अभ्यास झाला.

● **भाषा –** मराठी आणि इंग्रजी विषयातील म्हणी, वाक्प्रचार, शाब्दिक कोडी, उतारा वाचन यातून अभ्यास झाला.

● **गणित –** मूलभूत गणिती क्रिया, पाढे, वर्ग, वर्गमूळ इत्यादींचे वैयक्तिक व सामूहिक पाठांतर व इयत्ताशः गणितातील संकल्पना स्पष्ट करण्यात आल्या.

● **शैक्षणिक साहित्य निर्मिती –** अभ्यासातील संकल्पना समजावून सांगण्यासाठी त्यावर आधारित साहित्य तयार केले. वरील सर्व विषयांच्या सादरीकरणासाठी तक्ते, प्रकल्प व मौखिक पद्धतींचा वापर करण्यात आला.

सिंहगड, कर्वेनगर भागातील सर्व शाखांनी एक महिना रोज गणित व इंग्रजी भाषा या विषयातले छोटे छोटे उपक्रम शाखेवरती उत्सव स्वरुपात साजरे केले. याचाच परिपाक म्हणून सर्वांनी पीपीटीच्या माध्यमातून सादरीकरण केले, आणि चार शाखांनी एकत्रित येऊन राजर्षी शाहू शाखेमध्ये संक्रात उत्सव, शैक्षणिक संक्रात उत्सव म्हणून साजरा केला. धर्मवीर शंभूराजे शाखेने शैक्षणिक संक्रमण उत्सवात शंभरहून अधिक इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित अशा विषयातील प्रकल्प सादरीकरण केले. या प्रकल्पांचे त्यांनी प्रदर्शन भरवले. ५०० हून अधिक पालक, नागरिक, शिक्षण विषयातील कार्यकर्ते यांनी या संक्रमण उत्सवाला भेट दिली.

**※ प्रश्न नव्हे; अभ्यास मंजुषा आहे ही...**

दि. २० मार्चला इ. ८ वी व ९ वी च्या मुलांची इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, नागरिकशास्त्र या विषयाची प्रश्नमंजुषा घेण्यात आली. तिचा मुख्य उद्देश या विषयांची रुची मुलांमध्ये वाढावी, परीक्षेसाठी तयारी व्हावी व इतिहास, भूगोलासारख्या प्रेरणा आणि सामाजिक शिक्षण देणाऱ्या विषयांचा अभ्यास व्हावा; हा होता.

यातील विजेते –


१९६५ – कृषी मूल्य आयोगाची स्थापना – मुख्य शेती पिकांचे भाव बांधून देण्यासाठी झाली.

● इयत्ता ८ वी – इतिहास – विजेते – राजर्षी शाहू शाखा, उपविजेते – स्वामी दयानंद शाखा
● इयत्ता ८ वी – भूगोल – विजेते – धर्मवीर शंभूराजे शाखा, उपविजेते – राजर्षी शाहू शाखा
● इयत्ता ९ वी – इतिहास – विजेते – ब्रह्मानंद शाखा आणि सुबोधानंद शाखा, उपविजेते – वर्धिका गट
● इयत्ता ९ वी – भूगोल – विजेते – स्वामी दयानंद शाखा, उपविजेते – रामकृष्ण शाखा आणि शंभूराजे शाखा.

**साथी हाथ बढाना...**

श्रेयस आणि विपुल दोघेही बालपणापासूनचे मित्र आणि गेल्या १ वर्षापासून विवेकानंद शाखेचे शिक्षक!
काल शाखेत विपुलचा वाढदिवस शाखेच्या पद्धतीने, मुलांच्या घोळक्यात साजरा झाला.
श्रेयसच्या ओळखीतून विपुल शाखेत शिक्षक म्हणून रुजू झाला. समाजासाठी काहीतरी करून दाखवण्याची त्याची धडपड कायम सुरू असते. वर्षभरापूर्वी शाखेत शिक्षकांची आवश्यकता होती तेव्हा श्रेयसने शिकवण्यासाठी लगेच होकार दिला. स्वतःचा लॅपटॉप मुलांना हाताळायला देण्यापासून ते अद्यावत असणारे तंत्रज्ञान वापरून श्रेयस मुलांना शिकवत असतो. काही महिन्यांपूर्वी शाखेत गणित विषयासाठी शिक्षकाची आवश्यकता होती. ही गोष्ट श्रेयसच्या बालमित्राला म्हणजे विपुलला समजली आणि त्याने देखील शाखेत शिक्षक म्हणून शिकवायला सुरुवात केली आणि तो अजूनही येत आहे. शाखेच्या सहली, कार्यक्रम वा इतर काहीही असो, ते दोघेही आवडीने सहभाग घेतात. अशी **स्वयंप्रेरित युवा पिढी कामाचा उत्साह वाढवते.**

*** तासिका ज्ञानयज्ञ : १० वी पूर्वपीठिका शिबिर –** इयत्ता १० वीच्या ४० वर्धक वर्धिकांची अभ्यासाची नियोजनबद्ध तयारी करून घेण्यासाठी दीड दिवसांचे शिबिर दि. १८ व १९ जूनला न्या. रानडे बालक मंदिर येथे घेण्यात आले. तयारीच्या या पहिल्या टप्प्यात वर्धकांनी त्यांचे वैयक्तिक नियोजन तयार करून लेखन, टिपण कौशल्य वापरून गतीने अभ्यास कसा करायचा, गणित, इंग्रजी व विज्ञान विषयांबाबतीत अभ्यास कसा करायचा याची तंत्रे समजून घेतली. शिबिरात झालेली सत्रे पुढीलप्रमाणे –

● नियोजन सत्र – श्रीमती मेघा नगरे
● लेखन व टिपण कौशल्य – श्रीमती अनिता आंबेकर
● १० वी का महत्त्वाची ? – श्रीमती स्वप्नाली सेठिया
● गणित – श्रीमती मनीषा पाठक
● इंग्रजी – श्रीमती स्वाती बोराडे
● विज्ञान – श्रीमती लता पुरंदरे

*** शिष्यवृत्ती वाटप समारंभ :** रविवार दि. ०३ ऑक्टोबर २०२२ रोजी टाटा मोटर्सचा शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रम वर्धिनीच्या प्रबोध सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाखा विभागाचा व करोना काळात वर्धिनीने केलेल्या कामाचा माहितीपट दाखविण्यात आला. या कार्यक्रमास वर्धिनीच्या महिला व बाल विभाग प्रमुख मा. पुष्पाताई नडे उपस्थित होत्या. आदरणीय पुष्पाताईंच्या हस्ते ३० विद्यार्थ्यांना पालकांसमवेत शिष्यवृत्ती धनादेशांचे वितरण करण्यात आले.

*** अभ्यास कौशल्ये विकास शिबिर –** दि. ३ व ४ डिसेंबरला ८ वी ते १० वी च्या वर्धक-वर्धिकांचे अभ्यास कौशल्ये, अभ्यास तंत्र, दैनंदिन नियोजन तसेच पाठ्यक्रमातील गणित, विज्ञान, इंग्रजी आणि इतिहास या विषयांवर अभ्यास शिबिर संपन्न झाले. १४० शिबिरार्थींनी यात सहभाग घेतला. यावर्षीच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी या शिबिराचा नक्कीच उपयोग होईल.

## मैदान विभाग

*** क्रीडा दिन –**

करोनामुळे दोन वर्षानंतर झालेल्या क्रीडादिनात युवकांनी, वर्धकांनी मैदानावर जोशात मैत्रीपूर्ण चढाओढीत एकमेकांना पाठिंबा देत, कौतुक करत सर्वजण खेळत होते. याची तयारी म्हणून भांडार, पूरक आहार, बक्षीस

१९६५ नंतर स्थापन झालेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, विप्रो, पटनी कॉम्प्युटर्स, इन्फोसिस या कंपन्यांचा भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्रांतीत मोलाचा वाटा आहे.

वितरण, तांत्रिक सजावट, वातावरण निर्मिती, वैद्यकीय, आर्थिक, उद्घाटन व समारोप कार्यक्रम अशा व्यवस्थांची जबाबदारी सर्व शाखेतल्या युवक कार्यकर्त्यांनी घेतली. वैयक्तिक स्पर्धा चंद्रशेखर आगाशे कॉलेजच्या मैदानावर दि. २ जानेवारीला सकाळी झाल्या. वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. वर्धक विभागाचा या वर्षीचा क्रीडादिन १३ नोव्हेंबर व २० नोव्हेंबर तर वर्धिका विभागाचा क्रीडादिन २७ नोव्हेंबरला पार पडला. वर्धक विभागाच्या क्रीडादिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. रणजीत चामले (स. प. महाविद्यालय, क्रीडा विभागप्रमुख), तर वर्धिका विभागाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. विनेश नगरे उपस्थित होते.

| **१०० मी. धावणे** | **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** |
|---|---|---|---|
| लहान गट (५ वी, ६ वी) | तुषार पालकर | दिनेश डोंगरे | अवनीश तांबे |
| मध्यम गट (७ वी, ८ वी) | गणेश सुर्यवंशी | सिद्धार्थ लेणे | निलेश चव्हाण |
| मोठा गट (९ वी, १० वी) | मयुर खरात | साहिल खान | साजिद खान |
| युवक गट (११ वी, १२ वी) | पिनाक पाळे | गणेश मते | पियुष उभे |
| युवक गट (F.Y. ते T.Y.) | साहिल माने | मयुर राणे | ओंकार पंडित |
| युवक गट (व्यावसायिक) | अमित अदवडे | चेतन सिंग | सोहम महाजन |

| **१६०० मी. धावणे** | **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** |
|---|---|---|---|
| लहान गट (५ वी, ६ वी) | ओम पोकळे | शैलेश चव्हाण | पार्थ साळवी |
| मध्यम गट (७ वी, ८ वी) | आदर्श गायकवाड | सुमीत घाणेकर | समर्थ राजमाने |
| मोठा गट (९ वी, १० वी) | सौरभ शिंदे | सार्थक फाले | तेजस पाष्टे |
| युवक गट (११ वी, १२ वी) | रोहन मरगळे | ऋषिकेश शिंदे | गौरव सुतार |
| युवक गट (F.Y. ते T.Y.) | श्रेयस खंडाळे | शाहीद शेख | ओंकार जाधव |
| युवक गट (व्यावसायिक) | अतुल बिबवे | समर्थ बोराडे | शुभम शिंदे |

| **लांब उडी** | **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** |
|---|---|---|---|
| लहान गट (५ वी, ६ वी) | गणेश नंदगिरी | गणेश जकनाले | वेदांत धाडीवाले |
| मध्यम गट (७ वी, ८ वी) | गणेश सूर्यवंशी | आर्यन तनपुरे | आयुष तांदळे |
| मोठा गट (९ वी, १० वी) | साहिल खान | सौरभ शिंदे | समर्थ पवार |
| युवक गट (११ वी, १२ वी) | गणेश मन्ने | संचित पवार | रोहन मरगळे |
| युवक गट (F.Y. ते T.Y.) | शाहीद शेख | जय वाडेकर | आदित्य घोरपडे |

| **युवती/वर्धिका विभाग –** | **प्रथम** | **द्वितीय** | **तृतीय** |
|---|---|---|---|
| १०० मी. धावणे – वर्धिका | सिद्धी गुळांबे | वेदिका झांजे | -- |
| दोरी उड्या – वर्धिका | श्रावणी मोरे | संजना बिराजदार | तन्वी कात्रे |
| दोरी उड्या – युवती | पायल जिरेसाळ | वैष्णवी रायकर | -- |
| सीटअप्स – वर्धिका | संजना बिराजदार | श्रावणी मोरे | सिद्धी गुळांबे |
| सीटअप्स – युवती | चंचल ओबी | प्रज्ञा कोकीळ | वैष्णवी रायकर |
| अडथळा शर्यत – वर्धिका | तन्वी कात्रे, श्रावणी मोरे, सुश्मिता स्वामी, नेहा परदेशी | | |
| अडथळा शर्यत – युवती | चंचल ओबी, गायत्री मोरे, पायल जिरेसाळ | | |


१९६९ मध्ये तत्कालीन सर्वात मोठ्या १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

सांघिक स्पर्धा दि. ८ व ९ जानेवारीला ए पी जे अब्दुल कलाम ई–लर्निंग स्कूल आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशालेच्या मैदानावर झाल्या. स्पर्धांचे उद्घाटन राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सर खेळाडू श्री. अनिकेत कांबळे यांनी केले तर बक्षीस वितरण सामाजिक कार्यकर्ते श्री. स्वप्नील दुधाने यांच्या हस्ते झाले.

**समता (सांघिक स्पर्धा) –**

स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी ब्रह्मानंद शाखा (उपविजेता)

**लंगडी सांघिक स्पर्धा –**

स्वामी ब्रह्मानंद शाखा (विजेता), राजर्षी शाहू शाखा (उपविजेता)

**कबड्डी सांघिक स्पर्धा –**

मोठा गट (८ वी ते १० वी) – राजर्षी शाहू शाखा (विजेता), स्वामी योगानंद शाखा (उपविजेता)
युवक (११ वी ते १२ वी) – स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी ब्रह्मानंद शाखा (उपविजेता )

**फुटबॉल सांघिक स्पर्धा –**

युवक गट (F.Y. ते T.Y.) – स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी ब्रह्मानंद + राजर्षी शाहू शाखा (उपविजेता)

**व्हॉलीबॉल सांघिक स्पर्धा –**

युवक गट (व्यावसायिक) – स्वामी दयानंद शाखा (विजेता), स्वामी श्रद्धानंद शाखा (उपविजेता)

## कार्यक्रम विभाग

### * आणि शाखा शिवमय झाल्या...

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९२व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वामी दयानंद सरस्वती शाखेत श्री. शुभम अग्रवाल (अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, संघटन मंत्री, पुणे शहर) यांनी 'भारत घडवताना शिवरायांची भूमिका' या विषयावर वर्धकांशी संवाद साधला. शिवरायांचा विचार हा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा अनेक अंगांनी आजही कसा उपयोगी आहे याविषयी मार्गदर्शन सरांनी केले.

स्वामी श्रद्धानंद शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आयुष्यावर आधारित कथाकथन, प्रश्नमंजुषा अशा अनेक चुरशीच्या स्पर्धांनी शिवजयंती साजरी झाली. शाखाप्रमुख उज्वल वाघुले दादाने मुलांना महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांवरील गोष्टी सांगितल्या.

समर्थ रामकृष्ण शाखेत चांदणी भोजनाच्या रात्री तुषार मुढे दादाने शिवचरित्राचे कथाकथन केले.

भगिनी निवेदिता शाखेत श्री. होनराज हेमंतराजे मावळे यांनी अफजलखान वधाची गोष्ट मुलींना सांगितली. शिवरायांचे धैर्य, शिवरायांचे शौर्य, शिवरायांचा पराक्रम आपल्या ओघवत्या शैलीत वक्त्यांनी मांडला. याच दिवशी विश्व सावली या संस्थेचे श्री. निलेश शेलार आणि श्री. किशोर पवार यांनी शाखेला भेट दिली. या संस्थेने मुलींना कंपास पेट्या भेट म्हणून दिल्या. यावेळी जितेंद्र गौड, किरण दरवडे, अक्षय सोनावणे उपस्थित होते. २० फेब्रुवारी रोजी मुलींना 'पावनखिंड' हा चित्रपट चित्रपटगृहात दाखवण्यात आला. वीर बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सेनेच्या पराक्रमाने घोडखिंडीची पावनखिंड कशी झाली, याचे दर्शन मुलींना घडले. या चित्रपटातील काही प्रसंग पाहताना मुलींचे डोळे पाणावले. खऱ्या अर्थाने प्रेरणा जागरण झाले.

स्वामी दयानंद सरस्वती शाखेत श्री. रामकृष्ण चिंचकर सर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर वर्धकांशी संवाद साधला. शिवजयंती निमित्ताने निलेश धायरकर यांचे 'या झेंड्याचे हे आवाहन' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सर्वप्रथम १५० वर्धकांची प्रियदर्शनी शाळेपासून ते बाळासाहेब ठाकरे सभागृह, सुपर इंदिरानगरपर्यंत घोषणा देत व पद्य म्हणत पदयात्रा काढण्यात आली. त्यांतर

'निरमा' उद्योगसमुहाचे निर्माते करसनभाई पटेल यांनी १९६९ मध्ये
स्वस्तातील डिटर्जेंट पावडर तयार करण्याचा श्रीगणेशा केला.

झालेल्या व्याख्यानात धायरकर यांनी महाराजांची स्वराज्याची कल्पना, महाराजांनी कमावलेले जीवापाड प्रेम करणारे मावळे, महाराजांचे संघटन कौशल्य, युध्दनीती अशा अनेक पैलूंवर गोष्टीरूपात प्रकाश टाकला. एकूण उपस्थिती ३५२ होती.

**✻ हे बंध सामाजिक कृतज्ञतेचे ✻**

या वर्षी शाखेतील वर्धक आणि वर्धिकांनी स्वतःच्या हातांनी बनवलेल्या राख्या बांधल्या, यातून आत्मीयता आणि कौशल्याचे दर्शन घडले. हा उत्सव सर्व शाखांमध्ये **सामाजिक रक्षाबंधन** म्हणून साजरा झाला. क्रांतीज्योती सावित्री शाखेत दि. ६ ऑगस्टला राखी बनवणे हे कृतीसत्र झाले.या बनवलेल्या राख्या मुलींनी परिसरातील भाजी विक्रेते, दूध विक्रेते, मिठाई किराणा दुकानदार व तेथील कामगारांना तसेच स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धकांना आणि युवकांना बांधल्या. भगिनी निवेदिता शाखेतील मुलींनी परिसरातील दारूवाला, नरपतगीर, समर्थ पोलीस स्टेशन येथील पोलीस व कर्मचारी वर्गाला राख्या बांधून त्यांच्या सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वामी ब्रह्मानंद शाखेतील वर्धकांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशन, अग्निशामक केंद्र, वडगाव बुद्रुक महानगरपालिका दवाखाना येथील कर्मचाऱ्यांना राखी बांधून शाखा कामाची ओळख करून दिली.

स्वामी विवेकानंद शाखेच्या कार्यक्रमात पालक व वर्धकांच्या बहिणी सहभागी झाल्या. स्वामी अखंडानंद शाखेने परिसरातील शिवतेजनगर अभ्यासिकेतील पालकांचे, विद्यार्थ्यांचे व वर्धकांचे एकत्रीकरण घेऊन उत्सव साजरा केला. स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी आरोग्य कोठीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना कृतज्ञतापूर्वक राख्या बांधल्या.

**✻ एक राखी देशाच्या सीमेवरच्या शूर सैनिकांसाठी ✻**

आज आपण आनंदाने आपले कौटुंबिक जीवन जगत आहोत कारण आपला भाऊ हातात शस्त्र घेऊन आपल्या संरक्षणासाठी सीमेवर सज्ज आहे म्हणून! राखी पौर्णिमेनिमित्त सीमेवरील जवानांना राखी पाठवण्यासाठी स्वामी अभेदानंद शाखेत राखी बनवण्याचा कार्यक्रम झाला. सामजिक भान राखत सैनिकांप्रती असलेले प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठी वर्धकांनी अतिशय मनापासून राख्या बनवल्या आणि त्यांना पाठवल्या.

**✻ गुरुपौर्णिमा विशेष ✻**

स्वामी विवेकानंद शाखेत गुरुपौर्णिमेनिमित्त प्रमुख वक्ते म्हणून श्री. प्रशांत धोत्रे हे उपस्थित होते. प्रशांत दादाने आपण गुरुपौर्णिमा का साजरी करतो, गुरुपौर्णिमेची परंपरा कशी सुरू झाली, आपल्या जीवनातील गुरूंचे महत्त्व याविषयी संवाद साधला. तसेच शाहू शाखेत कोमलताई धायरकर यांनी आपल्या आसपास असणाऱ्या व्यक्तींमध्ये गुरु शोधता यायला हवा, त्यांच्यातील चांगले गुण आत्मसात करता यायला हवेत असे सांगितले.

**✻ वर्धक–वर्धिकांना घडवणारे प्रशिक्षण ✻**

● भगिनी निवेदिता शाखेत स्व–संरक्षण म्हणजे काय हे शिकवण्यासाठी वैशालीताई धूत आल्या होत्या. स्वप्नपूर्ती संस्थेतर्फे शाखेमध्ये हे प्रशिक्षण घेण्यात आले. स्व–संरक्षण का गरजेचे आहे याविषयी चर्चा झाली. समोरची व्यक्ती हल्ला करत असताना आपल्या शारीरिक क्षमता कशा उपयोगात आणायच्या, प्रतिकार करण्यासाठी आत्मविश्वास किती गरजेचा आहे आणि हा आत्मविश्वास स्व–संरक्षणाचे तंत्र माहीत असल्यावर नक्कीच येतो हे ताईंनी समजावले.

● १३ मे ला सावित्री शाखेत आँचल माहेश्वरी आणि दिव्याताईनी मुलींची नृत्य प्रशिक्षण कार्यशाळा घेतली. यात वर्धिका आणि युवती उत्साहाने सहभागी झाल्या.

● राजर्षी शाहू शाखा– योग प्रशिक्षक शुभांगीताई अमृतकर यांनी योगदिनानिमित्त शाखेत कृतीसत्र घेतले.

● स्वामी ब्रह्मानंद शाखेत सूर्यनमस्काराच्या योग्य स्थितीचे प्रशिक्षण केतन खेडकर दादाने दिले.



ब्रिटिश राजवटीत केलेला पेटंट कायदा भारतीय औषध निर्माण क्षेत्राचं नुकसान करत होता हे लक्षात घेऊन १९७० मध्ये नवीन कायदा झाला. त्यामुळे औषध निर्माण क्षेत्राला संरक्षण मिळाले.

● स्वामी श्रद्धानंद शाखा – २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त कृतीसत्रात भारताचे कागदी नकाशे देऊन मुलांना भारताचे भौगोलिक स्वरूप, सीमा, राज्ये, केंद्रशासित प्रदेश यांची नावे लिहून देण्यात आली.

● नरवीर तानाजी मालुसरे शाखा – शाखेत २० ऑगस्टला तासिका प्रशिक्षण वर्गात झालेला 'मेक स्पेलिंग' हा उपक्रम शाखेत घेण्यात आला.

**✻ स्पर्धा ✻**

● समर्थ रामकृष्ण शाखा – शाखेत चित्रकला स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेसोबतच मुलांच्या कलेला वाव मिळावा म्हणून गणपती मूर्ती बनवायची कार्यशाळा घेण्यात आली. ह्या मूर्ती रंगवून त्यांचे घरी पूजन करण्यात आले.१३ ऑगस्टला 'शोध रे उत्तर शोध' अशी विशेष स्पर्धा घेण्यात आली.

● राजर्षी शाहू शाखा – दि. २४ मे ते ३१ मे या आठवड्यात शाहू करंडक स्पर्धा घेण्यात आली. विविध मैदानी खेळ, स्पर्धा जसे चक्रव्यूह, स्नॅप पॉईंट, पाककला, पद्यमंजुषा असे विषय होते. श्री. योगेश माकणे सरांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ झाला. नियमित दैनंदिनी लिहिणारा, सर्व कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होणारा आदर्श वर्धक म्हणून आदर्श गायकवाडने बाजी मारली. त्याचबरोबर आदर्श खेळाडू म्हणून लहान गटातून गणेश सूर्यवंशी व मोठ्या गटातून प्रताप पवार यांनी उत्तम खेळी करून मैदान गाजवले व वेळोवेळी गटाला विजय मिळवून दिला.

● स्वामी योगानंद शाखेत नवरात्रीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

● स्वामी सुबोधानंद शाखा : उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये शाखेत वाद्यवादन, वक्तृत्व, शक्ती–बुद्धी, टाकाऊपासून टिकाऊ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

**✻ सृष्टीचे मित्र आम्ही... ✻**

● क्रांतिज्योती सावित्री शाखा – दि. ०५ जूनला पर्यावरण दिनानिमित्त शाखेने भैरवसिंह घोरपडे उद्यानातील परिसराची स्वच्छता केली. कोविड–१९ नंतर प्रथमच झालेल्या या मोहिमेत उद्यानातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना वर्धिकांनी मदत केली, तर दि. २१ जुलैला शाखेची क्षेत्रभेट पर्वतीला झाली. मुलींना पर्वती परिसराची ऐतिहासिक माहिती सांगितली. उपलब्ध वस्तूतून मनोरे, घर, मंदिर अशा आकृती बनवण्याची गटशः स्पर्धा झाली. या गटकामात नेतृत्व, कल्पकता या गुणांना वाव मिळाला.

● स्वामी सुबोधानंद शाखेने २८ जुलैला वर्धापन दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम कार्यक्रम घेऊन ARAI टेकडी वर ३० नवीन झाडे लावली. या झाडांची देखरेख करण्यासाठी महिन्यातील दोन रविवार देण्याचा संकल्प करणात आला.

● शाहू शाखेतील मोठ्या गटातील मुलांचा शाखेतील सार्थक फाले या वर्धकाच्या गावी, नांदगाव–मुळशी येथे भातलावणीचा उपक्रम घेतला.

**✻ शाखाशः कार्यक्रम ✻**

● स्वामी श्रद्धानंद शाखेने इ. ४ थी ते इ. ९ वी तील सर्व मुलांसाठी दि. ५ मे रोजी बालमेळावा घेतला. वस्तीतील मुलांसाठी विविध स्पर्धा, कार्यशाळा, खेळ, गाणी अशी उपक्रमांची रेलचेल या मेळाव्यात होती.

● समर्थ रामकृष्ण शाखेत खजिना शोध या खेळात मुलांचे गट पडून प्रत्येक गटासाठी ८ टास्क दिले होते. प्रत्येक टास्कच्या चिठ्या बनवून त्या वर्धिनीच्या संपूर्ण इमारतीत वेगवेगळ्या जागेवर लपवून ठेवल्या होत्या. ह्या चिठ्ठ्यांवर बेरीज, गुणाकार, भागाकार व वजाबाकी यावरील उदाहरणे, काहींवर वर्ग, घन, तर काहींवर पाढे होते. शिक्षण आनंददायी करण्याचा हा प्रयत्न मुलांना खूप आवडला.१७ ऑगस्टला टाटा मोटर्स पिंपरी–चिंचवड, पुणे या ठिकाणी शाखेतील मुलांनी मल्लखांब प्रात्यक्षिके सदर केली. मल्लखांब झाल्यावर प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या. नेत्रदीपक प्रात्यक्षिकांतून मुलांनी उपस्थितांची मने जिंकली.

१६ डिसेंबर १९७१ – बांगलादेश मुक्ती युद्धात भारताने पाकिस्तानला बिनशर्त शरणागती पत्करायला लावली.

● क्रांतीज्योती सावित्री शाखा : शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त दि. २५ एप्रिलला मा. बागेश्री पोंक्षे यांनी हिमादास आणि कविता या दोन कर्तबगार मुलींची माहिती सांगितली. अतिशय बिकट परिस्थितीतही आयुष्य कसे उत्तम घडवता येते हे या दोन्ही उदाहरणांवरून मुलींना समजले. यासोबत आपण आपल्या मुलींना शाखेत का पाठवलं पाहिजे आणि शाखेत आल्याने त्यांच्यामध्ये होणारे बदल या विषयी दीदींनी उपस्थित पालकांशी संवाद साधला. शाखेने दि. २३ जूनला भैरवसिंह घोरपडे उद्यानात वारकऱ्यांसमोर पथक सादर केले. त्यांच्या मुलाखतीतून, गप्पांमधून दिंडीचा प्रवास वर्धिकांना समजला.

● स्वामी अखंडानंद शाखा : दि. १७ जून कै. ज्ञानेश पुरंदरे (ज्ञापू) यांच्या जन्मदिनानिमित्त शाखेत ज्ञापुंच्या प्रतिमेचे पूजन करून मंदार पोफळे दादाने ज्ञापुंच्या आठवणींना उजाळा दिला. दि. २५ जूनला व्यवस्था नियुक्ती कार्यक्रमात अनिकेत शिंदे दादाने वैयक्तिक नियोजनाचे महत्त्व सांगितले.

● धर्मवीर शंभुराजे शाखा : शाखेत दि. ११ एप्रिलला वर्धिनीचा युवा कार्यकर्ता आणि UPSC मध्ये निवड झालेल्या श्री. पार्थ कश्यप याच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला. पार्थ दादाने शाखेचा वर्धक ते अधिकारी असा प्रवास उलगडला. वर्धक, युवक असतानाचे शाखेतील अनुभव, आठवणी, त्याने अभ्यासासाठी घेतलेली मेहनत, शाखेतील कामाचा त्याच्या यशामध्ये झालेला उपयोग असे अनेक विषय त्याने गप्पांमधून मांडले. मुलांना पडलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. शाखेत दि. ३० जूनला स्वप्निल बिराजदार दादाने कथाकथन केले. शाखा परिसरातील जय भवानी-बुक सेंटर उद्घाटनाला शाखा पालक श्री. रामकृष्ण चिंचकर सरांसोबत शाखा गेली होती.

● स्वामी विवेकानंद शाखा : सूर्यनमस्काराच्या मंत्राचा सराव होण्यासाठी रोज फळ्यावर मंत्र लिहून वर्धकांचा सराव घेण्यात आला. नियमित पद्यसराव आणि परिपाठ सुरू करण्यात आला. युवकांसाठी वर्धन कृतीपुस्तिका प्रशिक्षण वर्ग झाला. शाखेत अक्षर सरिता फाउंडेशनतर्फे वाचन वर्ग सुरू आहे. श्री. पकंज मुंडे सरांनी शाखेत मानसिक विकास बैठका घेतल्या.

● स्वामी अभेदानंद शाखा : आपली भारतीय संस्कृती असत्याकडून सत्याकडे जा, अंधारातून प्रकाशाकडे जा, मृत्युकडून अमरत्वाकडे जा अशी शिकवण देते. तेजाचे, प्रकाश देणाऱ्या दिव्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दीप अमावस्येला शाखेत विक्रांत दिघे यांच्या हस्ते दीप पूजनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

● स्वामी ब्रम्हानंद शाखा : २६ सप्टेंबर रोजी सर्व मुलांची आरोग्य चाचणी घेण्यात आली. Activity Based Learning अंतर्गत गणितातील धन आणि ऋण संख्यामधील फरक ओळखा अशी activity घेण्यात आली.

### देणाऱ्याने देत जावे...

शाहू शाखेतील अमेय फाटकचा वाढदिवस झाला, तसा दरवर्षी त्याचा वाढदिवस थाटामाटात साजरा होतोच; पण या वर्षीच्या वाढदिवसाला एक आठवणीची किनार लागली. झालं असं... शाखेचा हॅलोजन दिवा जरा आजारी पडला. त्याला बरं करावं लागणार होतं, मग अमेय स्वतःहून म्हणाला, माझे वडिल हे काम करतील. अमेयचे वडील इलेक्ट्रीकल कंपनीमध्ये काम करतात. त्यामुळे अनेक इलेक्ट्रीकल उपकरणे दुरूस्त करण्याचा त्यांचा हातखंडा आहे. काकांनी तो दुरूस्त करण्यासाठी घेतला; पण त्याची अवस्था दुरूस्त होण्यासारखी नव्हती. अमेयचा वाढदिवस जवळ आला होता. या वर्षी वाढदिवसाला शाखेला हॅलोजन भेट देऊ असे त्यांनी ठरवले आणि अमेयच्या वाढदिवशी शाखेकडे नवीन हॅलोजन सुपूर्त केला. **शाखेची गरज ओळखून मदत करणारे पालक उभे राहिले की, आम्हा युवकांच्या पायात दहा हत्तींचे बळ येते.**



जुलै १९७२ - पाकिस्तान व भारत यांच्यात 'सिमला करार' झाला. युद्धबंदी रेषेचं रुपांतर नियंत्रण रेषेत (लाईन ऑफ कंट्रोल) करण्यात आले.

**✻ तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला... ✻**

एखाद्या कामाचा अनुभव घेतला की, त्या कामाची खरी ओळख होते. ज्या परिसरात आपण राहतो तो स्वच्छ ठेवण्याचे काम करतात सफाई कामगार. त्यांना आपण रोज रस्त्यावर झाडू मारताना, कचरा गोळा करताना, घंटा गाडीत कचरा घेऊन जाताना बघतो. पण हे काम नक्की एवढंच असतं का, कामाची रचना कशी असते, किती कष्ट असतात ह्या सगळ्यांचा अनुभव नुसत्या मुलाखतीतून, भेटीतून कळत नाही म्हणून भगिनी निवेदिता शाखेतील वर्धिकांनी या कामाचा कामगार दिनानिमित्त अनुभव घेतला. कचरा कसा एकत्र केला जातो, मग तिथून पुढे त्याचे वर्गीकरण, विघटन कसे करतात, घंटागाड्या एका हद्दीत किती असतात, त्याचे नियोजन कसे असते अशा प्रश्नांचे निराकरण अधिकाऱ्यांशी झालेल्या संवादातून मुलींना मिळाले. मुलींनी कचऱ्याच्या घंटागाडी सोबत प्रवास सुद्धा केला. या मिळालेल्या अनुभवातून यापुढे मुली स्वतः रस्त्यावर कचरा टाकणार तर नाहीतच आणि कोणाला टाकूही देणार नाहीत असा विश्वास वाटतो.

**✻ सहवासातून शिक्षणाचा प्रयोग – निवासी शिबिर ✻**

जवळपास तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शिबिराचे वारे वाहू लागले. कार्यकर्त्यांच्या व्यक्तिमत्वाला अनेक बाजूंनी, अनेक अनुभवांनी समृध्द करणारा विषय म्हणजे शिबिर. यावर्षीही वर्धक–वर्धिका विभागाची अनेक विषयांवर झालेली निवासी शिबिरे दैनंदिन शाखा कामाला उत्साह आणि ऊर्जा देऊन गेली.

**✻ वर्धिका विभाग शिबिरे ✻**

● **२५ तासांचे शिबिर –** दि. ५ व ६ मार्चला भगिनी निवेदिता शाखेच्या शिबिरात श्री. संदीप मोरे यांनी घेतलेल्या मानसिक विकास बैठकीत स्वामी विवेकानंद यांच्यावर आधारित गोष्टींच्या पुस्तकाचे वाचन झाले. लेखनकौशल्य या विषयावर सौ. अद्वैता उमराणीकर यांनी, खेळातून मूल्यवर्धन यावर श्री. सुरेश पवार यांनी, अभिनय कौशल्य यावर दिग्गज अभिनेते श्री. श्रीकांत यादव यांनी आणि कृतीसत्रात सौ. प्रतिभा भडसावळे यांनी वर्धिकांना मार्गदर्शन केले. अभ्यासक्रमातील संकल्पना स्पष्ट व्हाव्यात म्हणून झालेल्या विज्ञान सत्रात मुलींनी सादर केलेल्या प्रयोगांचे, प्रतिकृतींचे परीक्षण सौ. कोमल धायरकर यांनी केले. दोन वर्षांनंतर झालेल्या या निवासी एकत्रीकरणामुळे अनेक आठवणींची भर पडली.

● **उन्हाळी शिबिर :** कालावधी – दि. ६ ते ९ मे २०२२ विषय – कृतीतून शिक्षण.

शिबिराचे उद्घाटन सौ. शुभांगी तांबट यांनी केले. या सत्रात ताईंनी 'वर्धिनीत यायचे...' हे पद्य, 'साऱ्याच कळ्यांना...' ही कुसुमाग्रजांची कविता व वर्धिनीची प्रार्थना यातून आपण मुलगी म्हणून वर्धिनीत कशासाठी यायचे, वर्धिनीचे काम काय आहे, युवती झाल्यावर आपण वर्धिनीचे काम कसं करू शकतो या गोष्टी स्पष्ट केल्या.

● गायन व चित्रकला – दीक्षा बजाज ताईने पानांचे वेगवेगळे आकार काढून रंगवायला व त्यातून भेटकार्ड तयार करायला शिकवली. मकरंद पळसुले दादाने गाणं, पद्य म्हणताना आवाज कुठे वाढवायचा त्यातून त्याचा अर्थ भाव कसा आपल्यापर्यंत पोहोचतो हे सादरीकरणातून स्पष्ट केले.

● वाद्य परिचय – या सत्रात हरी धायगुडे व कौशिक केळकर या दादांनी चित्रफितीतून (व्हिडिओ) वाद्यांची ओळख करून दिली. आवाज ऐकून वाद्य ओळखा हा खेळ घेतला. ही ओळख लक्षात राहावी म्हणून पद्याला ताल/ठेका द्या व त्याचे सादरीकरण अशी गटशः स्पर्धा झाली. सौ. दीपाली पवार व श्री. सुमित डोळे हे परीक्षक म्हणून उपस्थित होते.

● प्रेरणा सत्रात मा. शिरीष पटवर्धन सरांनी वर्धिनीतून घडलेल्या युवतींची व त्यांच्या कामाची ओळख मुलींना करून दिली. काम करताना त्यांना आलेल्या अडचणींवर त्यांनी कशा प्रकारे मात केली हे ऐकून जिद्दीने, नेटाने काम केले पाहिजे हे वर्धिकांच्या लक्षात आले.

१९७२ मध्ये सुरू झालेला कलकत्ता मेट्रो प्रकल्प १९९४ मध्ये पूर्णत्वास आला.

● समारोप सत्रात समृद्धी यादव ताईने मा. रामभाऊ डिंबळे सरांची मुलाखत घेतली. यातून कोणती पुस्तके वाचावीत, आपले मित्र कसे असावेत, अभ्यास कसा करावा यावर विशेष मार्गदर्शन झाले.

❊ **हिवाळी शिबिर –** कालावधी – दि. २८ ऑक्टोबर ते दि. ३१ ऑक्टोबर विषय – मैत्री

संख्या – ८०, शिबिर प्रमुख – पायल जिरेसाळ. स्थळ – पुणे विद्यापीठ.

वर्धिनीच्या शाखेत वर्धक-वर्धिका रमतात त्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे एकमेकांमध्ये असणारी दृढ मैत्री. या पलीकडेही मैत्रीची संकल्पना वर्धिकांना कळावी यासाठी या शिबिरात मैत्री स्वतःशी, मैत्री आरोग्याशी, मैत्री वेळेशी, मैत्री कुटुंबाशी, मैत्री वर्धिनीशी अशा अनेक विषयांवरील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

● शिबिराच्या उद्घाटन सत्रात मैत्री कोणाशी करावी आणि मैत्री करताना चौफेर विचार कसा करावा, मैत्रीचे आयाम कोणते हे श्रीमती बागेश्री पोंक्षे यांनी सांगितले.

● 'मैत्री स्वतःशी' या विषयावर लहान गटात सुरेश पवार, तर मोठ्या गटात हर्षल सोनार यांनी विविध कृती आणि खेळातून वर्धिकांशी संवाद साधला.

● 'मैत्री कुटुंबाशी' या विषयावर अक्षय कदम दादाने विभक्त आणि एकत्र कुटुंब यावर चर्चा घेतली. दोन्ही गटातील सकारात्मक मुद्द्यावर आधारित समारोप केला. यात दादाने वाढणारी चिडचिड, घरातील हरवत जाणारा संवाद, नात्यात येणारा दुरावा हे टाळण्यासाठी काय करता येईल यावर संवाद साधला. सौगंध देशमुख दादाने कुटुंबातील वातावरण आनंदी, मैत्रीपूर्ण ठेवण्यासाठी माझी भूमिका यावर वर्धिकांशी संवाद साधला.

● 'मैत्री वर्धिनीशी' या विषयांतर्गत लहान गटाला संदीप मोरे यांनी वर्धिनीची स्थापना, संस्थापकांची माहिती, कोणकोणते विभाग आहेत, ते विभाग कोणकोणते काम करतात याआधारे वर्धिनीची ओळख करून दिली तर मोठ्या गटाला मंदार पोफळे यांनी हा विषय मांडताना वर्धिनीत घडलेल्या, आज चांगल्या पदावर कार्यरत असलेल्या वर्धिकांशी ओळख, वर्धिनीचे विभाग आणि कामाचे महत्त्व, घडलेल्या यशोकथा या मुद्द्यांवर संवाद साधला.

● विशेष प्रेरणा सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी यांनी 'मन वढाय वढाय' या काव्यपंक्तीचा आधार घेत मन कसं असतं, त्यावर नियंत्रण कसे ठेवावे, मन आपली ताकद कशी बनू शकते, याविषयी चर्चा केली.

● 'मैत्री आरोग्याशी' अंतर्गत स्पर्धा घेण्यात आल्या. लहान गटात आरोग्य केंद्राची प्रतिकृती बनवणे तर मोठ्या गटात उपलब्ध साहित्यापासून पोषक पदार्थ बनवणे ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये त्यांना काकडी, टोमॅटो, कांदा हे मुख्य साहित्य दिले होते आणि हे पदार्थ न शिजवता त्यांनी पदार्थ तयार केले.

● 'मैत्री वर्धिनीशी' या विषयाबाबत मुलींनी शिबिरातून कितपत माहिती मिळवली आहे हे तपासण्यासाठी 'कौन बनेगा शिबिरपती' ही प्रश्नमंजुषा घेण्यात आली. अतिशय चुरशीने आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्पर्धा पार पडली.

● शिबिराचा समारोप करताना श्री. अरविंद केळकर सरांनी आपण वेळेसोबत मैत्री कशी करू शकतो हे सांगितले. सरांच्या हस्ते स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

**❊ एक मूठ धान्य... ❊**

शिबिरांच्या पूर्व तयारीतील महत्त्वाची मोहीम म्हणजे धान्य संकलन मोहीम. आपल्या मातृसंस्थेच्या कामाची प्रभावी आणि तळमळीने मांडणी करून त्या विश्वासावर शिबिरासाठी आवश्यक सर्व शिधा देणगी रुपात मिळवणे हा उपक्रम आपण वर्षानुवर्षे यशस्वी केला आहे. दि. २८ मे रोजी १० वी ते टी. वाय. पर्यंतच्या ३०-३५ युवांनी अतिशय उत्साहाने धान्य संकलन मोहीम यशस्वी करत शिबिरासाठी आवश्यक शिधा संकलित केला.



४ सप्टेंबर १९७४ – सिक्कीम हे भारताचे सहयोगी राज्य झाले.

# समुपदेशन, स्पर्धा परीक्षा केंद्र, पहाट प्रकल्प



समुपदेशन - स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांसाठी सत्र



शालेय विद्यार्थ्यांसाठी पंचकोष विकास कार्यशाळा



स्पर्धा परीक्षा केंद्र - मार्गदर्शन सत्र



स्पर्धा परीक्षा केंद्र - शिष्यवृत्ती वर्ग



पहाट प्रकल्प - नीळकंठेश्वर सहल



पहाट प्रकल्प वस्ती उपक्रम

# महिला विभाग
# पाकोळी बालवाडी



न्युट्रिशन लॅब - रुग्ण सहाय्यक वर्ग



बचत गट महिला एकत्रीकरण



प्रौढ साक्षरता वर्ग



बालवाडी क्षेत्र भेट



बालवाडी अथर्वशिर्षपठण



हसत खेळत शिकूया

MHC

# MADHURA HEALTH CARE

## SLEEP & RESPIRATORY SOLUTION
## AVAILABLE FOR SALE & RENTAL SERVICE





**Office No. A-01, Mahesh Galaxy, Sinhagad Road, Near Sinhagad Institute, Vadgaon Budruk, Pune - 411 041.**

**Mobile : 9371676783 / 7774035585 / 9766872221 / 7774035583 / 9767196713**

**E-mail : madhurahealthcare27@gmail.com**

VIRTUAL ENTERPRISES

# Virtual Enterprises

Industrial Computer: Sales, Service, Repairing, Networking in domestic and industrial area.

## Deals in

- BENQ, Samsung : IFP
- Sennheiser
- Hikvision, CP+, Panasonic : Camera
- Dell , HP : Laptop, Computers
- Electrical, Electronic supply.

## Service and Maintenance

- ✓ CNC hard disc supply & maintenance.
- ✓ Repairing of : Drive card – Eg: Fanuc, Siemens
- ✓ HD, IP technology base system in the CNC.
- ✓ Biometric Access control

## Our Renowned Clients

- National Disaster Response Force, (NDRF)
- State Reserve Police Force, (SRPF)
- Parakh Agro Industries (Yavat)
- Sandvik Asia Pvt Ltd, (Dapodi)
- Dana Anand India Pvt Ltd, (Chakan)
- ETON , Denfauss , PMT Machine Tool, (PCMC)
- AAM Supa MIDC, Kirlosker (Kolhapur)
- Marlab Innovation







Reg Off: Audumbar Soc. CTS. 345 Ganesh Peth, 1st Floor.
Near New Milk Dairy, Pune Maharashtra, India Pin : 411002
Mob: 9881479699 - 7666389660 email : virtualenterprisespune@gmail.com

## ❊ वर्धक विभाग शिबिरे ❊

**❊ उन्हाळी शिबिर २०२२ –**

**छावणी घरोघरी...** शिवरायांच्या मावळ्यांना जशा लढाया नवीन नाहीत तैसेची वर्धिनीच्या युवांना शिबिरे नवीन नाहीत पण... यंदा शिबिरासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या कमी तर होतीच; पण त्यांना हवं तेवढं कौशल्य व अनुभव देखील नव्हता. सगळीच नुकतीच मिसरुडं फुटलेली तरणीबांड पोरं. हे समजताच तात्काळ सरसेनापती शुभमदादा जगताप यांनी हालचाली सुरू केल्या. भागप्रमुखांना निरोप धाडले. समोर परीक्षा, कामावर असलेल्या जबाबदाऱ्या, घरातली आजारपणं आणि कडक उन्हाळा यांचा सामना करत ही लढाई पार करण्याचा मनसुबा शाखा विभाग ठरवत होता. 'तुळापूरी धाकलं राजं' यांना मुजरा करण्यासाठी रणभूमी निश्चित झाली; फुलगावची सैनिकी शाळा. मग काय, सतीश बिराजदारने नोकरीवर सुट्ट्या घेऊन तर रोहन देशमुखने MBA चे शिक्षण थोडं बाजूला ठेवत जबाबदारी शिरावर घेतली. त्याला पश्चिमेकडून हत्यारबंद साथ दिली, मेघराज, किरण, ओम आणि नरवीर शाखेच्या सर्व युवकांनी. आशिष, सुजित, आकाश, सौरभ आणि रोहित यांनी शेवटपर्यंत हत्यारं खाली ठेवली नाहीत. मुळशी परगण्यातील धुरंदर मावळे, शेडगे व उभे या कामी फार उपयोगी आले. कुडज्याच्या पायगुडे सरदारांनी आपल्या वंशजांचे पराक्रम ध्यानात ठेऊन दुसऱ्याच दिवशी मोडलेल्या पायासहित मैदान गाठले. अक्षय, केतन, मुरली हे तरुण रक्त शांत तरी कसे बसेल? ते ही घुसलेच. त्यांनी गणेश तरंगे, ओम खंदारे, निखिल साबळे, सोहम इजंतकर, वैभव सकपाळ, पुष्कर सागडे यांना घोड्यावर बसायला लावलेच. लढाई सुरू होत असताना मावळे कमी असल्याने सरसेनापती थोडे गांगरले होते आणि वेताळ टेकडीच्या खोऱ्यातून आपली वानरसेना घेऊन कवी सुरेश पवार व हनुमान यांनी मैदान गाठले. मनोज बंडीवडार, गणेश कांबळे, हनुमान असे नामचीन योद्धे ज्यांनी भोजन सेनापती रुपेश उर्फ भावड्या यांना मजबूत रसद पुरवली. भागातून काही कमी पडू नये म्हणून अभिदा स्वतः मैदानात जातीने हजर होते. शिंग मनोऱ्यावरी वाजता उभी 'छावणी घरोघरी' हे वाक्य सगळे अनुभवत होते. हर हर महादेव युद्ध घोषणा देऊन तुकडी तुळापूरकडे निघाली.

● **शिबिराचा विषय 'शाखा हेच शक्तिकेंद्र' हा होता.** विविध खेळांच्या माध्यमातून शारीरिक कुशलतेचे प्रयत्न केले गेले. मानसिक आणि वैचारिक गुणवत्ता वर्धनासाठी उपासना, प्रबोधन आणि प्रेरणासत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर विविध पैलू पाडणारे उपक्रम घेण्यात आले.

● निसर्गरम्य शिबिर परिसर आणि तेथील प्रेरणादायी स्थळांच्या भेटी, यासोबतच घोडेस्वारी, संस्था संचालक निवासस्थानी राहण्याची संधी अशा घटनांमुळे शिबिरार्थीच्या अनुभव विश्वात भर पडली.

● जोनाथन पक्षाच्या समर्थ कथा, गरिबीतून सावरून शिक्षण संकुलाच्या उभारणीचा श्री. पायगुडे सरांचा प्रवास आणि सेवाव्रती कै. ज्ञानेश पुरंदरे यांच्या जीवन स्मृतींना उजाळा अशा प्रेरणा सत्रांनी शिबिरार्थी भारावून गेले.

● शिबिर चर्चासत्रे – वर्धकांमधील गुण वाढीस लागावे म्हणून शाखा का व कशासाठी, वर्धिनीतला मी आणि बाहेरील मी, सोशल मीडियाचा वापर कशासाठी, कोणासाठी, अशा महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चासत्रे घेण्यात आली.

● गणेशोत्सवात घेण्यात येणाऱ्या पथनाट्याची पूर्वतयारी व सराव म्हणून पथनाट्य कार्यशाळा सुरेश पवार आणि निलेश धायरकर यांनी घेतली. शिबिरार्थीचे गट पाडून त्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. शाखा का व कशासाठी, स्त्रीभ्रूण हत्या, सोशल मिडिया, संविधान जागरूकता अशा विषयांवर वर्धकांनी शिबीरात पथनाट्याचा सराव करून सादरीकरण केले.

● क्षेत्रभेट हे वर्धिनीच्या कामातील एक महत्त्वाचे अंग आहे. वर्धकांनी तीर्थक्षेत्र तुळापूर येथील संभाजी महाराज बलिदान स्थानाचे दर्शन घेतले. संगमेश्वर मंदिरात श्री. महेश पवळे यांनी छत्रपती संभाजी महाराज चरित्र मांडणी

केली. वर्धक तन्मय चलवादी याने अंगावर शहारे आणणारी अशी शंभूगाथा सादर केली. समारोप सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या उपस्थितीत बक्षीस समारंभ पार पडला.

**✻ हिवाळी शिबिर २०२२ ✻**

वर्धिनीच्या मनुष्य जडणघडणीच्या प्रयोगातील महत्त्वाचा भाग म्हणजे निवासी शिबिरे. शाखा विभागाचे हिवाळी शिबिर ३ ठिकाणी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत झाले.

**भाग १ व ३ –** विषय – ७५ वर्षे स्वातंत्र्याची – उत्कर्षाची – अभिमानाची. शिबिरार्थी संख्या – १८०,
शिबिर प्रमुख – अक्षय मुळे, शिबिर स्थळ – क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके स्मृती विद्यालय, रावडी, ता. भोर.

**भाग २ व ४ –** विषय – स्वतंत्र भारताची समर्थ वाटचाल, संख्या – १८०, शिबिर प्रमुख – सावतामाळी साळुंखे, स्थळ – रामेश्वर विद्यालय, विंग, ता. भोर जि. पुणे

**शिबिर स्थळाचा शोध –** गेली अनेक वर्ष आपली शिबिरे ही पुणे शहर परिसरात होत होती. आम्ही जेव्हा लहान होतो तेव्हा शिबिर ग्रामीण भागात होण्याचे प्रमाण जास्त होते. यावर्षी देखील हे शिबिर ग्रामीण भागात व्हावे यासाठी भागप्रमुखांनी आग्रह धरला. त्यामुळे आम्ही तळेगाव, मुळशी, खडकवासल्याच्या मागील भागातील गावांमध्ये, भोर तालुका अशा ठिकाणी शिबिर स्थळ शोधण्यासाठी भ्रमंती केली. ऐन पावसात तंबू–राहुट्या शिबिर किती प्रमाणात यशस्वी होईल याबाबत साशंकता होती, पण हे शिबिर तंबू–राहुट्यांमध्ये यशस्वी करण्याचा आणि त्या पद्धतीने आम्ही योजना आखत होतो.

**पूर्वतयारी –** शिबिर राहुट्यांमध्ये होणार असल्याने युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण होतेच. अनेक युवकांनी रजा टाकून या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी पसंती दर्शवली.

**शिबिराचा एकत्रित परिणाम –** वर्धिनीची शिबिरे व्यक्तिमत्त्व विकास साधणारी आणि स्वावलंबन शिकवणारी असतात. करोनानंतर अनेकांचे हे पहिलेच ग्रामीण शिबिर होते. ग्रामीण भागात शिबिर असल्याने मुलांमध्ये चैतन्याचे वातावरण होते. तसेच उत्साह दिसून येत होता. शहरापासून आपण शिबिरासाठी दूर आलो आहोत आणि येथून आपण काहीतरी चांगलं घेऊन जाऊ अशी भावना प्रत्येक युवकामध्ये आणि वर्धकामध्ये दिसली.

**– अक्षय मुळे**

**शिबिर क्र. १ – भाग २ व ४ –** विंग गावातील रामेश्वर विद्यालयात शाळेचे मुख्याध्यापक श्री. राऊत सर व श्री. अमोल लोखंडे यांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन दि. २७ ऑक्टोबरला झाले. दि. २८ ते दि. १ नोव्हेंबर या काळात विविध सत्रे झाली.

प्रबोधन सत्र – रोज सकाळची सुरुवात या सत्राने झाली. प्रथमेश राजगुडे दादाने श्री. वर्गीस कुरियन व अभय पोते दादाने चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके, निलेश धायरकर सरांनी प्रसिद्ध अंतराळ रॉकेट शास्त्रज्ञ नंबी नारायण यांच्या जीवन चरित्रातील प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या. शुभम जगताप दादाने विश्वविजेता भारत व भारताची प्रगती यावर मार्गदर्शन केले.

कृतिसत्र – ● ग्रामीण प्राथमिक व्यवसायांची माहिती विंग गावातील शेती, पशुपालन, कुक्कुटपालन, सेंद्रीय शेती, शर्यतीच्या बैलांचे पालन–पोषण, बांबू, हे व्यवसाय करणाऱ्या गावकऱ्यांशी प्रत्यक्ष भेटीतून मुलांनी घेतली. यातील काही शेतकरी श्री. सुभाष तांगडे (आंबा बागाईतदार), श्री. माणिक पाटील (सेंद्रीय शेती), श्री. समीर शेडगे (राजेवाडी गावचे सरपंच) यांच्या मुलाखतीतून मुलांशी संवाद झाला.

- श्री. प्रमोद खांडेकर सरांनी 'गेल्या ७५ वर्षातील भारतीय वैज्ञानिकांचे योगदान' हा विषय गोष्टीरूपातून मांडला.
- पोखरण अणुचाचणीवर आधारित 'परमाणू' हा चित्रपट मुलांनी बघितला व त्यावर गटचर्चा झाली.



१९ एप्रिल १९७५ – भारताचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' रशियातल्या कापुस्टीन यार या तळावरून अंतराळात सोडला.

● श्री. विलास कुलकर्णी सरांनी ‘विज्ञान शाप की वरदान’ ही चर्चा घेतली.
● श्री. श्रीकांत यादव सरांनी ‘चित्रपटसृष्टीतील प्रगती’ हा विषय मांडला.

स्पर्धा – ● गावात पाहिलेल्या प्राथमिक व्यवसायांवर आधारित आकाशवाणीसाठी जाहिरात करणे. ● दिलेल्या साहित्यातून फोटोंच्या आधारे क्षेपणास्त्रांच्या प्रतिकृती बनवणे उदा. पृथ्वी, अग्नी. ● क्षेपणास्त्रासंबंधी पोस्टर बनवणे. ● ‘भारत जोडो’ या संकल्पनेवर आधारित खजिना शोध. ● गीत गायन – भारताची प्रगती व कीर्ती लक्षात येईल अशी गीते रामेश्वर मंदिरात गावकऱ्यांच्या उपस्थितीत सादर झाली.

समारोप – वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदय गुजर व श्री. विजय नवले यांच्या उपस्थितीत शिबिराचा समारोप झाला. त्यांनी स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन वर्धकांचे कौतुक केले. श्री. गुजर सरांनी वर्धिनीच्या प्रार्थनेतील ‘जनांचा प्रवाहो इथे चाललेला...’ या कडव्याचा अर्थ स्पष्ट करत भारतमातेची वेगवेगळ्या रीतीने सेवा करण्यासाठी सर्वांना प्रेरित केले.

**शिबिर क्र. २ – भाग १ व ३ –** शिबिराचे उद्‌घाटन श्री. राजेंद्र कचरे (उपजिल्हाधिकारी, भोर) आणि वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. समीर ऐनपुरे (तलाठी) यांच्या हस्ते झाले. शिबिरात डॉ. विनेश नगरे यांनी ‘कॉमनवेल्थ प्रवास’, डॉ. विनायक गोखले यांनी ‘शेती’, डॉ. संजय तांबट यांनी ‘संस्थानांचे विलिनीकरण व सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान’ अशा विविध विषयांवर प्रेरणासत्रे मांडली. क्रीडानगरीचे मॉडेल बनवणे, ग्रामीण भागाचे दर्शन, भारत जोडो या विषयावर आधारित खजिना शोध अशा कृतीसत्रांमध्ये मुले रमली. गटचर्चेच्या विशेष उपक्रमात ग्रामीण व शेती क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या राहीबाई पोपरे, श्री. अण्णा हजारे व श्री. भास्करराव पेरे पाटील यांच्या कामाचा अभ्यास गटांनी मांडला. रात्र कार्यक्रमात शेकोटीचा आनंद घेत विविध गुणदर्शन आणि पद्य मैफिलीने रंगत आणली. समारोप सत्रात श्री. संतोष खोपडे यांनी ‘मावळ प्रांताचा इतिहास’ या विषयावर वर्धकांना मार्गदर्शन केले.

## ❊ जीवन शिक्षण उपक्रम – वर्धन पुस्तिका ❊

घोषणांच्या आवाजांनी दुमदुमणारं मैदान, स्पर्धांमधली ती चुरस, सगळ्यांनी एकत्र मन लावून केलेले अभ्यासातील प्रयोग, चुलीपर्यंत होणाऱ्या संपर्काचा आनंद अशा अनेक गोष्टींनी शाखा फुलते. शाखा कामाला गुणात्मक बळकटी देण्यासाठी शाखा विभागाने जीवन शिक्षण उपक्रमा अंतर्गत **वर्धन कृतिपुस्तिका** हा उपक्रम सुरु केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा नुसार जे ३ टप्पे करण्यात आले आहेत त्याचप्रमाणे आपण वर्धन पुस्तिकेचेही इयत्तेनुसार ३ री ते ५ वी, ६ वी ते ८ वी आणि ९ वी ते १२ वी या तीन गटात विभागणी केली आहे. या शैक्षणिक वर्षात शारीरिक विकास, प्रेरणा जागरण व मूल्यवर्धन, तंत्रज्ञान, प्रज्ञा विकास, अभ्यास तंत्र, प्रतिभा विकास, जीवन कौशल्य, ‘स्व’ जाणीव या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या आयामांवर आधारित दर दोन महिन्यातून एक अशा एकूण ६ पुस्तिका प्रकाशित करण्याचे नियोजन आहे. त्यापैकी चार पुस्तिका मुलांपर्यंत पोहोचल्या आहेत. पुस्तिका तयार झाल्यावर त्यातील प्रत्येक उपक्रमाचे तपशिलात प्रशिक्षण घेतले जाते व त्याची स्वतंत्र मार्गदर्शन पुस्तिकाही युवांना दिली जाते. सदर उपक्रमाचे दैनंदिन शाखांवर अभ्यासपूर्ण उपक्रम घेण्यासाठी युवांना फायदा होत असल्याचे खालील प्रातिनिधिक प्रतिक्रियांतून जाणवते.

**Out of the Box विचार करण्याची सवय लावणारा उपक्रम –** वर्धन कृती पुस्तिका म्हणजे विद्यार्थ्यांना वर्ग खोली पलीकडे, हसत खेळत शिक्षणाची गोडी लावणारे विशेष बोलके शैक्षणिक अंक. अनौपचारिक, शिक्षण पद्धतीने सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अनेक बदल घडवता येतात हे माझ्या वाचनात आले होते; पण वर्धिनीमध्ये कृती पुस्तिकेद्वारे याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत आहे याचा अत्यंत आनंद होत आहे.

**– श्री. चेतन कुसाळकर,** युवा विभाग प्रमुख

१९७७ – थोर शेती शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वामुळे
हे वर्ष हरितक्रांतीच्या यशाचे निर्णायक वर्ष ठरले.

**शैक्षणिक संक्रमण उत्सवात आम्हीही कृती पुस्तिका बनवली.** वर्धन पुस्तिका म्हणजे मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास करणारा, त्यांना एका वेगळ्या भावविश्वात घेऊन जाणारा उपक्रम. यातून प्रेरणा घेऊन आम्ही युवकांनी मिळून संक्रमण उत्सवाच्या निमित्ताने अशीच एक अभ्यास पुस्तिका तयार केली.

– **सतीश बिराजदार,** भागप्रमुख – भाग ३

**कृतीयुक्त शिक्षणाचा प्रयोग –** शिक्षण प्रक्रियेत कृतीयुक्त शिक्षण हे नेहमीच प्रभावी ठरते. यातून अध्ययन, अध्यापनातील गुणवत्ता साधली जाते. याचाच प्रत्यक्षात विचार आणि आखणी वर्धन पुस्तिकेच्या माध्यमातून शाखा विभागाने केला. प्रत्यक्ष भाषेतील कृती कार्यक्रम, विज्ञान प्रयोग, गणितातील गमतीजमती, मूल्यवर्धन उपक्रम अशा अनेक माध्यमातून वर्धकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात पुस्तिका महत्त्वाची भूमिका बजावते.

– **अक्षय कदम,** भागप्रमुख – भाग ४

पुस्तिकेने मुलांसोबत मलाही शिकवले. मुलांकडून पुस्तिका सोडवून घेताना मलाही अनेक नवीन गोष्टी समजल्या. बुद्धीला चालना मिळाली. गेली चार वर्षे वर्धिनीशी जोडली गेलेली असूनही वर्धिनीची संपूर्ण माहिती नव्हती. या पुस्तिकेमुळे मला ती मिळाली. स्वतःच्या शैक्षणिक विकासातही या उपक्रमाचा मला फायदा झाला.

– **रसिका लोंढे,** ज्ञानज्योती अभ्यासिका

**✼ पालक कट्टा ✼**

● **धर्मवीर शंभुराजे शाखा –** दि. २९ जानेवारीला १० वीतील वर्धकांच्या पालकांची सभा झाली. पालकांना मुलांचा अभ्यास चांगला व्हावा यासाठी केलेले नियोजन सांगितले व त्यांनी या नियोजनाला संमती दिली. तसेच शाखेने प्रगती पालक मेळाव्याचे आयोजन दि. ७ मे ला केले. या मेळाव्याला मा. श्री. रामभाऊ डिंबळे सरांची विशेष उपस्थिती होती. २९ जणांना प्रगती पालक या योजनेविषयी अत्यंत सुरेख मार्गदर्शन केले.

● **भगिनी निवेदिता शाखेत** दि. ३० जुलैला सौ. मंजूषाताई कुलकर्णी यांनी पालकांशी संवाद साधला. याशिवाय पालकांसाठी विशेष खेळांचे आयोजन केले त्यातील काही अनुभव...

१. श्रद्धा कांबळे : आजच्या कार्यक्रमामुळे दैनंदिन जीवनातून महिलांना स्वतःसाठी थोडासा वेळ देता आला.

२. रेवती काकडे : खूप दिवसांनी खेळ खेळायला मिळाले. त्यामुळे शाळेची आठवण आली.

३. राजश्री गायकवाड : परत एकदा बालपण जगलो असे वाटले.

● **स्वामी सुबोधानंद शाखेत** दि. ३० जुलैला शाखेत नव्याने आलेल्या वर्धकांच्या पालकांची सभा घेण्यात आली.

● **राजर्षी शाहू शाखा –** दि. १ ऑक्टोबरला जवळपास ४० पालकांच्या उपस्थितीत आगामी परीक्षा आणि पालकांची भूमिका या विषयावर पालकसभा घेण्यात आली.

● **क्रांतीज्योती सावित्री शाखेत** दि. १७ जुलैला कोमल धायरकर यांनी वर्धिनी आणि शाखा काम याची माहिती उपस्थित पालकांना देत शाखेत नियमित येण्याचे महत्त्व आणि पालकांची भूमिका याविषयी संवाद साधला.

● **स्वामी विवेकानंद शाखा –** दि. २१ जुलैला श्री. हर्षल सोनार याने शाखेतील पालकांशी 'वर्धिनी परिचय' या विषयावर संवाद साधला.

● **स्वामी अभेदानंद शाखा –** दि. ४ सप्टेंबर रोजी श्री. विक्रांत दिघे यांनी पाल्याला घडवताना पालकांची भूमिका काय असावी ? शाखेत येण्याचा वर्धकांना काय फायदा होतो ? या विषयी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले.

● **स्वामी दयानंद शाखा –** दि. ५ नोव्हेंबरला शाखा आणि परिसरातील महिला पालकांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा घेण्यात आली. यात महिला पालक उत्साहाने सहभागी झाल्या.



रक्तहीन क्रांती – मार्च १९७७ मधील स्वतंत्र भारतातील सर्वात महत्त्वाची निवडणूक ठरली आहे. या निवडणुकीत जनता पक्षाचा विजय झाला. भारताच्या लोकशाहीची भक्कम पुनःस्थापना झाली.

# युवा विभाग

'हम करें राष्ट्र आराधन' या पद्याच्या ओळीतून अभिप्रेत असणारे ध्येय समोर ठेवून युवा विभाग काम करत आहे. कार्यकर्त्यांच्या विचार मंथनातून विभागाची रचना निश्चित करण्यात आली. त्यामध्ये निर्माण शाखा, नेतृत्व शाखा आणि प्रेरणा शाखा या तीन टप्प्यांवर विशिष्ट उद्दिष्टे ठरवून नियोजनपूर्वक काम केले जाते.

**निर्माण शाखा** ✻ वयोगट –१६ ते १८ वर्ष ✻ संख्या–९५ ✻ मुख्य विषय – सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास
**नेतृत्व शाखा** ✻ वयोगट– १८ ते २५वर्ष ✻ युवक संख्या – १६०
✻ मुख्य विषय – शैक्षणिक प्रगती, नेतृत्व विकास व कौशल्य संवर्धन
**प्रेरणा शाखा** ✻ वयोगट – २५ ते ४५ वर्ष ✻ मुख्य विषय – संघटन आणि समर्पण

## निर्माण शाखा

### शैक्षणिक वर्ष २०२२–२३ नियुक्त्या आणि शुभेच्छा कार्यक्रम

तोच जोश...तोच उत्साह... बदल फक्त एवढाच ''नवीन व्यवस्था...'' ''नवीन संकल्प...'' ''नवीन उद्दिष्ट...''
भाग १ (वर्धक पेठ भाग) दि. १२ जूनला नियुक्ती कार्यक्रम पालकांच्या उपस्थितीत झाला. श्री. मंदार पोफळे यांनी उपस्थित पालक व युवकांशी संवाद साधला. दि. २९ मे ला गोपीनाथ मुंडे सभागृह बिबेवाडी येथे भाग २ चा नियुक्ती कार्यक्रम श्री. निशिकांत वाईकर, श्री. प्रशांत कवडे व श्री. विनोद बिबवे यांच्या उपस्थितीत उत्साहात झाला. दि. २२ मे च्या भाग ३ नियुक्ती कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. केदार भंडारे व श्री. अजित नाईक उपस्थित होते. दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी युवक म्हणून आपण संकटांना कसे सामोरे गेले पाहिजे, शाखेतील विविध व्यवस्था कशा हाताळल्या पाहिजे या विषयावर मार्गदर्शन केले. भाग ४ गोखलेनगर नियुक्ती कार्यक्रम दि. १५ मे ला तर भाग ५ वर्धिका युवती गटाचा कार्यक्रम दि. १९ जूनला साजरा झाला. सर्व नवनियुक्त भाग प्रमुख आणि शाखा संच यांनी उत्साहाने कामाला सुरुवात केली आहे.

### १० वी – १२ वी एकत्रीकरण

वर्धिनीच्या युवा विभागातील महत्त्वाचा टप्पा निर्माण शाखा. यावर्षी १० वी आणि १२ वी ची परीक्षा दिलेले युवा कार्यकर्ते वर्धिनी विचारांशी जोडले जावेत आणि युवक म्हणून उत्साहाने कामात सहभागी व्हावे म्हणून सर्व भागांनी १० वी १२ वी संवाद एकत्रीकरणाचा कार्यक्रम घेतला.
दि. ९ व १० मे रोजी कर्वेनगर व सिंहगड भाग ३ मधील १० वी व १२ वीतील वर्धकांचे एकत्रीकरण किल्ले सिंहगड येथे करण्यात आलं. पद्य, गप्पा-गोष्टी करत सगळी मंडळी गडावर पोहचली. रात्री श्री. निलेश धायरकरांनी 'माझ्या आयुष्यातील मी शिवाजी' हा विषय मुलांसमोर मांडला. त्यानंतर सहभोजन कार्यक्रम संपन्न झाला. समाजातील

१९७७ मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती वि. स. पागे यांनी विकसित केलेली 'रोजगार हमी योजना' राष्ट्रीय आदर्श ठरली. मागेल त्याला काम या सूत्रावर कायद्यानं त्याची आखणी झाली.

अनेक समस्यांवर अनौपचारिक गप्पा झाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना व आपण या दोन महिन्याच्या सुट्टीमध्ये कोणत्या नवनवीन गोष्टी शिकणार, कोणत्या पूर्ण करणार याविषयीचा संकल्प कार्यकत्यांनी केला. राजे शिवराय प्रतिष्ठानकडून श्री. शिवाजी खरात सरांनी नरवीर तानाजी मालुसरे मूर्तीचे पूजन केले. त्यानंतर सरांनी युवकांचे वर्धिनीच्या कामातील महत्त्व अधोरेखित केले.

समर्थ रामकृष्ण शाखा, स्वामी योगानंद शाखा, स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवांचे एकत्रीकरण भावे प्राथमिक शाळेत घेण्यात आले. मैदानी खेळ, चर्चासत्र आणि वैयक्तिक संवाद साधण्यात आला. करियर गप्पा अंतर्गत श्री. अविनाश धायरकर (व्यावसायिक), श्री. केतन क्यादर (प्राध्यापक), श्री. अक्षय गायकवाड अशा वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी १० वी १२ वी गटाशी संवाद साधला. भाग २ चा हा संवाद कार्यक्रम दि. २ व ३ मे ला पार पडला. यामध्ये प्रत्येक युवकाचे पुढील तीन महिन्यांचे वैयक्तिक नियोजन करून घेण्यात आले.

**उत्तम वक्ते तयार करूयात...**

'निर्माण' शाखेअंतर्गत युवा विभाग सातत्याने युवांमधील वक्तृत्व कौशल्य वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. दि. ६ फेब्रुवारीला प्रा. विजय नवले यांनी २७ युवांची वक्तृत्व कार्यशाळा घेतली. विषय मांडण्यासाठी वाचनाची आवश्यकता असल्याने पुस्तकातील मुद्दे कसे काढायचे व इतर माध्यमांचा वापर कसा करायचा याविषयी चर्चा झाली. बोलताना किस्से, अनुभव सांगता आले पाहिजेत, विचार करता करता बोलता आले पाहिजे व बोलता बोलता विचार करता आला पाहिजे, बोलताना विनोद करता आला पाहिजे हे उदाहरणासहित समजून सांगितले.

**आम्ही बी घडलो...**

नरवीर तानाजी मालुसरे यांचे दैनंदिन पूजन करणाऱ्या 'राजे शिवराय प्रतिष्ठान'च्या कार्यकर्त्यांचा सेवेकरी मेळावा झाला. हा कार्यक्रम Facebook वर Live करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली होती, म्हणून कार्यक्रमाला वेळेपूर्वी पोहचलो. साऊंड, माईक या तांत्रिक गोष्टींची तपासणी चालू असताना शिवा सरांनी मला बोलावलं आणि 'मनोगत करशील का' असं विचारलं. माझी प्रश्नार्थक मुद्रा पाहिल्यावर त्यांनी लगेच, 'अरे आपलाच कार्यक्रम आहे, खूप जण नाहीयेत. करशील तू...' असं सांगितल्यावर त्यांना नाही म्हणण्याचे धाडस मला काही झालं नाही. प्रत्यक्ष कार्यक्रम सुरू झाला तेव्हा मी बोलू शकेन का याचीच शंका मनात दाटून आली. इतक्यात माझी नजर स्टेजवरच्या ज्ञापुंच्या तसबिरीकडे गेली. त्यांची ती प्रसन्न मुद्रा आणि जणू माझ्याकडेच बघून स्मित हास्य करत ''करशील रे तू...'' असा आग्रह त्यात जाणवला. आणि मग काय, माझं नाव पुकारल्यानंतर दोनच मिनिटे मी बोललो. अडखळलो नाही, विषयांतर झाले नाही. अपेक्षित व मुद्देसूद मनोगत झालं. कार्यक्रम झाल्यानंतर सर्वांनी कौतुक केलं. मी मात्र करू शकलो ज्ञापुंच्या प्रोत्साहनामुळे आणि आग्रहामुळे. खरंतर छत्रपती शिवराय, शंभूराजे, नरवीर तानाजी मालुसरे, सूर्याजी, बाजीप्रभू, मुरारबाजी, येसाजी कंक, शिवा काशिद, जिवा महाला, इतकेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील असंख्य क्रांतिकारक आमच्यासमोर गोष्टीरूपात उभे केले ते ज्ञापुंनीच. आज ते सोबत असल्याचा अनुभव पुन्हा एकदा आला.

**– अक्षय मुळे**

**करियर निर्णय**

११ वी व १२ वी मधे शिकत असताना युवकांना आपण ज्या क्षेत्रात करियर करणार आहोत, त्या क्षेत्रातील २०० हून अधिक करियरच्या वाटा ज्ञात करण्यासाठी 'करियर निर्णय' कार्यक्रम घेण्यात आला. प्रा.विजय नवले सर यांनी अनेक वर्षांच्या अनुभवांवरून करियर निर्णय तयार केले. करियर निर्णय सोबत सरांनी करियर प्रश्नमंजुषा तयार केली. याचा उपयोग सर्व युवकांना झाला. प्रत्येक युवकाला अनेक करियरची ओळख झाली. हा कार्यक्रम एकूण ४



२ ऑक्टोबर १९७९ – उत्पादक साधन संपत्तीची निर्मिती या आशयातून एकात्मिक ग्रामीण विकास योजनेला सुरुवात झाली.

भागांमध्ये घेण्यात आला आणि एकूण उपस्थित संख्या ८८ अशी होती.

**हरीश्चंद्रगड मोहीम**

दि. १३ ते १५ फेब्रु. २०२२ या कालावधीत ११ वीतल्या ४० वर्धकांची सहल उत्साहाने व जोमाने पार पडली. एकत्रीकरण झाल्यावर प्रबोध सभागृहात शिववंदना घेऊन सहलीसाठी प्रस्थान केले. प्रवासात डफाच्या तालावर पद्य मैफिलीने रंगत आणली. रात्री गडावर पोहोचल्यावर सोमेश्वर मंदिरात पसायदान घेऊन दीपविसर्जन झाले. दुसऱ्या दिवशी पहाटे उपासना आणि प्रबोधनाने दिवसाची सुरुवात झाली. आकाश देशमुख दादाने शैक्षणिक शाखेनुसार (विज्ञान, वाणिज्य, कला) गट केले. प्रत्येक गटाला रात्रीच्या स्पर्धेची माहिती देऊन तयारी करण्यास सांगितले. गटानुसार खेळ घेण्यात आले. त्यातील दंड रिंग, कबड्डी, ध्वज युद्ध, रस्सीखेच. खेळांनी आणि घोषणांनी गड दुमदुमून गेला.

प्रेरणा सत्रात जितेंद्र कोठारी यांनी वर्धिनीचा युवक कसा असावा, युवक म्हणून आपण समाजातील समस्यांना कसे सामोरे गेले पाहिजे याविषयी संवाद साधला. गणेश गुहा व इतर आठ गुहा, कोकणकडा, तारामती शिखर, केदारेश्वर मंदिर (शंकराची पिंड), सोमेश्वर मंदिर युवकांनी बघितल्यानंतर गणेश गुहेत गणपतीची आरती करण्यात आली.

आकाश देशमुख दादाने SWOT Analysis (Strength - क्षमता, Weakness - कमतरता, Opportunity - संधी, Threats - धोके) यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी तारामती शिखरावर ध्वजवंदन करून परतीचा प्रवास त्याच उत्साहात झाला.

**नेतृत्व शाखा**

**मासिक प्रबोधन वर्ग**

वर्धिनीचे मुख्य उद्दिष्ट नेतृत्व निर्माण करणे व त्याचा उपयोग समाज हितासाठी करणे हे आहे, यासाठी या वर्षापासून मासिक प्रबोधन वर्गाची संकल्पना घेऊन पेठ, बिबवेवाडी, पद्मावती, सिंहगड रोड, कर्वेनगर, शिवाजीनगर या भागांमधील युवकांच्या करियर, शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय विषयांवर आधारित प्रबोधन वर्गाची बांधणी करण्यात आली.

* भाग १ (पेठ परिसर) भागातील सर्व शाखांचा व्हॉलीबॉल खेळ झाला. त्यानंतर शुभम जगताप दादाने ॲनिमेशनच्या मदतीने युवकांना स्वतःच्या छंदाची ध्येयनिश्चिती करून त्याचे विश्लेषण SMART - Specific, Measurable, Actionable, Relevant. Time Bound या तंत्राने करून घेतले.

* भाग २ मध्ये सुरुवातीला १ तास फुटबॉल खेळून वर्गाची सुरूवात झाली. त्यानंतरच्या सत्रात मासिक प्रबोधन वर्गांचा उद्देश काय, त्यातून आपल्याला काय अपेक्षित आहे, नक्की काय साध्य करायचे आहे हे सांगितले. आकाश देशमुख दादाने स्वतःसाठी SWOT Analysis म्हणजे काय, ते का गरजेचे असते, हे दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणांतून समजावून सांगितले. SWOT Analysis ही एक निरंतर प्रक्रिया असल्याने आपले सामर्थ्य ओळखून, कमतरता लक्षात घेऊन, भविष्यातील संभाव्य अडचणी, धोके लक्षात घेऊन आपल्या क्षमता अधिकाधिक विकसित कराव्यात जेणेकरून आलेल्या संधीचे आपण सोने करू शकू असे मार्गदर्शनात दादाने सांगितले. समारोप करताना श्री. संजय तांबट यांनी सीगल जोनाथनची गोष्ट युवकांना सांगितली. तसेच मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी, महाराष्ट्रातील सत्तांतर याविषयी चर्चा केली.

* कर्वेनगर, सिंहगड भागाच्या ३ जुलैच्या वर्गाला ३० युवक उपस्थित होते. युवकांच्या मैदानी स्पर्धा झाल्या. प्रार्थनेनंतर परिचय घेण्यात आला. आपले शिक्षण, आरोग्य, वैयक्तिक छंद आणि कुटुंब या चार गोष्टींबाबत स्वतःची ध्येयनिश्चिती करायला सांगितली आणि नंतर यावर चर्चा घेण्यात आली.

* भाग ३ (कर्वेनगर, सिंहगड रोड) – दुसऱ्या वर्गाची सुरुवात बुद्धीबळ, कॅरम या खेळांनी झाली. पुणे विद्यापीठातील पत्रकारिता विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रसाद पवार यांनी SWOT Analysis या विषयावर मार्गदर्शन केले.
* गोखलेनगर भाग (स्वामी अभेदानंद आणि स्वामी विवेकानंद शाखा) दि. १२ जूनला शैक्षणिक वर्षाची सुरुवात युवक प्रशिक्षण कार्यशाळेने झाली. सुरुवातीला खेळ झाले. श्री. सुमित डोळे यांनी वर्धिनीच्या कामातील नियोजनाचे महत्त्व, श्री. सुरेश पवार यांनी वैयक्तिक ध्येय आणि कु. हनुमान मेकडे यांनी नियोजन कौशल्य आधारित सत्रे घेतली. भाग व्यवस्थाप्रमुखांनी शाखा व्यवस्थाप्रमुखांची उद्दिष्ट निश्चिती करवून घेतली. नियोजन करताना लक्षात घ्यायचे बारकावे सांगितले. पूर्व नियोजनासाठी वर्धिनीच्या मोठ्या कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन करवून घेतले. (उदा. संक्रांत उत्सव, व्यावसायिक युवक मेळावा)
* भाग ४ (गोखलेनगर) रन राऊंडसच्या स्पर्धेने युवक शाखेची सुरुवात झाली. अनेक दिवसांनी मैदानात घाम गाळून सर्व युवक उत्साहाने सत्रासाठी / प्रशिक्षणासाठी सज्ज झाले. उपक्रमांची व कामाची मांडणी (Presentation), त्याची पूर्वतयारी व प्रकार, फोटो आणि मजकुराचे प्रमाण किती असावे या मुद्द्यांच्या आधारे श्री. विक्रांत दिघे सरांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनच्या साहाय्याने युवकांना मार्गदर्शन केले.

**राजमाची सहल**

हिवाळी सहल, दि. ६ व ७ फेब्रुवारी २०२२, ठिकाण – राजमाची (लोणावळा), एकूण – ४८ युवक.
सहल प्रमुख – वैभव दळवी, सहाय्यक – प्रथमेश राजगुडे, किरण ननावरे.
एकत्रीकरणानंतर सर्वांचे परिचय आणि शिववंदना झाल्यावर सहलीसाठी प्रस्थान केले. प्रवासाचा आनंद म्हणजे पद्याची अंताक्षरी ! इतरांना सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या डफाच्या तालावरील उत्तम शैलीत पद्य म्हणत प्रवास झाला. जेवण झाल्यानंतर निवासाच्या ठिकाणी 'माझं करियर काय व कशासाठी आणि त्याच्या दिशा कोणत्या' यावर श्री. निलेश धायरकर यांनी संवाद साधला गेला. पसायदान होऊन समारोप झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी उपासना, प्रबोधन झाल्यांतर रोहित धायरकर दादाने छत्रपती शिवराय आणि बाजीप्रभू देशपांडे यांचा इतिहास सांगितला. चेतन कुसाळकर दादाने आपल्या शैक्षणिक शाखेनुसार (विज्ञान, वाणिज्य, कला) गट केले. प्रत्येक गटाला सादरीकरणासाठी एक – एक विषय दिला.
विज्ञान – समाजातील असे प्रश्न त्याचे उत्तर म्हणजे शाखा,
वाणिज्य – पद्य 'हेची येळ देवा...',
कला – किल्ल्याच्या परिसरातील प्रत्येक गोष्ट/वस्तू आपल्याला काय शिकवते.
पद्य म्हणत, फोटो काढत, गडावर पोहोचलो. प्रत्येक गटाने गडावर पोहोचल्यावर सादरीकरण केले. गटानुसार चर्चा करत जोरदार घोषणा देत, गडाचा इतिहास जाणून घेतला. नंतर 'अफजलखानाचा वध' यावर रचलेला पोवाडा गायला. 'छत्रपती शिवरायांच्या इतिहासातून आपण काय शिकलं पाहिजे', आपल्या दैनंदिन जीवनात साजेशा उदाहरणावरून अभय पोते याने प्रभावी शैलीत विचार मांडले. पोलीस पाटील श्री. सुभाष वरे आणि त्यांच्या पत्नी सुनिताताई यांनी (राष्ट्रीय खेळाडू कबड्डीपटू) मुलांशी सवांद साधला.

**MBA एकत्रीकरण**

व्यवस्थापन विषयामध्ये शिक्षण घेणाऱ्या युवकांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. एमबीएला प्रवेश घेऊ इच्छिणारे युवक, एमबीएचे शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि या विषयातील शिक्षण पूर्ण केलेले कार्यकर्ते यांच्याबरोबर स्वामी सुबोधानंद शाखेचे श्री. हेरंब कुमठेकर यांनी त्या क्षेत्रातील करियर आणि पुढील संधी यावर संवाद साधला. मोटीसन ग्रुपमध्ये जनरल मॅनेजर पदावर कार्यरत असलेले श्री. हेरंब कुमठेकर गेली दहा वर्षांहून अधिक दक्षिण


१९ जून १९८१ – 'ॲपल' – भारताचा पहिला संपर्क दळणवळण क्षेत्रातला उपग्रह, फ्रेंच गियानाच्या तळावरून अवकाशात सोडला.

आफ्रिका खंडातील विविध देशात काम करत आहेत.

**सुखद अनुभव**

मी रामकृष्ण शाखेचा शाखा प्रमुख असताना एक उपक्रम घेतला होता, तो असा की, आपण होळीच्या दिवशी होळीला नैवेद्य दाखवतो. पण तो नैवेद्य होळीमध्ये जळून त्याची राख होते. शाखेत असताना आम्ही जागोजागी होळीच्या ठिकाणी जाऊन होळीत जाणारे नैवेद्य गोळा करू लागलो आणि ते सगळे अन्न आम्ही पुणे स्टेशन जवळील फुटपाथवर राहणाऱ्या लोकांना देऊन येत होतो. हे आम्ही करत असताना आमच्या भागातील आजी म्हणजे आमच्या नानु आजीही आमच्या उपक्रमात सामील झाल्या. पुढील काही वर्षे आम्ही हा उपक्रम चालू ठेवला पण काही काळाने आम्हाला ते करता आले नाही. पण नानु आजी प्रत्येक वेळी मला घरी बोलवायला येतात आणि नैवद्य आणून देतात. आपण केलेला एखादा उपक्रम किती परिणामकारक असतो याचा मला अनुभव आला.

**– अक्षय भेगडे**

**प्रेरणा शाखा**

**समर्पण दिन**

संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांच्या कल्पनेतून आणि अफाट परिश्रमातून जन्माला आलेला वर्धिनीचा कल्पवृक्ष कायम फुलत रहावा व या सामजिक कामाला कधीही आर्थिक दृष्टीने कमतरता येऊ नये म्हणून संस्थेचे युवक कै. किशाभाऊंच्या जन्मदिनानिमित्ताने दरवर्षी समर्पण दिनाचे आयोजन करतात. यंदा 'समर्पण दिन' कार्यक्रमामध्ये ११ वी पासून ते व्यावसायिक युवकांचा सहभाग अतुलनीय होता.

**'आवाम' (AWAM - आपली वर्धिनी आपली माणसं) आयोजित कर्करोग तपासणी शिबिर**

३१ जानेवारीला वर्धिनीमध्ये व्यावसायिक युवती गटाने स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग निदान तपासणी शिबिर आयोजित केले होते. ५७ महिलांनी याचा लाभ घेतला. पुण्यातील 'प्रयास' संस्थेचे सहकार्य शिबिरासाठी मिळाले. संस्थेच्या डॉक्टरांनी या तपासणीचे व वेळेत केलेल्या निदानाचे महत्त्व सर्वांना सांगितले.

❖ ❖ ❖

**विशेष उपक्रम**

**युवक शिबिर २०२२**

दिनांक – १६ व १७ जुलै २०२२, संख्या – १५०

स्थळ – नवीन मराठी शाळा, सदाशिव पेठ, पुणे

* शिबिराची सुरुवात 'कार्यकर्ता कसा असावा' या विषयावरील लेखांच्या वाचनाने झाली. पहिल्या सत्रात 'वर्धिनी कामाचे महत्त्व' या विषयावर श्री. सुमित डोळे यांनी सर्वांना मार्गदर्शन केलं. एखाद्या वस्तूची किंमत व मूल्य यातील फरक वेगवेगळी उदाहरणे सांगून वर्धिनीचे काम, जबाबदारी, आपले मूल्य वाढवायला मदत करते हे त्यांनी पटवून दिले.

* नंतरच्या सत्रात भारतीय संविधान आणि त्याला असलेले संभाव्य धोके यावर चर्चासत्र घेण्यात आले. देशात नुकत्याच घडलेल्या काही घटना व त्यांच्या मागील कारणे यांची अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली. श्री. महेश पवळे, श्री. सौरभ वीरकर, श्री. भारत अमदापुरे आणि श्री. निलेश धायरकर यांनी हे सत्र घेतले. 'संविधान सर्वप्रथम' हा विषय मांडताना मा. श्री. प्रदीपदादा रावत यांनी 'आफ्रिकेतून मानवी वंशाची झालेली सुरुवात, त्याचा जगभर झालेला विस्तार' आपल्या व्याख्यानात मांडला.

* 'गप्पा सेवेकऱ्यांशी' या प्रेरणा सत्रात डॉ. सुजित निलेगावकर यांचा प्रवास मांडण्यात आला. या अंतर्गत झालेल्या दुसऱ्या सत्रात अकरावी व बारावीसाठी श्री. तन्मय कानिटकर आणि FY ते पुढील युवकांसाठी श्री. संजय तांबट सर, श्री. विलास कुलकर्णी सर यांची मुलाखत घेण्यात आली.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशीचे पहिले प्रबोधन सत्र संस्थेचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी सर यांचे झाले. त्यामध्ये सरांनी 'संघटना' विषय मांडला. त्यांनी 'संघटन' या शब्दाची फोड करून ते म्हणाले, 'संघटना म्हणजे संघ अधिक घटना. संघ म्हणजे एकच विचार, असे एका मताचे काही लोक एकत्र येऊन एका विशिष्ट ध्येयासाठी काम करतात व त्या समूहाची काम करण्यासाठीची जी नियमावली असते ती म्हणजे घटना अशी संघ आणि त्याची काम करण्याची घटना मिळून संघटना तयार होते.' सरांनी वेगवेगळ्या उदाहरणांतून संघटना व त्यांची काम करण्याची पद्धती सांगितल्या.

* श्री. संदीप मोरे व श्री. हरिश्चंद्र मिसाळ यांनी सूर्यनमस्कार, योगासन प्रशिक्षण वर्ग घेतला.

* शाखा विभागातील व्यवस्थांचे प्रशिक्षण व कृतीसत्र घेण्यात आले. शाखा विभागाच्या प्रत्येक शाखेच्या शाखाप्रमुख, व्यवस्थाप्रमुख व युवाप्रमुख यांची वेगवेगळी चर्चासत्रं, प्रशिक्षण वर्ग व बैठका झाल्या.

* समारोप सत्रास संस्थेचे कार्यवाह विश्वास कुलकर्णी सर, सहकार्याध्यक्ष संजय तांबट सर व युवा विभाग पालक अमोल उंदरे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळेस केंद्रीय नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या व तसेच शाखा विभाग व युवक विभागाचे उद्दिष्ट सादर करण्यात आले. त्यानंतर श्री. अमोल उंदरे सरांनी युवकांना मार्गदर्शन केले.

## आसाम अभ्यास दौरा

कालावधी – ४ एप्रिल ते २३ एप्रिल,
सहभागी युवा – आकाश देशमुख (अभ्यास दौरा प्रमुख),
अभिजित दोडके, हनुमान मेकडे, किरण ननावरे, सायली गुरव, पायल जिरेसाळ, केदार घाटगे

भारताच्या वैभवशाली इतिहासात ज्या राज्याचे नाव आदराने घ्यावं असं राज्य म्हणजे आसाम. मुघलांविरोधात लढणाऱ्या अहोमचा सेनापती लाचित बडफूकन ते देशाचा गौरव असणाऱ्या हिमा दास, मीरा चानू आणि अनेक खेळाडूंनी आसामचे नाव गौरवशाली केलं आहे. आसाम नैसर्गिक सौंदर्याने नटलेलं एक सुंदर अन चहाचे मळे असलेलं मोठं उत्पादक राज्य आहे. या राज्याचा सांस्कृतिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक बाजूंचा अभ्यास करण्यासाठी वर्धिनीतून आम्हा ७ जणांना निवडलं गेलं. आसाममधील भास्कर संस्कार केंद्राच्या ५ दिवसांच्या शिबिरासाठी जाणाऱ्या युवांचा १९ दिवसांचा आसाम राज्य अभ्यास दौरा करावा असा निर्णय झाला आणि आम्हा सर्वांना आसाम उघड्या डोळ्यांनी पहायची संधी मिळाली. त्यातील काही निवडक संस्थांचा परिचय –

*** भास्कर संस्कार केंद्र –**

भास्कर संस्कार केंद्राचे संस्थापक श्री. अशोक वर्णेकर आणि त्यांच्या पत्नी अलका वर्णेकर; मूळचे नागपूरचे पण शिक्षणानंतर अरुणाचल प्रदेशामध्ये त्यांनी नोकरी केली. काही काळ नोकरी केली आणि नंतर तिथल्या सामाजिक कामाची गरज पाहता पूर्णवेळ या समाजातील उत्थानाचे काम करायचे ठरवून आसाममध्ये 'भास्कर संस्कार केंद्रा'ची त्यांनी सुरुवात केली. जवळच्या चाय बागानातील आणि रेती उपसण्याची कामे करणाऱ्या समाजातील मुलं ह्या केंद्रात अधिक प्रमाणात येतात.

वर्णेकर सरांच्या शब्दात सांगायचे झाले तर दिवसा कामात व्यस्त असलेली युवा पिढी संध्याकाळच्या रिकामेपणात व्यसन आणि इतर वाम मार्गाकडे धावते. त्यामुळे संध्याकाळी ६ ला सुरु झालेलं केंद्र पुढच्या दिवशी सकाळी



अंटार्क्टिकाच्या तिसऱ्या मोहिमेत ३ डिसेंबर १९८३ ते २५ मार्च १९८४, सुदीप्ता सेनगुप्ता व अदिती पंत या महिला शास्त्रज्ञ सहभागी होत्या.

सुटते. आर्थिक निरक्षरता, शिक्षणाबाबत नसलेलं गांभीर्य, व्यसन आणि या सर्वांवर शिक्षण आणि संस्कार हेच उपाय असू शकतात. त्यामुळे खेळ, व्यायाम, योग आणि प्राणायाम, सामूहिक संचलन, देशभक्तीपर गीत, अनेक मान्यवरांच्या भेटी, अवघड व मुख्य विषयांचं मार्गदर्शन इत्यादी कार्यक्रम या संस्कार केंद्रात नित्य होतात. साधारण ३० वर्षांपासून ही संस्था मोठ्या बदलांसाठी भरीव प्रयत्न करीत आहे. या भास्कर संस्कार केंद्राच्या शिबिरासाठी आम्ही ८ एप्रिलला आसाम, पार्वतीपुर येथे पोहचलो. शिबिराचा कालावधी ९ एप्रिल ते १३ एप्रिल व शिबिराचा विषय 'व्यक्तिमत्व विकास' असा होता. या शिबिरासाठी दहा चाय बागानातून ८४ मुले आलेली होती. आसामात सूर्यदेव पहाटे लवकर दर्शन देतात. त्यामुळे दिनक्रम पहाटे ४:३० ते रात्री ९:४५ या वेळेत चालायचा. योग, कला, स्टोन पेंटिंग, वारली पेंटिंग, हस्तकला, वक्तृत्व, वाचन या कला कौशल्याचे प्रशिक्षण मुलांना दिले.

**※ दिक्सम किनार विद्यालय –**

आसामात पाहिलेला अभिनव शैक्षणिक उपक्रम म्हणजे 'दिक्सम किनार विद्यालय.' यूफोलिया चाय बागानातील मुलांसाठी हा शैक्षणिक उपक्रम देवेन उपाध्याय सर चालवतात. जे आपण शिकतो त्याचे प्रात्यक्षिक करता आले पाहिजे अशा पद्धतीने या विद्यालयाचा अभ्यासक्रम आखलेला आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा मुलांना स्वतः पूर्ण करता याव्यात हा यामागील उद्देश आहे. चाय बागानात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांचे भविष्य फक्त चाय बागानात काम करणे इतकेच राहू नये हाच त्यामागचा मुख्य विचार आहे. व्यवसाय करता यावा आणि त्यासाठी प्रात्यक्षिक करून शिकवणारे शिक्षण देता यावे म्हणून दिक्सम किनार विद्यालयाची मुहूर्तमेढ देवेन उपाध्याय सरांनी रोवली. शाळेतील मुलांना भेटल्यावर 'हाताला निर्मितीचे डोहाळे असणे म्हणजे काय ?' हे जाणवले. कापडी बॅग्स, तांदळाच्या काड्यांपासून वस्तू, स्वतःचे युनिफॉर्म अशा अनेकविध गोष्टी मुले बनवतात. या मुलांनी त्यांच्या शाळेचे बांधकामही केले आहे. मुले स्वतः तयार केलेल्या विविध वस्तू बाजारात विकतात. यातून विक्रीचे कौशल्य मुलांच्या हाती दिले जाते. ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद हेच मुलांचे गुण असतात. सध्या संगणक कौशल्य मुलांना देता यावे यासाठी सर प्रयत्न करत आहेत. या कालावधीत उपाध्याय सरांच्या घरी निवास करण्याचा योग जुळून आला. अतिशय प्रेमाने आदरातिथ्य करून आसामी पद्धतीच्या भोजनाचा आस्वाद सर्व कार्यकर्त्यांनी घेतला. संध्याकाळनंतर सरांशी झालेल्या चर्चेमध्ये त्यांची कामाबद्दलची प्रेरणा विचार आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आलेल्या अडचणी आणि त्यावर केलेली मात अशा अनेक प्रेरक गोष्टी सर्वांना समजल्या. आसामच्या दौऱ्यातील दिक्सम किनार विद्यालयासारखी एक वेगळी शाळा कायम लक्षात राहील.

**※ आनंदालय –**

भारतातल्या तामिळनाडू, ओडीसा, नागालँड, अरुणाचल प्रदेश आणि आसाम या राज्यात विवेकानंद केंद्राचा 'आनंदालय प्रकल्प' चालतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण, अभ्यास आणि त्यांच्यात मूल्य रुजवण्यासाठी आनंदालय मुख्यत्वे काम करते. खेळ, कार्यक्रम, अशा अनेक उपक्रमांतून, शिक्षणातील आनंद वाढवण्यासाठी नित्य प्रयत्न चालतात. विवेकानंदांनी सांगितलेले मनुष्य घडवणुकीचे काम इथे होते. मूल्य शिक्षण हा इथला पाया असला तरी शालेय शिक्षणावरही येथे भर दिला जातो. शाळेनंतर भरणारे हे संस्कार केंद्र आहे. आनंदालय आसामात सगळीकडे पोहोचावे यासाठी गावोगावी प्रवास करून कार्यकर्ते जोडणे हा संस्थेच्या आग्रहाचा विषय आहे. भेटीदरम्यान आनंदालयाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्या मिनोतीदीदी कार्यकर्त्यांना भेटल्या. त्यांच्याशी झालेल्या संवादातून एका दुर्गम भागात राहणाऱ्या साध्या कार्यकर्त्याकडून कामाबद्दलची तळमळ दिसून आली. केंद्र सांभाळणारे आचार्य हे स्वतःचे शिक्षण घेत केंद्राची जबाबदारी घेतात. पुन्हा त्याच केंद्रातून केंद्र सांभाळणारे प्रमुख ही येथे घडतात. वर्धिनीच्या शाखांप्रमाणे आनंदालयाची साखळी आहे असे जाणवले.

या अभ्यास दौऱ्यातून कार्यकर्त्यांना समाजाची वेगळी ओळख व कामाची ऊर्जा मिळाली.

१९८३ साली वेस्ट इंडीजच्या संघाला नमवून भारतीय संघाने कपीलदेव कर्णधारपदी असताना क्रिकेटचा 'विश्वचषक' प्रथमच जिंकला.

## युवा विभाग निर्मलवारी मोहीम

बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल । करावा विठ्ठल, जीवभाव ।।

आषाढ महिना म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर उभी राहते ज्ञानोबा तुकोबांची पालखी अन त्यात विठ्ठल भेटीची आस घेऊन उत्साहात पायी चालणारे वारकरी.

निर्मल वारी... निर्मल वारी... निर्मल वारी म्हणजे काय, तिथे काय करायचं असतं, आपण प्रत्यक्ष काय करणार आहोत याबद्दल काहीही माहीत नव्हतं पण नेमकं काय करायचं आहे हे तिथे गेल्यावर कळणार होते हे नक्की. आम्ही युवक नोंदणी सुरू केली. सुरुवातीला आम्हाला अस वाटलं होत की पालखी ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी जाऊन स्वच्छता करायची आहे. वेळापूर येथे पोहोचल्यावर मुक्काम प्रमुख मा. महेशजी सोनपावले यांनी आमच्या चमूचं स्वागत केलं, सूचना दिल्या व कामाचे स्वरूप सांगितले. वारीचे स्वागत प्रत्येक ठिकाणी पुढारी, सामाजिक कार्यकर्ते तथा गावकरी मोठ्या जोशात करतात. फराळ, पाणी, जेवणाची व्यवस्था करतात पण लोकांच्या शौचालय व्यवस्थेत यंत्रणा कमी पडते. यावरील उपाय म्हणून संस्थांच्या वतीने सहा ठिकाणी शेकडो फिरते फायब्रिक संडास ठेवले होते. वारीतील हजारो, लाखो लोकांना उघड्यावर जाऊ न देता त्यांना विनंती करून प्रसंगी ओरडून त्यांनी या टॉयलेटसचा वापर करावा यासाठी युद्धपातळीवर आमचे कार्य सुरू झाले. लोकांना टॉयलेटपर्यंत घेऊन जाण्याच्या कामाबरोबर पाणी संपत आले की पाण्याची व्यवस्था, टॉयलेटची टाकी भरली की रिकामी करण्याची व्यवस्था, तसेच आतमध्ये घाण झाली असेल तर लगेच संबंधित लोकांना बोलावून स्वच्छता करून घ्यायचे काम रात्री १ पासून ते पहाटे ६ वाजेपर्यंत युवक-युवती न थकता पूर्ण जोशात करत होते.

### स्मरणीय अनुभव

✻ रात्री एका वारकरी आजोबांनी आम्हाला विचारले, 'कोण आहात तुम्ही ? कोठून आलात ?' आम्ही त्यांना निर्मल वारी व वर्धिनीबद्दल सांगितले. ते म्हणाले, 'आम्ही आयुष्यभर वारीत येऊन जेवढे पुण्य कमावले तेवढे पुण्य तुम्ही एका रात्रीत कमावलेत. खऱ्या अर्थाने गाडगेबाबांचं काम करता तुम्ही.'

✻ निघताना पहाटे ४ वा. वेळापूरमध्ये चहा घेण्यासाठी थांबलो होतो. त्या हॉटेलवर संपूर्ण कुटुंब रात्रभर जागून काम करत होते. चर्चा करत असताना निर्मल वारी व आम्ही तिथे सेवाकार्य करण्यासाठी आलोय हे समजल्यानंतर त्यांनी आम्हाला सांगितले की 'तुमच्या निर्मल वारीमुळेच आम्ही आमच्या घरी आहोत.' मला कळलं नव्हतं, त्या ताई असं का म्हणत आहेत तर त्यांनी सांगितले, 'दरवर्षी पालखीचा मुक्काम गावात असतो पण गावकरी गावात नसतात.' 'म्हणजे काय ?' त्यांनी सांगितले, 'येणाऱ्या लोकांची राहायची खायची व्यवस्था संस्था, यंत्रणा करतात पण शौचालयाची व्यवस्था कोणीही करत नव्हते. परिणामी गावात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत होती, रोगराई होत होती. खूप त्रास होत होता. त्यामुळे आम्ही गावातून बाहेर जायचो. तुमच्यामुळे गावातील ८०-८५% त्रास कमी झालाय. त्यामुळेच आम्ही इथं आहोत. तुमचे खूप आभारी आहोत.'

### यशोवार्ता

✻ स्वामी दयानंद सरस्वती शाखेतील युवक **विनायक म्हस्के** यांचे इंजिनिअरिंग मधील पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर, पुढील शिक्षण M.Tech. in Aerospace घेण्यासाठी त्याची निवड Government of India, Department of Space Indian institute of space science and technology ( Thiruvananthapuram, Kerala) या ठिकाणी झाली आहे.

✻ स्वामी सुबोधानंद शाखेतील युवक **शुभम लोंढे** याची इंडियन आर्मीमध्ये निवड झाल्याबद्दल अभिनंदन...!



भारताचा दक्षिण ध्रुवावरचा पहिला तळ 'दक्षिण गंगोत्री' भारतीय सैन्यानं जानेवारी १९८४ मध्ये बांधून पूर्ण केला. त्यानंतर 'मैत्री' दुसरा तळ १९८९ मध्ये तर 'भारती' २०१३ मध्ये उभारले गेले.

## शैक्षणिक निकाल... युवा शक्ती जोरात...

आपले महाविद्यालय, वैयक्तिक काम व आर्थिक गरज असल्यास अर्ध वेळ काम करून, ३६५ दिवस नित्य नियमाने शाखेवर काम करून एकूण २५ हून अधिक युवकांना प्रथम क्षेणी व त्यापेक्षा अधिक गुण मिळाले आहेत, या सर्व युवकांना यशाबद्दल खूप खूप अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा...!

**वर्ष – २०२१–२२**

| क्र. | युवकांचे नाव | शिक्षण | टक्के | शाखा | शाखेतील जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ओम गोरे | BE-1st year | ८५.५०% | स्वामी दयानंद शाखा | तासिका प्रमुख |
| २. | ओम इजंतकर | BE -3rd year | ८३.६०% | स्वामी ब्रम्हानंद शाखा | शाखाप्रमुख |
| ३. | आदित्य दिवटे | BE-1st year | ८२.४६% | स्वामी दयानंद शाखा | तासिका प्रमुख |
| ४. | उज्वल वाघुले | BCS | ७९.८०% | स्वामी श्रद्धानंद शाखा | शाखा प्रमुख |
| ५. | वैभव सपकाळ | B.COM. | ७५.७०% | स्वामी ब्रम्हानंद शाखा | तासिका प्रमुख |

**आमचे युवा–आमची ताकद – शुभम बाबुराव लोंढे** हा स्वामी सुबोधानंद शाखेचा ७ वी पासूनचा वर्धक. खेळात आणि अभ्यासातही हुशार. फुटबॉल या खेळात तर तो माहीर होता. जसजशी समज येत गेली तसतशी सैन्यात जायची त्याची इच्छा दृढ होत गेली. युवक गटात आल्यानंतर दररोज टेकडीवर जाऊन तो व्यायाम करू लागला. योग्य मार्गदर्शन, त्याचे प्रयत्न आणि त्याची इच्छाशक्ती त्याच्या मेहनतीतून दिसत होती. सरकारने जाहीर केलेल्या अग्निवीर योजनेत देशसेवा करण्याची संधी त्याला मिळाली. पुणे जिल्ह्यातून १७,००० जणांमधून ३६८ जणांमध्ये त्याची निवड झाली.

### सर ! आता पुढच्या रविवारी कुठे ?

वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते स्वामी देवसेवानंद यांनी नाशिकच्या पंचवटी भागातील फुलेनगर सेवावस्तीत महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५६ मध्ये वर्धिनीची प्रयत्न शाखा सुरु केली आहे. शाखेच्या शुभारंभ कार्यक्रमात दि. २६ जूनला सेवा सहयोग, पुणे यांच्या सहकार्याने १५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दप्तरे देण्यात आली. दि. ३ जुलैला शंभूराजे शाखेचे श्री. संदीप जोगळेकर, आदित्य सुळे, सावता माळी साळुंखे व योगेश शिंदे यांनी शाखेत येऊन मुलांचे मैदानी खेळ, पद्य घेतली. दि. २ ऑगस्टला श्री. विलास कुलकर्णी व श्री. बाळासाहेब झांजे यांनी शाखेला भेट दिली. दि. ११ ऑगस्टला पंचवटी पोलीस ठाण्यातील पोलिसांना मुलांनी राख्या बांधून स्वत:ची ओळख करून दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सीताराम कोल्हे यांना राखी बांधल्यावर ते म्हणाले, 'मी पण तुमच्यासारखा वर्धिनीच्या पुण्यातील शाखेत जात होतो. वर्धिनीच्या समोरील वस्तीत मी मोठा झालो. तुम्ही पण रोज शाखेत जा, भरपूर शिकून मोठे व्हा.'

गणेशोत्सव – पंचवटी परिसरातील निम्पानी बस स्थानक, मालेगाव बसस्थानक, मधुबन कॉलनी, येथील देखावे बघून जवळ भरलेल्या आनंद मेळ्यात मुलांनी सहभाग घेतला. परतीच्या वाटेवर गंगेच्या पाण्यात पोहून मुले खुश झाली आणि वस्तीत आल्यावर विचारत होती, 'सर, आता पुढच्या रविवारी कुठे ?'

१९८४ – रशियाच्या मदतीने भारतीय अंतराळवीर राकेश शर्मा अवकाशात गेले.
त्यांचे उद्गार 'सारे जहाँसे अच्छा हिन्दोस्ताँ हमारा' !

## युवती विभाग

* कार्यरत युवती गट – २५, * व्यावसायिक युवती गट – १२२

### मासिक प्रबोधन वर्ग

* दि. ३ जुलैला २८ संख्येनिशी युवती शाखा भरली. पायल जिरेसाळने घेतलेल्या टेली मॅचेसनी दणक्यात युवती शाखेला सुरुवात झाली. सुरुवातीला व्यायाम आणि खेळ झाला. भाग प्रमुख दिव्याताईने समतेचं प्रशिक्षण युवतींना दिलं. 'आपले आरोग्य उत्तमच असायला हवे' या विषयावर डॉ. विनेश नगरे सरांनी युवतींना मार्गदर्शन केले. आहाराच्या योग्य पद्धती, नियमित व्यायामाचे महत्त्व, मासिक पाळीमध्ये घ्यावयाची काळजी, मानसिक ताण दूर करण्यासाठीचे उपाय अशा अनेक विषयांवर त्यांनी संवाद साधला. युवतींच्या अनेक प्रश्नांना अतिशय सोप्या भाषेत उत्तरे दिली.

* दि. ११ सप्टेंबरला झालेल्या एकत्रीकरणाच्या सुरुवातीला किरण ताई आणि दीपाली ताई यांनी गणेशोत्सव आणि दैनंदिन शाखेचा आढावा घेतला. त्यानंतर वैयक्तिक नियोजनाबाबत चर्चा झाली. व्यायाम, वाचन, अभ्यास नियोजन, घरातील जबाबदारी आणि शाखा कामे अशा विविध गोष्टींचा प्रत्येक युवतीचा वैयक्तिक आढावा घेण्यात आला.

### आमचे युवा, आमची ताकद

आपली बालवाडीपासूनची वर्धिका, वर्धिनीची कन्या **पायल जिरेसाळ**. वर्धिनी मनामध्ये रुजणे किंवा वर्धिनीमय होणे काय असते हे छोट्याशा पण अभिमान वाटाव्या अशा कृतीतून तिने दाखवून दिले. दोन वर्षांपूर्वी तिला रेडिओलॉजी टेक्निशियनच्या डिप्लोमाचे शुल्क भरण्यासाठी वर्धिनीने मदत केली. तिने अतिशय मन लावून शिक्षण पूर्ण केले आणि तिला वेध लागले नोकरी मिळण्याचे. परंतु नेमका लॉकडाऊनचा काळ होता. त्यामुळे चार–पाच ठिकाणच्या मुलाखतीनंतर मिळालेली नोकरी मान्य केली. रोज एक तासाचा बसचा प्रवास; तसा पगारही बेताचा होता. परंतु सुरुवातीचा अनुभव खूपच महत्त्वाचा म्हणून मिळालेली नोकरी तिने मान्य केली. कामावर रुजू झाली. कामाचे तास जास्त होते तरीही ताई नोकरीवरून तडक शाखेत उपस्थित असायची. संपर्काला लगेच जायला तयार ! घरी जाऊन पालकांना किमान तोंड दाखवा, काहीतरी खाऊन मग शाखेत या असा प्रेमळपणे व रागावून दिलेला दम हसून कानाआड झाला. शाखेत मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सलग नवीन उपक्रम घेणे चालूच. घरची परिस्थिती बेताचीच! मिळालेल्या पगारातून घरच्यांसाठी प्रथम छोट्या छोट्या वस्तू तिने घेतल्या. (घरातली पहिली कमावती मुलगी ना !) परंतु अजूनही स्वतःसाठी काही घेतलेले नाही. बसच्या पासचे पैसे जाऊन जे शिल्लक राहिले ते वडिलांकडे जमा करत गेली आणि शेवटी ४ महिन्यांनंतर वर्धिनीत जमा करायची ३२०००/– रुपये रक्कम झाल्यावर तिच्या जीवात जीव आला. वाढदिवसाच्या आधी फीची रक्कम वर्धिनीत जमा करायचा तिचा निश्चय झाला आणि त्यात २००० रुपये अधिक देऊन तिने तो पूर्णही केला. अजून पुढे शिकायचे आहे तर त्यासाठी काही दिवस नोकरी करेन आणि फी साठवेन हाही तिचाच निश्चय. स्वतः हवे तेवढे कष्ट करून आपण स्वतःला सिद्ध करायचे आणि सोबत इतरांनाही पुढे आणायचे हे मनात पक्के रुजले आहे. तिची जिद्द खरंच कौतुकास्पद आहे.

### नवरात्र विशेष कार्यक्रम

दि. १ ऑक्टोबरला 'सन्मान आपल्यातील 'ती'चा' या कार्यक्रमात डॉ. सुरेखा कुडलिंगार ताईने PCOD and Personal Hygiene या विषयावर संवाद साधला. सुरेखा ताईनी आपल्या वर्धिका आणि युवती गटाला PCOD आणि PCOS काय असते, त्याची लक्षणे कोणती असतात ते सांगितले. मासिक पाळी का गरजेची आहे आणि ती



१३ एप्रिल १९८४ – संपूर्ण सियाचिन हिमनदीच्या प्रदेशावर भारतीय सैन्यानं ताबा मिळवला.

नियमित आली नाही तर स्त्रीला किती त्रास सहन करावा लागतो हे सांगितले. दैनंदिन जीवनात आहार आणि व्यायामाचे महत्त्व सांगितले आणि सगळ्या वर्धिका आणि युवतींच्या सर्व प्रश्नांची उत्तरे अगदी सोप्या भाषेत दिली. कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात वर्धिनीतील काही ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा नडे (सहकार्यवाह), श्रीमती बागेश्री पोंक्षे (ज्येष्ठ कार्यकर्त्या–युवती विभाग), श्रीमती नीला कुडलिंगार (ग्रंथपाल), श्रीमती लता सत्तुर (रुग्ण सहाय्यक वर्ग), श्रीमती सुगंधा कबीर (प्रौढ साक्षरता वर्ग) यांचा सन्मान करण्यात आला. सर्व उपस्थित वर्धिकांना वर्धिनीतील कर्तबगार महिला आणि त्यांच्या कामाची ओळख झाली. वयाची मर्यादा न पाहता गेली कित्येक वर्षे या सर्वजणी वर्धिनीच्या कामात सक्रिय आहेत आणि पुढच्या पिढीला प्रोत्साहन देण्याचे काम करत आहेत. दीपालीताई पवार यांनी सुरेखा कुडलिंगार, तेजश्री शेंडे, उल्का माळी, प्रिया गोरे, चैत्राली हुल्याळकर, वैभवी पवार या व्यावसायिक उपस्थितांचा परिचय करून दिला. कार्यक्रमानंतर नव्या जुन्या पिढीचा गप्पांचा कार्यक्रम रंगला. सदर कार्यक्रमात वर्धिनीच्याच महिला शक्तीचा झालेला परिचय सर्वांना प्रेरणा देणारा ठरला.

**स्फुरो कल्पनाशक्ती, अभ्यास यत्ने...**

'स्व'–रूपवर्धिनी एक संस्था जरी असली तरी आम्हा कार्यकर्त्यांसाठी ते कुटुंबच आहे. कार्यकर्त्यांना वर्धिनीत जोडलेली नाती रक्ताच्या नात्याइतकीच महत्त्वाची वाटतात. जगाच्या पाठीवर हक्काची, आपली माणसं वर्धिनीत भेटतात जी प्रत्येक प्रसंगात आपल्यासोबत असतात. कोणाचा वाढदिवस असो, किंवा आजारपण, ही माणसं आपल्या आनंदात, दुःखात सामील होतात. वर्धिनीत झालेली मैत्री सुद्धा अनोखी असते आणि अशा कुटुंबाचा भाग असणारे सगळे भाग्यवंतच नाहीत का ? याच भाग्यवंतांपैकी मी एक. वयाच्या ११ व्या वर्षी वर्धिका गटात आल्यापासूनच ज्ञापुंसारख्या अनेक ज्येष्ठांचा सहवास मिळाला. युवती गटात आल्यानंतर अभ्यास आणि शाखा काम दोन्ही उत्तम सांभाळता येतं याचा अनुभव आला. शाखेच्या जबाबदाऱ्या पार पाडताना वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची सवय लागली. परीक्षेत किती गुण मिळतात हे महत्त्वाचे नाही तर तुम्ही ज्या विषयाचा अभ्यास करता तो मनापासून करायला हवा हे आधीपासून मनावर कोरलं गेलं होतं. त्यामुळे सखोल अभ्यास करण्याची सवय लागली आणि याचाच परिणाम म्हणून मी ८०% गुण मिळवून पदवी संपादन केली आणि सध्या पुणे विद्यापीठात M.A. Political Science चे शिक्षण घेत आहे. वर्धिनीच्या कामातून स्वतःच्या प्रगतीसोबत इतरांसाठीही काम करण्याची संधी मिळाली. अशी स्वार्थाकडून परमार्थाकडे नेणारी शिकवण वर्धिनीत मिळते आणि अनेकांचे आयुष्य उजळते. **– समृद्धी यादव**

**चुणचुणीत वर्धिका, कणखर युवती, दमदार शाखा प्रमुख, शानदार भागप्रमुख अशा आपल्या दिव्याची झेप.** दिव्या घारे हिने 'सकाळ डिजीटल वृत्तसमूहात' सोशल मीडिया एक्झ्युकेटिव्ह म्हणून पहिल्यावहिल्या नोकरीची सुरुवात केली. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातून मास कम्युनिकेशनचे शिक्षण पूर्ण होण्याच्या आतच नोकरीची संधी तिला मिळाली. शिक्षण घेत असताना घरातील हार–फुलांच्या व्यवसायात सर्व प्रकारची कामे न लाजता, न थकता करून दिव्याने हे यश मिळवले. म्हणूनच आतापर्यंत अनेकदा विणावे लागलेले फुलांचे हारच जणू काही नवीन वर्षात तिला तिच्या यशाचे अभिनंदन करण्यास सज्ज झाले आहेत. 'घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी' या म्हणीप्रमाणे शिक्षण, फील्डवर्क, पार्टटाईम काम आणि व्यवसायात मदत करत असताना या घारीचे चित्त मात्र सदैव आपल्या प्राणप्रिय शाखेपाशीच असायचं. कोणतेही कारण न देता वर्धिनीचे संस्कार जपत गेली सलग ७ वर्षे शाखा कामात दिव्या नियमित लक्ष घालते. वर्धिनीला तिचा अभिमान वाटतो.

# उत्थान विभाग

**विभागाला आता सहा वर्ष पूर्ण होत आली आहेत. उत्थान विभाग पुण्यातील पूर्व भागातील सेवावस्तींमध्ये अभ्यासिका, संस्कार वर्ग, बचत गट, खेळ वर्ग इ.आयामांच्या माध्यमातून काम करत आहे.**

विभागाच्या एकूण २२ अभ्यासिकांमध्ये जवळपास ५५० विद्यार्थी येतात. यातील बरीच मुले ही मागील ६ वर्षापासून आपल्याकडे येत आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शनासोबत संस्कार, शारीरिक विकास, अभ्यास इ. गोष्टी शिकविल्या जातात. याच माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. संस्थेच्या ध्येय आणि उद्दिष्टाप्रमाणे सेवेतून सेवेकरी निर्माण करणे या उक्तीला सार्थ ठरवत अभ्यासिकेतील विद्यार्थी आता कार्यकर्त्याच्या भूमिकेत येताना दिसत आहेत. याच वर्षी एकूण ३६ विद्यार्थ्यांनी १० ची परीक्षा देऊन युवक गटात प्रवेश केला आहे.

**संख्यात्मक आढावा**

✻ एकूण अभ्यासिका – २२ ✻ एकूण कार्यकर्ते– २४ ✻ एकूण समुपदेशन केंद्र – २

✻ एकूण वर्धक /वर्धिका संख्या – ५५९ ✻ समुपदेशन केंद्र लाभार्थी संख्या – १०५

**विभागामार्फत या वर्षभरात झालेले काही महत्त्वाचे उपक्रम**

**✻ मकर संक्रमण ✻**

यावर्षी हा उत्सव शैक्षणिक संक्रमण म्हणून साजरा करण्यात आला. यामध्ये अभ्यासिकेमधील सर्व मुलांचे पाढे पाठांतर, गणिताचा सराव, वाचन, लेखन, या अभ्यास कौशल्यांची ओळख या सोबतच पुस्तकातील संकल्पना, भाषिक कोडी, समानार्थी – विरुद्धार्थी शब्द याचे तक्ते आणि शैक्षणिक साहित्य तयार करणे अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन वर्धिनीच्या ओंकार सभागृहात मांडण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विनायक शुक्ल व श्री. योगेश तांबट उपस्थित होते.

**✻ शिवजयंती उत्सव ✻**

या वर्षीचा शिवजयंती उत्सव विभागाच्या रचनेनुसार ४ ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी नृत्य, पोवाडा, भाषण, वेशभूषा अशा कार्यक्रमांचे सादरीकरण केले. पालक देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शिवजयंतीच्या कार्यक्रमांमधून संघटन, वेळेचे नियोजन, जबाबदारी घेण्याची वृत्ती, व्यवस्थापन, अशा सर्व गोष्टींचे सकारात्मक अनुभव विद्यार्थ्यांना मिळाले. प्रत्येक भागात झालेल्या कार्यक्रमात वर्धिनीची मांडणी मा. पुष्पाताई नडे (सहकार्यवाह), श्री. चेतन कुसाळकर (युवा विभाग प्रमुख), श्री. सुरेश पवार (युवक), श्री. शुभम जगताप (शाखा विभाग प्रमुख) यांनी केली.

**✻ ऐतिहासिक चित्रपट –** शिवजयंती उत्सवानंतर शिवछत्रपतींच्या इतिहासावर आधारित 'पावनखिंड' हा चित्रपट चित्रपटगृहात ६५ जणांना दाखवण्यात आला. यासाठी लागणारा खर्च विभागाच्या सर्व हितचिंतकांनी उभा केला.



फेब्रुवारी १९८५ मध्ये प्रत्यक्ष घटनादुरुस्ती होऊन पक्षांतर बंदी कायदा झाला.

**※ रथसप्तमीला** सर्व अभ्यासिकांमध्ये प्रत्येकी १२ ते १५ सूर्यनमस्कार घालण्यात आले. तसेच संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अभ्यासिकेची स्वच्छता, परिसराची स्वच्छता असे उपक्रम राबवण्यात आले. मराठी राज्यभाषा दिनानिमित्त मराठी लेखक, कवी, साहित्यिक यांची माहिती मुलांना सांगण्यात आली.

**※ रक्षाबंधन –**

वस्तीतील सामाजिक सेवा देणारे स्वच्छता कर्मचारी, वर्तमानपत्र वितरित करणारे अशांना आपल्या घरी बोलावून राखी बांधण्याचा उपक्रम रक्षाबंधनानिमित्त घेतला.

**※ महिला दिन –**

अभ्यासिकांमध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. ज्ञानज्योती अभ्यासिकेत मंजूषाताई कुलकर्णी यांच्यासोबत गप्पा, महात्मा फुले भागात सावित्रीबाई फुले स्मारक भेट तर कोरेगाव पार्क भागामध्ये वस्तीतील महिलांचा सत्कार उत्थान विभाग समिती सदस्या सौ. अनुजाताई पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

**※ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधायक जयंती –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित ज्ञानज्योती अभ्यासिकेतील मुलांनी नाटक बसवले. विभागाने जयंती दिवशी **कोणतेही पुस्तक १० रुपयात** हा उपक्रम राबविला. या उपक्रमाचा उद्देश लोकांना कमी किंमतीत पुस्तके उपलब्ध करून वाचनाची आवड निर्माण व्हावी हा होता. यामध्ये ३५० पुस्तकांची विक्री झाली.

**※ कामगार दिन व महाराष्ट्र दिन –**

कामगार दिनानिमित्त महात्मा फुले भागातील अभ्यासिकांनी परिसरातील कामगारांना टोपी व भेळ यांचे वाटप केले. तसेच त्यांना शुभेच्छापत्र दिले. त्यांना त्यांच्या कामात मदत करून कामगार दिवस साजरा केला.

**※ १५ ऑगस्ट २०२२ हर घर तिरंगा –**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने सर्व अभ्यासिकांमध्ये RSB फौंडेशन यांच्या वतीने श्री. चेतन कुसाळकर यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला तिरंगा वाटप करून स्वातंत्र्यादिनाचे महत्त्व सांगितले. तसेच महात्मा फुले भागात पोलीस कॉन्स्टेबल श्री. अभिजित पवार यांनी मुलांना स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व सांगितले.

**※ गोकुळाष्टमी –** मुलांनी पुस्तकांची दहीहंडी तयार करून जास्तीत जास्त पुस्तके वाचण्याचा संकल्प केला.

**※ मैत्री दिनानिमित्त** महात्मा फुले अभ्यासिका भागातील युवकांनी पर्वती टेकडीवर जाऊन मैत्रीची आठवण म्हणून वृक्षारोपण केले.

**※ दिवाळी विशेष उपक्रम –**

दिवाळीनिमित्त किल्ला तयार करणे, आकाशकंदील तयार करणे, गोशाला भेट, पणत्या रंगविणे, अभ्यासिका सजविणे असे विविध उपक्रम विभागाने यावर्षी घेतले. या सर्व उपक्रमांना मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## क्रीडा दिन

विभागाचा वार्षिक क्रीडा दिन दि. २० नोव्हेंबरला ढोले पाटील शाळा, कोरेगाव पार्क येथे तर व दि. २७ नोव्हेंबरला श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला, भवानी पेठ, पुणे येथे साजरा झाला. विभागाचे पालक श्री. संदीप मोरे यांच्या हस्ते उद्घाटन आणि बक्षीस वितरण करण्यात आले.

**लंगडी सांघिक विजेते –**

प्रथम क्रमांक – भीमरत्न अभ्यासिका

द्वितीय क्रमांक – डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिका

तृतीय क्रमांक – प्रियदर्शनी अभ्यासिका

भारतीय रेल्वेने १९८६ पासून संगणक विज्ञान क्षेत्रातील प्रणाली वापरून तिकीटांचं संगणीकरण केलं.

## ❊ अशा सहली, असे अनुभव ❊

**❊ पुरंदर सहल –** कोरेगाव पार्क भागाची सहल पुरंदर किल्ल्यावर नेण्यात आली. गडावर मुलांना पुरंदर किल्ला, मुरारबाजींचा पुतळा, समाधी, ऐतिहासिक मंदिर दाखविण्यात आले. शिवजयंतीमध्ये अफजलखानाचा वध यावर रचलेला पोवाडा मुलांनी वस्तीत सादर केला होता तोच त्यांनी किल्ल्यावर देखील सादर केला. हा पोवाडा गडावर आलेल्या अनेक जणांना खूप आवडला. शिवकाळात काहीच सोयी सुविधा नसताना मावळ्यांनी गड कसा बांधला असेल? गडाला लागणारे दगड, माती कसे आणले असतील? किल्ल्याची रचना कशी तयार केली असेल? ही रचना कोणी केली असेल? असे एक ना अनेक प्रश्न मुलांच्या मनात आले. या सर्व प्रश्नांची उत्तरे शंभूराजे शाखेच्या अभय पोते दादाने मुलांना दिली.

**❊ रायरेश्वर सहल –** विभागाच्या लष्कर भवानी भाग, महात्मा फुले भाग व कसबा भागातील एकूण ७८ जणांची सहल गडावर नेण्यात आली. मुलांनी तेथील इतिहास, आजूबाजूच्या परिसराची माहिती करून घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेचारशे वर्षांपूर्वी वयाच्या सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली होती. हा ऐतिहासिक प्रसंग ऐकून मुले भारावून गेली. मुलांना भोर तालुक्यातील प्रसिद्ध ठिकाण नेकलेस पॉईंट दाखवण्यात आला. या सहलीमधून मुलांना गड चढण्याचा एक वेगळाच अनुभव मिळाला. काही मुलं पहिल्यांदाच इतक्या लांब आली होती. यातून पालकांचा वर्धिनीवर असलेला विश्वास दृढ झाला. वर्धिनीची सहल ही फक्त फिरण्यासाठी नसून खूप काही शिकण्यासाठीसुद्धा असते हे मुलांना कळले.

**❊ सिंहगड –** उत्कर्षा, हरकानगर आणि स्वराज्य अभ्यासिकेची सहल सिंहगडावर गेली. या सहलीतून मुलांना पुण्याजवळील किल्ल्याची भौगोलिक, ऐतिहासिक माहिती मिळाली.

### विभागाचे पहिले–वहिले शिबिर

दि. १० जून ते १२ जून विभागाचे पहिलेच शिबिर झाले. शिबिर प्रमुख म्हणून माझी पहिली जबाबदारी होती. एकूण ४७ संख्येनिशी आम्ही अपंग कल्याणकारी शिबिर संशोधन संस्था, वानवडी यथे पोहोचलो. शिबिराला जाताना खूप पाऊस लागला. त्यामुळे थोडीशी धावपळ झाली. उद्‌घाटन सत्रासाठी श्री. शिरीष पटवर्धन सर व अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुरलीधर कचरे सर उपस्थित होते. पटवर्धन सरांनी त्यांचे पहिल्या शिबिराचे अनुभव सांगत शिबिर नक्की का करावे व त्याचा फायदा काय हे सांगितले. रात्र कार्यक्रमात पद्य मैफल झाली. सकाळी 'मैत्री' या विषयावर श्री. संदीप मोरे सरांचे सत्र झाले. मैदानी खेळांनंतर श्री. योगेश तांबट सरांचे ओरिगामीचे सत्र झाले. श्री. संदीप मोरे, श्री. सुमित डोळे, श्री. निलेश धायरकर यांचा सहवास कार्यकर्त्यांना मिळाला. दुसऱ्या दिवशीच्या नेतृत्व विकसन सत्रात विविध कृती उपक्रम घेण्यात आले. कला सत्रात हरि धायगुडे दादाने काही व्हिडीओ दाखवले आणि त्यानंतर मुलांनी उपलब्ध ताल साहित्य वापरून गटशः पद्ये सादर केली. समारोप सत्रात श्री. विश्वास कुलकर्णी सर व श्रीमती पुष्पाताई नडे यांनी पहिले शिबिर यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे कौतुक केले. मी शिबिर नक्की काय असते हे अनुभवले, व्यवस्था नक्की कशा असतात, त्या कशा पद्धतीने पार पाडल्या जातात याचा अनुभव या शिबिराने मला दिला. दहावीच्या मुलांनी सहप्रमुख म्हणून दिलेली जबाबदारी उत्तमरित्या पार पाडली. या सगळ्या गटासोबत काम करण्याचा अनुभव नेहमी आठवणीत राहील.

**– अनिल काळे**



१९८६ साली महानगर टेलिफोन निगम लिमिटेड (एमटीएनएल) आणि विदेश संचार निगम लिमिटेड (व्हीएसएनएल) या सार्वजनिक क्षेत्रातल्या टेलिफोन सुविधा पुरवणाऱ्या कंपन्या स्थापन झाल्या.

## अभ्यास शिबिर

इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या सर्व वर्धक/वर्धिकांसाठी विशेष अभ्यास शिबिर झाले. पहिले सत्र 'लेखन व टिपण', व दुसरे सत्र 'भाषा (इंग्लिश) व परीक्षेची पूर्वतयारी' ह्या विषयावर अमिता आंबेकर ह्यांनी, 'विज्ञान' विषयाचे सत्र लताताई पुरंदरे ह्यांनी आणि गणिताचे सत्र मनीषाताई पाठक ह्यांनी घेतले. शेवटच्या सत्रात सुरेश पवार यांनी ध्येयनिश्चिती हा विषय समजावून सांगताना अभ्यास कसा करावा, त्याचे नियोजन कसे करावे, ध्येय कसे ठरवावे आणि ते प्राप्त करण्यासाठी काय प्रयत्न करायला हवेत अशा अनेक आयामांवर संवाद साधला. या शिबिराचा फायदा विद्यार्थ्यांसोबतच अभ्यासिका प्रमुखांनासुद्धा झाला.

### एक विद्यार्थिनी... ते तळमळीची कार्यकर्ती –

काशेवाडी येथील उत्कर्षा अभ्यासिकेमधील इ. ७ मधे शिकणारी शुभांगी नावाची विद्यार्थिनी. अभ्यासामध्ये हुशार आणि सांगेल ते काम मनापासून करणारी. घरी फक्त आईचा आधार. ती रोज अभ्यासिकेमध्ये येत असल्याने प्रश्न विचारणे, दिलेला अभ्यास मनापासून करणे, खेळात उत्साहाने सहभागी होणे हे तिचे गुण सर्वांना जाणवत होते.

दहावी पास झाल्यावर आज तीच शुभांगी अभ्यासिकेत वेगवेगळ्या जबाबदाऱ्या घेते. अभ्यासिकेतील कार्यक्रमांचा उद्देश समजून घेऊन उत्तम कार्यक्रम घेण्यात तिचा आग्रह असतो. तिच्यासोबत ४ मुली १० वी पास झाल्या. विद्यार्थी अभ्यासिकेमध्ये नियमित यावे म्हणून मुलांच्या घरी संपर्क करणे, अभ्यासिकेचे नियोजन करणे, मुलांना अभ्यासिका मध्ये शिकवणे अशा जबाबदाऱ्या आता शुभांगी पार पाडते.

मला ज्या अभ्यासिकेने घडवले त्याच अभ्यासिकेच्या माध्यमातून वस्तीतील इतर मुलींनाही मदत करण्याची तिची धडपड सुरु असते.

## विभागातील कार्यकर्त्यांसाठी विशेष प्रेरणा उपक्रम

### ✻ वार्षिक नियोजन बैठक ✻

दि. ३ मे रोजी गुजरवाडी येथे वार्षिक नियोजन बैठक निलेश सर, संदीप सर, उमेश दादा यांच्यासमवेत पार पडली. या बैठकीमध्ये वर्षभरातील उद्दिष्टे, कार्यक्रम ठरविण्यात आले. विभागप्रमुखांनी भागप्रमुखांना त्यांच्या कामाची प्रोफाईल दिली. या बैठकीमध्ये आगामी वर्षामध्ये होणाऱ्या कार्याविषयी नियोजन सांगण्यात आले.

### ✻ वार्षिक नियुक्ती समारंभ ✻

दरवर्षीप्रमाणे २०२२ चा नियुक्ती कार्यक्रम १४ मे रोजी राजेवाडी मधील शांताताई लडकत शाळेत मा. विश्वास कुलकर्णी, सुमित डोळे सर, बाळासाहेब पाटोळे, अनुजा ताई पाटील, निलेश धायरकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाला एकूण ६० संख्या होती. नवनियुक्त कार्यकर्त्यांना सन्मानपत्र व डायरी देऊन त्यांना मागच्या वर्षीच्या कामाबद्दल कौतुकाची थाप व पुढील कामासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नियुक्तीसाठी अभ्यासिका प्रमुख, पालक, अभ्यासिका पालक, समिती सदस्य असे सर्व जण उपस्थित होते.

### ✻ मासिक प्रशिक्षण ✻

अभ्यासिकेमध्ये येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व उपक्रमांमध्ये नाविन्यता यावी यासाठी दर महिन्याच्या पहिल्या रविवारी विभागातील सर्व अभ्यासिकाप्रमुखांचे मासिक प्रशिक्षण घेतले जाते. यामध्ये ऑनलाईन कामे, मूल्यमापन चाचणी, संपर्क कसा करावा, अभ्यासिका कशी घ्यावी, कार्यकर्ता जडणघडण, कार्यकर्ता व्यवहार यासोबत अभ्यासिकांचे आगामी नियोजन अशा विषयांचे प्रशिक्षण दिले जाते.

२२ मे १९८९ रोजी 'अग्नी' क्षेपणास्त्र प्रक्षेपणाची चाचणी यशस्वी झाल्यानंतर 'अग्नी २ ते ७', आकाश, नाग, पृथ्वी २-३, ब्रह्मोस इ. या क्षेपणास्त्र प्रणालींनी भारत सुसज्ज झाला आहे.

### * एक प्रेरणादायी सहल *

इयत्ता १० वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या कौतुक सोहळ्यात संस्थेचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी यांनी, विभागाचा तयार होणारा नवीन युवा गट आता कामात यायला हवा, त्यांच्यावर अभ्यासिकेची जबाबदारी सोपवायला हवी, असे मार्गदर्शन केले. हाच धागा धरून या ३६ जणांना काम करण्यासाठी प्रेरणा मिळावी यासाठी त्यांची सहल लोहगड किल्ल्यावर काढण्यात आली. या सहलीला उपस्थित असणारे संस्थेचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. निलेश धायरकर यांनी प्रत्येकाशी वैयक्तिक संवाद साधला. गड पाहणी सुरु असतानाच आपली वस्ती, आपल्या समस्या, आपले प्रश्न–उत्तर हे संवाद सत्र घेण्यात आले. मुलांना आपल्या वस्तीतील समस्यांची जाणीव झाली. आपणच आपल्या वस्तीच्या समस्या सोडवू शकतो, यासाठी आपल्या वस्तीतील आपले शक्ती केंद्र म्हणजेच आपली अभ्यासिका. ती रोज चालविणे गरजेचे आहे यासाठी आपण ती जबाबदारी घेऊ असे सांगितले. या सहलीनंतर अनेकांनी आपल्या अभ्यासिकांमध्ये प्रत्यक्ष कामाची जबाबदारी घेण्यास सुरुवात केली.

### * युवती एकत्रीकरण *

अभ्यासिकेतील १० वी उत्तीर्ण झालेल्या युवतींनी जबाबदारी घेऊन वस्तीतील इतर मुलांना अभ्यासिकेच्या माध्यमातून आधार द्यावा यासाठी वेताळबाबा टेकडीवर एकत्रीकरण करण्यात आले. १० युवती उपस्थित होत्या. एकत्रीकरणामध्ये खेळ, गप्पा, कामाचे महत्त्व, नवीन कशा स्वरूपाचे काम करता येईल याविषयी चर्चा केली.

### * १० वी – १२ वी कौतुक सोहळा २०२२ *

विभागातील १० वी–१२ वी उत्तीर्ण झालेल्या मुलांचा कौतुक सोहळा दि. १३ जुलैला वर्धिनीच्या प्रबोध सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमाला संस्थेचे कार्यवाह श्री.विश्वास कुलकर्णी व RSB फौंडेशनचे श्री. चेतन कुसाळकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, पुस्तक व एक फोटो देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. श्री. विश्वास सरांनी त्यांचे मनोगत मांडताना त्यांचे वस्तीत काम करतानाचे आलेले अनुभव सांगत आपणही इतरांना या प्रवाहात आणण्याचे काम करावे हे सांगितले. श्री. चेतन कुसाळकर यांनी सर्वांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

### * अभ्यासिका प्रमुख – निवासिका एकत्रीकरण *

दि. १७ व १८ डिसेंबरला उत्थान विभागातील सर्व अभ्यासिका प्रमुखांचे निवासी एकत्रीकरण गुजरवाडी येथे करण्यात आले. सदर एकत्रीकरणाला जवळपास २० कार्यकर्ते उपस्थित होते. पहिल्या दिवशी उपस्थितांचे गट पाडून संघ भावना वाढीस लागावी यासाठी विविध खेळ घेण्यात आले. त्यानंतर रात्र सत्रात वैयक्तिक नियोजन या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी गुजरवाडी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रेरणासत्रात कार्यकर्त्यांना अभ्यासिकेतील मुलांना दररोज येण्याची गोडी लागावी आणि एका टप्प्यावर मुलांमध्ये देशप्रेम निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करावेत असे सांगताना वैयक्तिक प्रगतीचे महत्त्व सांगितले. आपण जे काम करतो त्याचा त्या वस्तीवर प्रभाव पडून तिथल्या समस्या सुटतील या टप्प्यापर्यंत आपल्याला पोहोचायचे आहे असेही सरांनी मार्गदर्शनात सांगितले.

३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंतीच्या निमित्ताने प्रियदर्शनी अभ्यासिकेमधील विद्यार्थिनी **श्रावणी गुळांबे** हिने सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून त्यांच्या जीवनावर आधारित ओवींचे सादरीकरण केले. श्रावणीला राज्यस्तरीय ओवी स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला आहे. तिचे मनःपूर्वक अभिनंदन !



राष्ट्रीय पातळीवर महिला आयोगाच्या स्थापनेसाठी १९९० मध्ये कायदा होऊन त्यानुसार १९९२ मध्ये महिला आयोग आकाराला आला.

## माहिती व सल्ला केंद्र (समुपदेशन)

दि. ११ एप्रिलला 'स्व'-रूपवर्धिनीच्या वास्तूत दर सोमवार आणि गुरुवारी संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत समुपदेशन केंद्र चालवले जाते. वस्ती विभागातील विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी एकूण दहा समुपदेशक काम करत आहेत. दि. ३ जुलैला विभागाच्या मासिक प्रशिक्षणामध्ये, अभ्यासिकाप्रमुखांचे समुपदेशक गटातर्फे सत्र घेण्यात आले. अभ्यासिकेतील मुलांना येण्याऱ्या समस्यांवर चर्चा करून समुपदेशनाची गरज असणाऱ्या मुलांना केंद्रावर घेऊन येण्यास सांगितले. एप्रिल २०२२ ते जुलै २०२२ मध्ये ४५ मुलांचे समुपदेशन करण्यात आले. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात समुपदेशकांनी प्रत्यक्ष अभ्यासिकेत जाऊन 'चांगल्या सवयी' या विषयावर सत्र घेतले. त्यातून काही मुले निवडून त्यांच्यावर काम करण्यात आले. यामध्ये कसबा भागातील प्रियदर्शिनी अभ्यासिका (१० मुले), सावित्रीबाई फुले अभ्यासिका (५ मुले), शिवरत्न अभ्यासिका (७ मुले) आणि वर्धिनी शाखा (१० मुले) एकूण ३२ मुलांचा समावेश आहे. समुपदेशन विभागाची पहिली पालकसभा १५ जणांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या समुपदेशन केंद्राचा मुलांना त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये नक्कीच फायदा होईल.

---

### ❋ संघ शिक्षा वर्गामध्ये झालेली भेट ❋

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ शिक्षा वर्ग शिबिरात शिवकुमार राजेंद्र आवटे याच्याशी ओळख झाली आणि स्वभाव व विचार जुळल्याने त्याच्याशी घट्ट मैत्री झाली. वर्धिनीचे काम व मी करत असलेल्या अभ्यासिकांचे काम त्याला सांगितले. कामाबद्दल सतत चर्चा त्याच्याबरोबर होत असे. या चर्चेने प्रेरित होऊन त्याने वर्धिनीसारखे काम आपल्या गावात शिराळा, जि. सांगली येथे ऑगस्ट महिन्यापासून सुरु केले. वर्धिनी करत असलेल्या नेतृत्व निर्माणाच्या कामाची गरज सर्वत्र आहे. असे काम करणारे कार्यकर्ते समाजातून पुढे आल्याने समाजात अपेक्षित बदल निश्चित दिसतील.

– **श्री. उमेश माळेकर** (उत्थान विभाग प्रमुख)

### सेवेतून सेवेकरी घडवूया...

विभागाच्या सहा वर्षाच्या प्रवासात इ. ५ वी मध्ये येत असलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी आता युवक-युवती झाल्या आहेत. अशा युवांची एकूण संख्या ३६ आहे आणि यातील काही युवांनी आता अभ्यासिकेमध्ये प्रत्यक्ष काम करण्यास सुरुवात केली आहे. अभ्यासिकेत विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेले, आज वर्धिनीचे संस्कार अंगी बाळगून आपणही समाजाचे देणे लागतो या भावनेने काम करण्याचा प्रयत्न करत आहेत.

यामध्ये उत्कर्षा अभ्यासिकेमधील जान्हवी लांडगे, शुभांगी यामजले, गौरी मोहिते, ज्ञानेश्वरी वायदंडे, हरकादास अभ्यासिकेमधील रोनित कसबे, प्रतिक पाटोळे, ओम रणदिवे, प्रियदर्शनी अभ्यासिकेतील अनिकेत काळे, हर्षवर्धन कांबळे, स्वरूप अभ्यासिकेतील कशीश नवले, तर स्वराज्य अभ्यासिकेमधील धनश्री किज्रे आणि मानसी सणस अशा अनेक नवीन कार्यकर्त्यांची फौज तयार झाली. विभागातील मोठ्या गटातील विद्यार्थीसुद्धा या कार्यकर्त्यांच्या प्रेरणेमुळे 'पुढे आमची अभ्यासिका आम्ही घेऊ' असे सांगतात. सेवेतून सेवेकरी घडण्यास सुरुवात झाली आहे.

१९ जुलै १९९० ला 'कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड' कंपनीची स्थापना झाली.
श्री. ई. श्रीधरन चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर या पदावर रुजू झाले.

# विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा

विभागाचे या वर्षीचे उदिष्ट, **'संकल्पनांवर आधारित प्रयोग करून दाखवणे'** व **'प्रयोग करण्याची संधी उपलब्ध करून देणे'** हे होते. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रवास झाला.

| तालुके | शाळा | विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| खेड | १३ | १३६१ | १०७२ |
| हवेली | ९ | ५९९ | ५३२ |
| मुळशी | १२ | १०९८ | ९७३ |
| भोर | ९ | ६८६ | ५९७ |
| खंडाळा | २ | ९७ | १०५ |
| अहमदनगर | ५ | ६२५ | ६०२ |
| एकूण | ५० | ४४६६ | ३८८१ |

⁕ **वर्षभरात घेतलेले प्रयोग :** अभ्यासक्रमातील संकल्पना स्पष्ट व्हाव्यात या हेतूने खालील प्रयोग मांडले.

१. रोबोटिक विषयाचा परिचय आणि प्रतिकृती बनवणे – रोबोटिक कार व मांजर २. अणु संरचना. ३. आवर्त सारणी. ४. pH मूल्य ओळखणे. ५. रासायनिक अभिक्रिया. ६. दाबाचे प्रकार. ७. इलेक्ट्रिक वायरिंग आणि प्रतिरोध. ८. इलेक्ट्रिक बेल व विद्युत चुंबक. ९. आर्किमिडीजचे तत्त्व.

**विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया :** कु. दिनेश शांताराम मालुसरे (श्री शिवाजी विद्यालय, नसरापूर) – प्रत्यक्ष प्रयोगातून कुतूहल निर्माण झाले. नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. विज्ञानाची भीती नाहीशी झाली.

कु. सिद्धी पाषाणकर (श्री सिद्धेश्वर विद्यालय, वेताळे) – मूलद्रव्यांचे वर्गीकरण, मूलद्रव्यांच्या संयुजांचा उपयोग, व इलेक्ट्रोन संरचना खूप चांगल्या प्रकारे समजले.

कु. तन्मय भोकसे (राष्ट्रीय विद्यालय, कुरकुंडी) – आम्हाला रोजच्या वापरातील वस्तूपासून बनवलेले छोटे छोटे प्रयोग दाखवले. यामधून संकल्पना समजणे सोपे झाले.

कु. निशा जयवंत चव्हाण (न्यू इंग्लिश स्कूल, वरवे) – आम्ल व आम्लारीमधील फरक प्रयोगाच्या माध्यमातून सांगितल्याने तो अधिक स्पष्ट झाला.

कु. कार्तिकी बाजीराव हंबीर (माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आंबोली) – फिरत्या प्रयोगशाळेमार्फत आम्हाला रोबोटिक कार बनवण्याचा अनुभव मिळाला. अशा प्रकारचा हा पहिलाच अनुभव होता. आम्ही सर्वांनी आनंदाने या नव्या गोष्टी शिकून घेतल्या.



१९९२ मध्ये घटनादुरुस्ती करून ग्रामीण व शहरी भागातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना १/३ राखीव जागा असाव्यात असा कायदा संमत झाला.

## ✻ विद्याधनम् शिष्यवृत्ती ✻

टाटा मोटर्स व 'स्व'–रूपवर्धिनी यांच्या माध्यमातून 'विद्याधनम् शिष्यवृत्ती' वेगवेगळ्या शाळांतील १०० हुशार व गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये ४,०००/– देण्यात आली. यासाठी स्थानिक शाळातील मुख्याध्यापक आणि विज्ञान शिक्षक यांचे सहकार्य लाभले. या विद्यार्थ्यांच्या घरी संपर्क करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीविषयी मार्गदर्शन करण्यात आले. 'स्व'–रूपवर्धिनी फिरती प्रयोगशाळेच्या संपर्कातून चाकण, राजगुरुनगर, खेड येथे कोविड लसीकरण मोहीमही राबवण्यात आली.

## ✻ गुणगौरव समारंभ ✻

२०२१–२२ च्या १० वी इयत्तेत उल्लेखनीय गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ कुंडेश्वर विद्यालय – पाईट, ता. खेड येथे आयोजित करण्यात आला. विभागाचे पालक श्री. सुहास अनंत काणे (माजी उपसंचालक डी.आर.डी.ओ., पुणे), श्री. कुमकर (मुख्याध्यापक – कुंडेश्वर विद्यालय, पाईट) आणि इतर शिक्षक तसेच पालकही कार्यक्रमाला उपस्थित होते. सत्कारमूर्ती – १) ईशा आरुडे – ९७.२०% २) साहिल डांगळे – ९१.६०% ३) प्रियांका डांगळे – ९१.५९%

## ✻ प्रश्नमंजुषा ✻

'शाश्वत ऊर्जा विकासात बॅटरीचे महत्त्व' विद्यार्थ्यांना समजावे यासाठी टाटा मोटर्सच्या ERC विभागाच्या सहकार्याने ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'संचय ऊर्जेचा अविष्कार विज्ञानाचा' या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन दि. २५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २२ या कालावधीत झाले. शाळांच्या व्हॉटस्अप गटावर रोज एक प्रश्न पाठवून व त्यांची उत्तरे डिसेंबर अखेरपर्यंत मागवली. विद्यार्थी सहभागी संख्या – २१५०

## ✻ अभ्यास दौरा ✻

यावर्षीच्या प्रश्नमंजुषेचा विषय संचय ऊर्जेचा असल्यामुळे त्या संदर्भातील प्रक्रिया उद्योगाची माहिती व प्रत्यक्ष अनुभव स्पर्धेच्या विजेत्यांना द्यावा, या हेतूने कार्यकर्त्यांनी एक पाहणी दौरा आखला. शिवरे येथील मॅक्स पॉवर बॅटरीज कंपनीला भेट देऊन विजेत्यांच्या सहलीचे नियोजन करण्यात आले.

## ✻ इतर संस्थांबरोबर काम ✻

✻ अंध अपंग विद्यार्थांसाठी : पुण्यातील कोरेगाव पार्क येथील अंध मुलांच्या शाळेतल्या विद्यार्थांना विज्ञान प्रयोग करता व अनुभवता यावे यासाठी, विद्युत सुवाहक व दुर्वाहक वाहक ओळखता यावे यासाठी विद्युत दिव्याऐवजी बेलचा वापर करण्यात आला तसेच चुंबकावर आधारित विशेष प्रयोग साहित्य बनवण्यात आले.

✻ वयम संस्था, पालघर येथे चार दिवसीय साहित्य निर्मिती कार्यशाळेत श्री. रविराज पाटील व श्री. योगेश तांबट हे सहभागी झाले व जिल्हा परिषदेच्या २५ शाळांना देण्यासाठी १५ विज्ञान साहित्य संच बनवण्यासाठी सहकार्य केले.

✻ ज्ञानेश पर्णकुटी : स्व. ज्ञानेश पुरंदरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त नगर जिल्ह्यातील रायकरवाडी गावातील ज्ञानेश पर्णकुटीस भेट देऊन गावाजवळील भारत विद्यालय मिरजगाव, नूतन विद्यालय मिरजगाव, छत्रपती शिवाजी विद्यालय घोगरगाव व नगर फौंडेशन रावळगाव, नागेश्वर विद्यालय थेरगाव या शाळांमध्ये प्रयोगांची प्रात्यक्षिके घेण्यात आली.

## ✻ विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा ✻

हसत खेळत विज्ञान (Joy of Learning Science Through Experiments), दि. १६ ऑक्टोबरला विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. कार्यक्रमात ६६ शिक्षकांनी सहभाग घेतला. प्रा. भगवान चक्रदेव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विविध विज्ञान प्रयोगांची प्रात्यक्षिके सादर केली. त्यांनी टाकाऊ वस्तूपासून प्रभावी

२६ जानेवारी १९९८ ला हिरवा झेंडा दाखवत पहिली कोकण रेल्वे ट्रॅकवर धावली.
त्याकरिता १००% भारतीय इंजिन अभियांत्रिकीचा वापर करण्यात आला.

अध्यापन साधने कशी बनवायची हे सोप्या भाषेत सांगितले. पुढील प्रयोगांद्वारे सहभागी शिक्षकांना संकल्पना समजावून सांगितल्या.
१. ब्लोअर – बर्नौली प्रमेय २. न्यूटनचा पाळणा ३. प्रकाशाचे विवर्तन/(Diffraction of Light)
४. स्पेक्ट्रोमीटर ५. प्रतिकर्षण ही चुंबकत्वाची खरी कसोटी आहे ६. पॅरा मॅग्नेटिक पदार्थ आणि डाय मॅग्नेटिक पदार्थ ७. चुंबकीय ब्रेक आणि एडी करंट (Magnetic Brake Eddy Current) ८. ओळंब्याच्या साह्याने गुरुत्वीय मध्य काढणे व वस्तू संतुलित करणे (Balancing Puppet Plum line) ९. केंद्रिय वस्तुमान १०. दोरीवर चालणारी सायकल ११. फिरणारा हातोडा १२. वॉटर फॉग – उच्च वारंवारता व्हायब्रेटर

**उपस्थित सहभागी शिक्षकांच्या निवडक प्रतिक्रिया :**

* सौ. शीतल जाधव (श्री म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी) : हसत खेळत विज्ञान प्रयोगातून मूलभूत संकल्पना समजल्या, उपकरणे कशी बनवायची हे समजले, छोटे छोटे बदल करून एकाच प्रयोगातून अनेक संकल्पना स्पष्ट करता येऊ शकतात हे समजले.
* सौ. संध्या गवळी (योजक, आकुर्डी) : वेस्ट मधून बेस्ट साहित्य कसे बनवायचे हे समजले. या बरोबरच विज्ञान विषयात आवड निर्माण करणे, दैनंदिन जीवनात उपयोग करणे व हाताने प्रयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे हे समजले.
* श्रीमती मनीषा रामचंद्र खेडेकर (पिरंगुट इंग्लिश स्कूल, पिरंगुट) : भौतिकशास्त्रातील संकल्पना स्पष्ट करण्यासाठी प्रथमच अशा प्रकारचे साधन पाहिले. श्री. चक्रदेव सरांनी अतिशय सोप्या, सुलभ, ओघवत्या भाषेत संकल्पना स्पष्ट केल्या. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुरेख होते.
* श्री. विलास आदलिंगे (आदर्श विद्यालय, आंबोली): विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष प्रयोग साहित्यांच्या साह्याने शिकण्यास मिळाल्या.अप्रतिम सादरीकरण होते. मी याचा उपयोग विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी नक्की करेन.

### आस धरूया ज्ञानाची...

**ग्रामीण भागातील अनुभव –** फिरती प्रयोगशाळा जाते त्यातील एक शाळा म्हणजे सिद्धेश्वर विद्यालय, वेताळे. या शाळेतील एका विद्यार्थिनीचा फोन आला, तिला डी. एड. करायचे होते, पण घरची परिस्थिती अतिशय हलाखीची, वडिलांनी स्पष्ट सांगितले 'मी तुझे शिक्षण करू शकत नाही.' माझे शिक्षण थांबणार, 'ते चालू ठेवण्यासाठी तुम्ही काही करू शकता का?' तिची आई व ती भेटायला आली होती. तिचा प्रवेश समविचारी संस्थेत, कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत डी. एड. अभ्यासक्रमासाठी व तेथील वसतिगृहात करून दिला.
असाच दुसरा अनुभव. भैरवनाथ विद्यालय, दोंदे शाळेत गेलो होतो. एक मुलगी मुंबईवरून शाळेत नवीनच आली होती. मुंबईत असताना तिचे वडील सुरक्षारक्षक म्हणून काम करत होते. एक दिवस अचानक बेपत्ता झाले, दोन महिने सापडले नाहीत, शेवटी तिची आई तिला घेऊन दोंदेला तिच्या काकांकडे आली. काकांची परिस्थितीही यथातथाच. तिच्या शिक्षणासाठी काही करू शकाल का? तेथील एका शिक्षिकांनी विनंती केली. दहावीत असलेल्या या मुलीची या वर्षीची व्यवस्था आपण आपल्या एका हितचिंतकांमार्फत केली.
ग्रामीण भागातील विद्यार्थी व शिक्षकांमध्ये शिक्षणासाठी आपल्या पाठीमागे उभी राहू शकते ती संस्था म्हणजे 'स्व'-रूपवर्धिनी असा विश्वास, अशी प्रतिमा निर्माण होत आहे.

# समुपदेशन विभाग



पालक कट्टा – २८४



वैयक्तिक समुपदेशन – २१३

**एकूण लाभार्थी ३४१६**



विविध मानसशास्त्रीय चाचण्या – १७२३



विविध विषयांची सत्र – ११९६

### ✻ विभागाचे मुख्य उदिष्ट ✻

वर्धक–वर्धिकेला विविध कौशल्याची जाणीव करून देणे आणि मानसिकरीत्या सक्षम बनवणे हे विभागाचे मुख्य ध्येय आहे. याला अनुसरून विभागाने मुख्य चार विषयात काम केले.

१) सुजाण पालकत्व २) वयात येताना – युवा गट ३) वैयक्तिक समुपदेशन ४) विविध मानसशास्त्रीय चाचण्या.

### ✻ वैयक्तिक समुपदेशन ✻

माणूस हा प्रेमाचा भुकेला आहे. प्रत्येक माणसात खूप सुंदर कौशल्ये दडली आहेत. योग्य वेळी योग्य व्यक्तीशी संवाद साधणे खूप गरजेचे आहे. स्वतःवर विश्वास, संयम, कष्ट करण्याची तयारी असेल तर स्वतःला प्रगती वाचून कोणी थांबवू शकणार नाही हे वैयक्तिकरीत्या बोलताना जाणवले.

पद्धत : रॅपो डेव्हलपमेंट – विश्लेषण – ध्येय निश्चित करणे – कृती योजना – समस्येवर मात करणे.

समुपदेशनासाठी आलेल्या केसेसची संख्या – वर्तणुक समस्या – ६, मानसिक ताण – १२,
कौटुंबिक समस्या – २१, करियर मार्गदर्शन – १७४

११ मे १९९८ पासून सलग तीन दिवस पोखरणच्या वाळवंटात एकूण ५ अणुचाचण्या झाल्या. त्यात भारताने आपली 'सुपर थर्मल' (हायड्रोजन बॉम्ब) ची क्षमता सिद्ध करून दाखवली.

**साथी हाथ बढाना**

स्वामी श्रद्धानंद शाखेचा युवक; नुकतीच १२ वी ची परीक्षा पूर्ण झाली. विभागामधून त्याची कल चाचणी घेण्यात आली. त्याने पुढे जाऊन NDA करावे असे सुचवण्यात आले.

काही दिवसांनी १२ वीचा निकाल लागला. परीक्षेच्यावेळी घरच्या काही अडचणींमुळे पेपरवर खूप परिणाम झाला. त्यामुळे त्याला अपेक्षित तेवढे टक्के पडले नाही. घरची परिस्थिती बिकट होती. यासाठी कला (आर्टस्) क्षेत्र घेऊन आपण नोकरी करावी असे त्याने ठरवले होते. पण एकदा समुपदेशन विभागात जाऊन ताईंशी बोलावे म्हणून तो भेटायला आला. आमच्यासमोर सर्व परिस्थिती मांडली. फीची अडचण होतीच पण त्याचबरोबर करियर पक्के होत नव्हते. संस्थेतील कार्यवाह यांच्याशी बोलणे झाल्यावर फीचा प्रश्न सुटला. त्याचबरोबर B.Sc. Computer Science करावे असेही ठरले. युवक हुशार, कष्ट करण्याची तयारी, फक्त योग्य दिशा आणि आर्थिक मदत मिळाल्यामुळे त्याचे करियर करता आले. आज संस्थेच्या मदतीमुळे अनेक मुलांचे प्रश्न सुटले आहेत.

## ❊ युवा गट – विविध विषयांचे सत्र – व्याख्याने ❊

वर्धिनीतील सर्व विभागातील युवा कार्यकर्त्यांना खालील व्याख्यानांमधून मार्गदर्शन मिळाले.

| व्याख्याते | विषय | व्याख्याते | विषय |
|---|---|---|---|
| श्री. शिरीष पटवर्धन | परीक्षेपूर्वी नियोजन | सौ. शिल्पा तांबे | आपले करियर |
| डॉ. विनेश नगरे | आपले आरोग्य | श्री. रोहित धायरकर | स्वत:चे नियोजन |
| कु. ऋतुजा नराल | पंचकोष | सौ. सुरेखा माळी | वेळेचे नियोजन |
| श्री. सुरेश पवार | मैत्री आणि सौंदर्य | श्री. अक्षय कदम | स्वतःचे नियोजन |
| श्री. विजय केळकर | गुंफण नात्यांची | सौ. मेघा नगरे | तारुण्याशी संवाद, |
| श्री. अमिता आंबेकर | करियर कसे निवडावे | | कल चाचणीचे महत्त्व, |
| श्री. विजय नवले | करियरच्या वाटा | | कळी उमलताना, |
| श्री. हेमंत भुजबळ | Vocational courses | | संयम, पंचकोष. |

**माझ्यातली मी...**

मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. घरापासून लांब, खोली घेऊन मैत्रिणीसोबत राहत होते. पण सतत काही ना काही कारणांमुळे वादविवाद होत होते. त्याचा सर्व परिणाम अभ्यासावर आणि माझ्यावर व्हायला लागला. सर्व सोडून घरी निघून जावे असे वाटायला लागले. तेवढ्यात एक मित्राने 'संस्थेतील समुपदेशन विभागास भेट दे' असे सांगितले.

मी थोडा विचार करायला वेळ घेतला. घरच्यांना काय तोंड दाखवणार ? घरी गेली की लग्न लावतील, स्वप्न अपुरे राहील. डोळ्यासमोर अंधार दिसू लागला. मग लगेच समुपदेशन विभागात जाऊन मेघाताईंना भेटले. माझ्या दोन–तीन भेटी ताईंबरोबर झाल्या. पुन्हा एकदा मी नव्याने विचार करू शकले. पुन्हा जोमाने अभ्यासाला लागले. आज मी मला पुन्हा नव्याने सापडले. ताईंनी माझे स्वप्न पुन्हा फुलवले. मी संस्थेची आणि ताईंची खूप आभारी आहे.



१९९८ पासून भारताचा जगाच्या दूध उत्पादनात पहिला क्रमांक आहे.
श्री. वर्गीस कुरियन यांच्या मार्गदर्शनामुळे भारतात दूध क्रांती झाली.

**✻ वयात येताना ✻**

वर्धिनीमध्ये तसेच वेगवेगळ्या शाळांमध्ये ८ वी, ९ वीतल्या मुला–मुलींना संयम प्रकल्पाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. तेव्हा उत्स्फूर्तपणे विद्यार्थी लिहिते झाले.

✻ धन्यवाद मेघाताई. तुम्ही आमच्या वर्गात येऊन खूप चांगल्या गोष्टी सांगितल्या ज्या की या वयात कळणे हे खूप गरजेचे आहे. पण ते चांगल्या पद्धतीने तुम्ही आम्हाला सांगितलं. माझ्यासोबत या विषयावर बोलण्यासाठी माझी आई, माझे बाबा, माझी बहीण सर्व नातेवाईक आहेत. हे सर्व मुलींना लागू होत नाही. काही मुलींना आपलं मन मोकळे करण्यासाठी कोणीच नसतं पण आज तुम्ही आलात, आमच्याशी संवाद साधलात त्यासाठी धन्यवाद. आमच्या वर्गात कोणीच इतकं मनमोकळेपणाने बोलले नव्हते व आज तुमचे विचार ऐकून छान वाटले व पुन्हा तुम्हाला जमले तर आमच्या वर्गावर नक्की या.

✻ एका शाळेतील अनुभव. मुख्याध्यापकांनी आमच्याजवळ एका ८ वीच्या वर्गातील सर्व मुलींची तक्रार केली होती. मुलींजवळ काही कागदावर लिहिलेल्या गोष्टी सापडल्या, त्या कोणी लिहिल्या होत्या यासाठी कोणी कबूल होत नव्हते. खरं तर ही गोष्ट नवीन नाही, वयात आल्यावर अशा गोष्टी मुलांकडून होतातच. संपूर्ण वर्गावर त्याचा परिणाम दिसत होता. शिक्षकांनी खूप प्रयत्न केले, पण मुली बोलत नव्हत्या.

ज्या दिवशी आमचे शाळेत सत्र होते, त्या दिवशी त्याच वर्गावर आम्ही दोन तास मुलींशी बोलत होतो. त्याचा परिणाम असा झाला की स्वतःहून दोन मुली वर्गात उभ्या राहिल्या आणि त्यांनी कबुली दिली की जे काही चुकीचे लिहिले गेले ते त्यांच्याकडून झाले आणि ह्या पुढे त्या त्यांच्यात बदल करतील आणि जेव्हा जेव्हा त्यांना काही चुकीचे वाटेल तर त्या लगेच एका योग्य व्यक्तीशी संवाद साधतील.

ही सर्व कबुली त्यांनी स्वतः मोठ्या बाईंकडे दिली. बाईंना सुद्धा खूप आनंद झाला आणि त्यांनी त्या दोन्ही मुलींना जवळ घेतले. यामुळे शाळेचे व आमचे नाते दृढ झाले.

**✻ पालक कट्टा ✻**

सर्व विभागातील पालकांसाठी दूरदृकश्राव्य माध्यमातून (ऑनलाईन) विविध विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

| | |
|---|---|
| सौ. शिल्पा तांबे , श्री. अरविंद केळकर, सौ. मेघा नगरे | आनंदमय पालकत्व |
| सौ. शुभांगी तांबट, सौ. दीपाली पवार, डॉ. मनीषा नारकर | पालकत्व निभावताना |
| श्रीमती लता टिळेकर | १० वी मुलांची, साथ पालकांची |
| श्रीमती पुष्पा नडे | कार्य अनुभव |
| डॉ. अनघा लवळेकर | बालक पालक |
| श्री. विजय नवले | मुलांचे वाचन आणि संवाद |
| सौ. दीपा थोरात | मुलांची शैक्षणिक गुणवत्ता |
| डॉ. मनीषा नारकर | आपले आरोग्य आणि आहार |
| डॉ. अरुणा कौलगुड | Documentation skills |

**डॉ. सौ. अनघा लवळेकर –** निसर्गाच्या सान्निध्यात आपण एक तरी झाड लावलेले असावे असे साधारणपणे प्रत्येक माणसाला वाटत असते. ते झाड लावण्यासाठी आपण कितीतरी प्रक्रिया करत असतो. कुंडीपासून ते झाड लावल्यानंतर फुले येण्यासाठी खत घालतो. पण एवढे करूनही काम संपत नाही त्याला दररोज पाणी द्यावे लागते तशीच पालकत्वाची भूमिका आहे.

१९९९ च्या मे ते जुलै या कालावधीत कारगिल युद्ध झाले. भारताच्या या रणविजयाची कहाणी प्रेरणादायी आहे. म्हणून २६ जुलै हा ‘कारगिल विजय दिन’ म्हणून भारतात साजरा होतो.

* आपण मुलांसाठी जाणीवपूर्वक काय काय करतो याचा विचार सर्व पालकांनी केलाच पाहिजे.

* जेव्हा दोन्ही पालक नोकरी करत असतात, अशा पालकांनी मुलांच्या सहवासात राहिले पाहिजे, त्यांना पुरेसा वेळ दिला पाहिजे, मुलांशी संवाद साधला पाहिजे.

* मुलांना ज्यात आवड आहे त्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे, आपल्याला जी गोष्ट आवडत नाही ती मुलाने करू नये हा अट्टाहास पालकांनी टाळला पाहिजे.

* मुलांबरोबर संवाद साधताना त्यांनी दिवसभर कोणत्या गोष्टी घडल्या, त्यांना पडणारे प्रश्न कोणते, असे काही घडले का त्यामुळे ती दुखावली गेली ? या गोष्टींबाबत मुलांशी सहजतेने संवाद साधावा.

**श्री विजय नवले –** पुस्तक हा खजिना आहे, गुरु आहे. त्यामुळेच आपल्या ज्ञानात भर पडते. वाचन केल्यामुळे आपल्याला योग्य दिशा मिळतात. जसे की 'एका दिशेचा शोध', लेखक श्री. संदीप वासलेकर यांनी हे पुस्तक खूप छान व विचारपूर्वक लिहिले आहे. पुस्तकातील प्रत्येक पान चांगली कृती/काम करण्याची प्रेरणा देते.

* आपण जे करतो त्याचे अनुकरण मुले उत्साहाने करतात. यासाठी आपण स्वतः पहिल्यांदा पुस्तके वाचायला सुरवात केली पाहिजे.

* मुलांना सुरुवातीला छोटी गोष्टी स्वरूपाची पुस्तके आणून दिली पाहिजेत व वाचून घेतली पाहिजेत.

* जे आपण वाचन केले आहे त्यावर मुलांशी सहज गप्पा गोष्टीतून संवाद साधला पाहिजे.

## * विविध मानसशास्त्रीय चाचण्या *

* **बुद्धिमापन चाचणी –** शाखेत गुणवत्तापूर्ण वर्धक–वर्धिकांची निवड व्हावी याकरिता बुद्धिमापन चाचणी घेतली जाते. या चाचणीद्वारे मुलांचे भाषा व संख्या ज्ञान, आकलन तपासले जाते. यावर्षी एकूण १६८९ मुलांची विविध शाळांमधून चाचणी करण्यात आली. नूतन बालविकास मंदिर, नु.म.वि., हुजूरपागा, न्यू इंग्लिश स्कूल, अरण्येश्वर विद्यालय, आबासाहेब अत्रे प्रशाला, महर्षी अण्णासाहेब शिंदे विद्यालय, भावे माध्यमिक विद्यालय, शिशु विहार प्राथमिक शाळा, प्रतिभा पवार विद्या मंदिर, अशा १० शाळांमध्ये विद्यार्थ्यांची बुद्धिमापन चाचणी घेण्यात आली.

* **कल चाचणी (ॲप्टीट्यूड टेस्ट)** – दहावी उत्तीर्ण झालेल्या मुलांची कल चाचणी घेण्यात आली. ही चाचणी एकूण तीन तासांची आहे. ही चाचणी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. प्रत्येक मुलाला त्याचा वैयक्तिक रिपोर्ट देऊन पालकांबरोबर वैयक्तिक समुपदेशन करण्यात आले. ८५ मुलांची ही चाचणी घेण्यात आली.

प्रत्येक ठिकाणी काम करताना येणारे अनुभव काम करण्यासाठीची ताकद वाढवते. असाच एक सुंदर अनुभव आम्हाला नूतन बाल विकास मंदिर शाळेत आला. अनेकदा आत्ताची पिढी स्वतंत्र आणि खुल्या विचारांची असल्याने आपली संस्कृती, आपले आदर्श विसरेल की काय अशी भीती वाटते.

बुद्धिमापन चाचणी घेण्यास आम्ही शाळेत गेलो. होणारी बुद्धिमापन चाचणी ही निवडक मुलं शाखेत यावीत ह्यासाठी आहे, हे तिथल्या शिक्षकांना कळले. चाचणी चालू असता एका शिक्षिकेने मला सांगितले की, 'अमुक मुलगा खूप हुशार आहे, त्याला वडील नाहीत, आई धुण्याभांडीची कामे करून त्याचे शिक्षण करत आहे. शाळासुद्धा जशी जमेल तशी त्याला मदत करत असते. पण जर त्या मुलाला तुमच्या शाखेत घेतले तर त्याचे भविष्य उज्ज्वल होईल.' चाचणीमध्ये तो उत्तीर्ण झाला तर त्याला प्रवेश होताच. त्या मुलाची चाचणी देऊन झाली होती. तो त्याचे दप्तर भरत होता. त्याच वेळेत त्याचे चित्रकलेचे कागद खाली पडले. त्याने ते उचलले व तो नतमस्तक झाला. मला जाणून घ्यायचे होते की तो पाया का पडला ? मी पहिले तर ते शिवाजी महाराजांचे चित्र रेखाटले होते. ते खाली पडले म्हणून तो नतमस्तक झाला. हे पाहून मनातली भीती दूर झाली व त्या मुलाचा मला अभिमान वाटला.



बदलत्या तंत्रज्ञानाला वैधानिक पाठबळ देण्यासाठी सन २००० मध्ये 'आयटी ॲक्ट' तयार करण्यात आला.

# महिला विभाग

समाजातील स्त्री शक्तीचे जागरण झाल्याशिवाय, समाजाचा विकास अपूर्ण आहे. तळागाळातील महिला व मुली ह्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्या आत्मनिर्भर होऊन इतरांबरोबर त्यांना सन्मानाने जगता यावे, ह्या उद्देशाने १९८९ मध्ये महिला विभागाची सुरवात झाली.

त्यातील विभागांचा आढावा पुढीलप्रमाणे –

**⁕ रुग्ण सहाय्यक वर्ग ⁕**

**⁕ निवासी शिबिर –** कोरोनाचे बंधन उठल्यामुळे रुग्ण सहाय्यक वर्गाचे (२०२१–२२) दि. १० ते १२ मार्च रोजी निवासी शिबिर वर्धिनीच्या इमारतीत झाले. पुणे, माले व चऱ्होली या तीनही वर्गातल्या ६० मुली व १० शिक्षक व कार्यकर्ते यात सहभागी झाले होते. शिबिरात वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शनपर सत्रे झाली.

| वक्ते | विषय |
|---|---|
| श्री. रविंद्र देव | उद्‌घाटन – चित्रकला |
| डॉ. माधव केळकर | अतिदक्षता विभाग |
| श्रीमती बागेश्री पोंक्षे | ‘स्व’ची ओळख |
| श्रीमती साधनाताई सेठिया आणि सहकारी | सहजीवनाच्या उंबरठ्यावर |
| डॉ. विनेश नगरे | PCOD |
| डॉ. प्राजक्ता कोळपकर | प्रा संस्था परिचय |
| श्रीमती नलिनी जाधव | अंधश्रद्धा निर्मुलन |
| श्रीमती उषाताई दांडेकर | बौद्धिक खेळ |
| श्री. सुहास काणे | समारोप – अंटार्क्टिका मोहीम |

**विशेष सत्र –**

⁕ उद्‌घाटन – प्रसिद्ध चित्रकार मा. रवींद्र देव सरांनी शिबिराच्या उद्‌घाटन सत्रात ‘चित्रं कशी वाचावीत’ हा विषय मांडला. त्यांनी स्वतः काढलेली चित्रे मांडून त्यातील संकल्पना, रंगनिवडीचे तंत्र स्पष्ट केले. ते म्हणाले, ‘प्रत्येकात काही ना काही कलागुण लपलेले असतात. ते ओळखून जोपासले पाहिजे. त्यामुळे आपले जीवन आनंदी होते.’ त्यांनी स्वतः काढलेले एक निसर्गचित्र वर्धिनीला भेट दिले.

⁕ अतिदक्षता विभागाचे तज्ज्ञ डॉ. माधव केळकर सरांनी या विभागाची संपूर्ण माहिती व तिथे काम करणाऱ्या परिचारिकेची जबाबदारी मुलींना समजून सांगितली. विभागातील स्वच्छतेचे, खंबीरपणे, जागरुकतेने काम करण्याचे महत्त्वही स्पष्ट केले.

सन २००० मध्ये टाटा टी कंपनीने त्यावेळी चहा क्षेत्रातली जगातली क्रमांक २ ची बलाढ्य कंपनी ‘टेटलीज’ ताब्यात घेतली.

❊ श्रीमती बागेश्री पोंक्षे ताईनी मुलींकडून स्वतःचे 'SWOT' विश्लेषण खेळातून करून घेतले, स्वतःतील बलस्थाने (Strength) ओळखलीत तर तुमच्यातील कमी असणाऱ्या (Weakness) गोष्टींना मागे सारून, योग्य वेळेत त्यातील धोके (Threats) ओळखून समोर आलेल्या संधीचे (Opportunity) आपण सोने करू शकतो हे सर्वांच्या लक्षात आले.

❊ प्रा फौंडेशनच्या संस्थापिका डॉ. प्राजक्ता कोळपकर ताईंनी स्वतः सुरू केलेल्या दिव्यांग मुलांसाठीच्या पुर्नवसन केंद्राची माहिती व त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी जीवन प्रवास व्याख्यानातून मांडला.

❊ शिबिराचा समारोप श्री. सुहास काणे सरांनी केला. या सत्रात १९८९ साली सर स्वतः अंटार्क्टिका संशोधन मोहिमेत सहभागी होते. याची चित्रफीत त्यांनी दाखवली. यातून या खंडाची शास्त्रीय माहिती, सजीवांचा अधिवास, भारताने उभारलेली संशोधन केंद्रे व तिथे होणारे संशोधन व घडलेल्या काही रोमांचकारी घटना याची माहिती मिळाली.

❊**अभ्यासदौरा –** दि. १२ मार्चला सर्व विद्यार्थिनींची AFMC नर्सिंग कॉलेज व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, महंमदवाडी येथे अभ्यास सहल झाली. AFMC नर्सिंग कॉलेज, मेडिकल कॉलेजमधील वेगवेगळ्या विषयांवरील प्रदर्शने, संशोधन विभाग, कामातील शिस्त, साधनांची मांडणी व विविधता बघताना नर्सिंग विषयाची व्याप्ती सर्वांच्या लक्षात आली.

देसाई नेत्र रुग्णालय ही एक सामाजिक संस्था आहे. तिथे चालणारे काम, संशोधन हे येणाऱ्या रुग्णाच्या डोळ्यांच्या आजारावर होणाऱ्या उपचारांचा अभ्यास करून होत असते. विभागातील डॉक्टरांनी सध्या लक्षात येणाऱ्या डोळ्यांच्या विविध विकारांची माहिती सांगून जनमानसांत याबद्दलचा प्रचार, जागरुकता कशी केली पाहिजे याचे मार्गदर्शन केले. शिबिरातून व अभ्यास सहलीतून सर्वांना विविध विषयांची शास्त्रीय माहिती मिळाली.

**❊ उद्‌घाटन सोहळा नवीन वर्गाचा २०२२–२३ :**

**माले वर्ग** – दि. ५ जुलैला वर्गाचा उद्घाटन सोहळा पार पडला. प्रसिद्ध चित्रकार मा. रवी देव प्रमुख पाहुणे म्हणून तसेच सुदर्शन कंपनीच्या CSR विभागातील सौ. वैशाली मुळे व टाटा पॉवर CSR विभागातील सौ. कल्पना हबडे हे मान्यवर उपस्थित होते. वर्गाला ३० मुलींनी प्रवेश घेतला आहे. या कार्यक्रमाला २०२१–२२ ह्या वर्गातील दोन विद्यार्थिनी उपस्थित होत्या. त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'कातकरी समाजात शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आज मला परिचारिका म्हणून एक नवीन ओळख मिळाली. आज आमच्या समाजात आमचा मान वाढला', असे करिश्मा जाधवने सांगितले. प्रमुख पाहुणे श्री. रवी देव 'स्व'–रूपवर्धिनीच्या या वर्गाचे वेगळेपण सांगताना म्हणाले, 'तुम्ही शिकत असलेल्या संस्थेच्या नावाप्रमाणेच तुमच्या स्वरूपाचे वर्धन होईल. करोना काळात एका नर्सिंग कॉलेजमधून GNM झालेल्या मुलीने गावात प्रवासाची साधने नसल्याने एका गरोदर स्त्रीचे सुखरूप बाळंतपण घरीच केले. अशा अनेक उदाहरणांतून सेवेची प्रेरणा मिळत राहते.'

**पुणे वर्ग** – पुण्याचा वर्ग दि. ८ जुलैला सुरु झाला. ४० मुलींनी वर्गाला प्रवेश घेतला आहे. उद्‌घाटन कार्यक्रमात श्रीमती पुष्पाताई नडे व श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी मुलींना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'या वर्गामुळे तुम्हाला सेवेची उत्तम संधी मिळाली आहे. एक चांगले कौशल्य तुमच्या हाती येणार आहे. या कामातील जबाबदारी ओळखून तुम्ही काम कराल तर कामाचा आनंद निश्चित मिळेल.'

**❊ प्रशस्तीपत्रक वाटप वर्ग (२०२१–२२) – पुणे वर्ग –** २८ ऑगस्टला २०२१–२२ या वर्षातील वर्गाचा प्रशस्तीपत्रक वाटपाचा कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून पर्ल हॉस्पिटलचे संचालक डॉ. गणपुले तसेच वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन व कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, सहकार्यवाह श्रीमती पुष्पा नडे उपस्थित होत्या. ह्या वर्षी रुग्ण सहाय्यक विभागाचा निकाल १००% लागला. बक्षिस प्राप्त मुलींचा सत्कार करण्यात आला.



सन २००२ मध्ये घटनादुरुस्ती होऊन 'शिक्षणाचा अधिकार' (राईट टू एज्युकेशन) विधेयकाला मान्यता मिळाली.

**शरीरशास्त्र विषयात प्रथम – किशोरी गावडे, आदर्श विद्यार्थिनी – प्रतीक्षा माने, पुणे वर्गात प्रथम – प्रियंका तांबे**
डॉ. गणपुले यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. 'टेक्निकल गोष्टी सगळेजण शिकतात पण नर्स म्हणून काम करताना समोरच्यालाही मन आहे त्याचा विचार केला पाहिजे. ती व्यक्ती कोणत्या परिस्थितीतून जात आहे ते तटस्थपणे समजून घेऊन काम केल्याने तुम्ही ५०% रुग्ण आपल्या संवादातूनच बरे होतात. वर्धिनीमधून मिळालेला हा वसा तुम्ही दुसऱ्यांनाही दिला पाहिजे.'

**माले वर्ग** – दि. ७ सप्टेंबर रोजी माले वर्गात प्रशस्तीपत्रक वाटप कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे टाटा पॉवरचे अधिकारी श्री. अजय कोन्हूर, सौ. कल्पनाताई हबडे, सुदर्शन संस्थेच्या सौ. वैशाली मुळे ताई आल्या होत्या. बक्षीसप्राप्त मुलींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमानंतर विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले –

सीमा गायकवाड – या वर्गामुळे 'बाहेरच्या जगाची ओळख झाली. आत्मविश्वास वाढला.'
प्रतीक्षा माने – 'घरातील आर्थिक अडचणीमुळे १० वी नंतर वर्ग केला. आज बुधरानीसारख्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी त्यामुळे मला मिळाली.'

**चऱ्होली वर्ग** – दि. २१ ऑक्टोबरला वर्गाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. श्री. सतीश गोरडे, साई श्रद्धा हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. विकास गायकवाड आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते.

**सुखदुःखाच्या झुल्यावरती, आयुष्याचा सजे सोहळा । कधी सुखद गारवा, कधी पोळतो उन्हाळा ।।**

**कुंदन प्रक्षाळे,** रुग्ण सहाय्यक वर्गाचा माजी विद्यार्थी. अगदी कळत नसलेल्या वयामध्ये त्याच्या आई–वडिलांचे निधन झाले होते. परमेश्वर जसे दुःखाचे दान देतो तसे वेगळ्या रुपात मदतीलाही उभा राहतो. आईने ज्या हॉस्पिटलमध्ये शेवटचा श्वास घेतला होता त्याच हॉस्पिटलमधील एका डॉक्टरांनी ह्या तिघा भाऊ बहिणींना वेगवेगळ्या चांगल्या संस्थेत दाखल केले. कुंदनला वंचित विकास संस्थेत, त्याच्या लहान भावाला येरवडा येथील संस्थेत तर छोट्या बहिणीला मानव्य गोकुळ संस्थेत या डॉक्टरांनी दाखल केले. दहावी परीक्षा पास झाल्यानंतर वंचित विकास संस्थेने कुंदनला आग्रहाने 'स्व'–रूपवर्धिनीत सुरू असलेला नर्सिंग कोर्स करण्यासाठी पाठवले. खूप मेहनत करून वर्धिनीतील अभ्यासक्रम त्याने उत्तम यश मिळवून पूर्ण केला. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून कुंदन धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिक करण्यासाठी जायचा. त्याच्या वागण्या–बोलण्यातून रुग्णालयातील डॉक्टर, स्टाफ यांना वर्धिनीचे संस्कार जाणवायचे. रुग्णांना खुलवण्याची हातोटी फारच थोड्यांना जमते. कुंदनकडे ती होती. त्याचा सहवास, त्याचे बोलणे, धुपाच्या गंधाप्रमाणे नेहमी सुगंधाने भारलेले असायचे. त्यामुळेच अभ्यासक्रम पूर्ण होताच धन्वंतरी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी त्याला कामावर रुजू होण्यास सांगितले. ही नोकरी करता करता तो बारावी सायन्सची परीक्षा उत्तीर्ण झाला. हॉस्पिटलमध्ये एका पेशंटने त्याची विचारपूस करताना त्याला बी.एस्सी. करण्याचा सल्ला दिला आणि त्या संदर्भात आवश्यक ती सर्व मदतही देऊ केली. या मदतीच्या आधारावर कुंदनने बीएस्सी अभ्यासक्रमासाठी लीलाबाई ठाकूर कॉलेज ऑफ नर्सिंग येथे प्रवेश घेतला. नोकरी करून पैशाची उभारणी करणे शक्य नव्हते म्हणून त्याने एका ब्यूरोमध्ये कॉल घेण्याचे काम स्वीकारले. कष्टाची नोकरी, नियमित अभ्यास याच्या बळावर त्याने बीएस्सी. नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केले. आता तो Iris Healthcare Clinic & Diagnostics Center, Baner येथे नोकरी करत आहे. कुंदन म्हणतो, 'वर्धिनीमुळे माझे हरवलेले घर मला पुन्हा मिळाले. माझ्या प्रगतीचा रस्ता वर्धिनीमुळे खुला झाला.'

**– शब्दांकन : सुनीता गंगावणे**

## ❊ बचत गट ❊

बचत गटातील महिलांना संघटीत करण्यासाठी दर महिन्याला बैठका होतात. आपलेच पैसे कर्ज स्वरूपात वापरून फायदा कसा होतो आणि याच पैशातून व्यवसायासाठी भांडवल कसे जमा करायचे याचे मार्गदर्शन बचत गटातील महिलांना दिले जाते व त्याचबरोबर इतर उपक्रम सुद्धा घेतले जातात.

❊ बचत गट संख्या : बचत गटाची सध्या संख्या एकूण ५२ आहे.

❊ उलाढाल : एकूण वार्षिक जमा बचत ६७,८८,२६० रु. आहे व कर्ज वाटप ३९,४७,४०० रु.

❊ कर्ज कशासाठी : शाळेचे शुल्क भरण्यासाठी, दवाखान्यासाठी, व्यवसायासाठी, कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी.

**वर्षभरातील महत्त्वाचे कार्यक्रम –**

❊ **आरोग्य सत्र –** महिलादिनाच्या निमित्ताने काशेवाडी, कर्वेनगर व पांडवनगर येथील बचतगटातील महिलांसाठी आरोग्य विषयक सत्र घेतले. सेवा सहयोग फौंडेशनच्या गौरीताई पेंडसे यांनी महिलांना मासिक पाळी विषयी शास्त्रीय माहिती दिली. झालेल्या प्रश्नोत्तरातून या मागच्या महिलांच्या काही अंधश्रद्धा दूर झाल्या.

❊ **व्याख्यान –** महिलादिनाच्या दिवशी वर्धिनीच्या परिसरातील सर्व गटातील महिलांसाठी श्री. निलेश धायरकर यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेल्या सुधारणा' या विषयावर व्याख्यान झाले.

❊ **कार्यशाळा –** महिलांसाठी कागदी पिशव्यांची कार्यशाळा घेतली व त्यातून दोन महिलांना नियमित रोजगार मिळाला आहे. सौ. कुंदाताई नडे यांनी महिलांना 'ऑरगंडी'ची फुले बनविण्यास शिकविले. शिबिरात व वर्धिनीत येणाऱ्या पाहुण्यांचा सत्कार करण्यासाठी ही फुले वापरली जातात. लर्निंग लिंक्स फाऊंडेशन व मास्टर कार्ड सहयोगाने सशक्ती प्रकल्प अंतर्गत 'उद्योजिकता महिलांसाठी' कार्यशाळा झाली. एकूण ३० महिलांचा सहभाग होता.

❊ **सहल –** कर्वेनगरमधील परिसरातील गटांची किल्ले जंजिरा व अष्टविनायक बचत गटाची त्र्यंबकेश्वर, वणी येथे सहल काढण्यात आली. खूपशा महिलांनी समुद्र पहिल्यांदाच बघितला. त्यामुळे ही जंजिरा सहल स्मरणीय झाली.

❊ **नवरात्र –** वर्धिनीच्या सर्व बचत गटातील महिलांचा महाभोंडला झाला. महिलांनी उस्फुर्तपणे देवीची गाणी, भजने सादर केली. फेर धरून भोंडल्याची गाणी म्हटली, पारंपारिक खेळ खेळले. भोंडल्यामध्ये एकूण २०० महिलांचा सहभाग होता.

❊ **विक्री प्रदर्शन –** श्री. संतोष शिर्सेकर सरांनी दि. १७ ऑक्टोबरला प्रदर्शनाचे उद्घाटन केले. यामध्ये १२ व्यावसायिक महिलांनी सहभाग घेतला. यात दिवाळीचे पदार्थ, केमिकल विरहित साबण, पणत्या, खाद्यपदार्थ, आकाशकंदील, तयार कपडे अशा अनेक वस्तूंचे स्टॉल होते.

❖❖❖

## ❊ प्रौढ साक्षरता वर्ग ❊

दीर्घकाळ गाजावाजा न करता पण निर्धाराने चालत असलेला वर्धिनीचा प्रकल्प प्रौढ महिला साक्षरता वर्ग. गेली अनेक वर्षे श्रीमती कबीर आजी महिलांना साक्षर करण्याचे काम अतिशय मनापासून करीत आहेत. हे काम आहे शिक्षणाचे, महिला सबलीकरणाचे, समाज उभा करण्याचे. त्यांचे या कामातील अनुभव अत्यंत प्रेरणादायी व संवेदनशील आहेत. कारण गेली **२२ वर्षे** अखंड कासेवाडी, भीमनगर, सदानंदनगर, इंदिरानगर, मंगळवार पेठ, गाडीतळ, जुना बाजार, आंबेडकर कॉलनी, श्रमिकनगर इत्यादी **२५ वस्त्यांमधील ५२५ हून अधिक महिलांना** त्यांनी साक्षर केलं आहे. त्यांच्या हातात पुस्तके पोहचवली आहेत, अक्षर ओळख करून दिली आहे. '**एकाने शिकवूया एकाला, साक्षर करूया समाजाला**' ही ओळ साक्षात जगणाऱ्या कबीर आजी. त्यांच्या या कामाचा सुगंध कबीराच्या दोह्याप्रमाणे सर्वदूर पोहोचला.



२००५ मध्ये Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act (MGNREGA - मनरेगा) आल्यानंतर महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा खऱ्या अर्थाने देशपातळीवर स्वीकार झाला.

मला समाजकार्य करण्याची खूप इच्छा होती. मी सोमवार पेठेत राहते त्या परिसरात अनेक सेवावस्त्या आहेत. तेथील अशिक्षित महिलांना बघून त्यांच्यासाठी आपण काम करावे अशी मनापासून इच्छा होती. अशा महिलांना साक्षर करून समाजात आणावे हीच तळमळ होती. अशातच मला 'स्व'-रूपवर्धिनीची माहिती मिळाली. मी माझ्या मुलांना वर्धिनीमध्ये चांगले संस्कार घडावेत म्हणून दाखल केले तेव्हा मला कै. किशाभाऊ पटवर्धन, श्री. शिरीष पटवर्धन, पुष्पाताई व बागेश्री दीदी भेटल्या आणि माझी इच्छा पूर्ण झाली. त्यांनी मला प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. त्यानंतर मी झोपडपट्टीत जाऊन महिलांशी संपर्क करण्यास सुरुवात केली. तिथे बऱ्याच अशिक्षित महिला दिसल्या. समाज अशिक्षित असल्याकारणाने 'या वयात महिलांनी शिकून काय करायचे ?' असे म्हणत. त्यामुळे मी ठरवलं, 'या महिलांना उत्तम शिकवायचे व पुढे आणायचे.' यासाठी सुरुवातीला महिलांना त्यांच्या घरी जाऊन मी शिकवू लागले हे करताना 'घरचे काय म्हणतील ?' याची भीती मी त्यांच्या चेहऱ्यावर पहात होते. परंतु घरातील लोकांना भेटून शिक्षणाचे महत्त्व अनेक उदाहरणांतून समजावून सांगितले. अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी मला पुष्पाताई व बागेश्री दीदीने खूप मदत केली. माझ्याबरोबर घरोघरी येऊन त्यांनी संपर्क केला. घरच्यांना समजून सांगितले. त्यामुळे त्यांच्या विचारात बदल झाला. महिला शिकण्यासाठी येऊ लागल्या. महिला वाचायला-लिहायला शिकल्या. घरातून बाहेर पडू लागल्या, मुस्लिम महिलाही मराठी शिकण्यासाठी घराबाहेर पडू लागल्या. शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटू लागले. सध्या वर्धिनीमध्ये माझा वर्ग सुरु आहे. माझ्याकडून ५०० हून अधिक महिला शिकून बाहेर पडल्या. काही परभाषिक महिला उद्योग व शिक्षण वर्गात प्रवेश घेण्यासाठी वर्गात येऊन मराठी लिहायला-वाचायला शिकल्या. शिक्षण का महत्त्वाचे आहे हे त्यांना आता जाणवू लागले आहे आणि वर्गाचा प्रसारही होत आहे.

**– श्रीमती सुगंधा कबीर**

### ❊ शिवण वर्ग व फॅशन डिझायनिंग वर्ग ❊

ह्या वर्गाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनवून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून रोजगाराची नवी दारे खुली करून दिली आहेत.

- दि. १ मार्चला नऊवारी साडी आणि कल्पना साडी शिवण्याचा एक महिन्याचा नवीन वर्ग झाला.
- वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या, फ्रॉक व साड्यांची तोरणे शिवून विक्री.
- दोन्ही वर्गातील महिलांना झबले, दुपटे, टोपडे शिवण्याच्या ऑर्डर मिळाल्या.
- ताराचंद हॉस्पिटलचे कपडे शिवण्यास मिळाले.
- नर्सिंग आणि बालवाडी वर्गाचे युनिफॉर्म शिवणाचे काम मिळाले.
- दिवाळीमध्ये दोन्ही वर्गाची प्रदर्शनी व त्यातून विक्रीचा अनुभव मिळाला.

**यशोवार्ता**

घरची आर्थिक परिस्थिती बेताची आणि शिक्षणही फक्त ७ वी, त्यामुळे **स्वाती घोरपडे**ला (वाघमारे) बाहेर नोकरी मिळत नव्हती. मैत्रिणीकडून स्वातीला वर्धिनीतल्या वर्गाची माहिती मिळाली, त्यातून शिवणवर्ग करायचे तिने ठरवले. हळूहळू गेलेला आत्मविश्वास परत आला आणि फॅशन डिझाइनिंगचा वर्ग तिच्या घरी आलेल्या अडचणींवर मात करून पूर्ण केला. ती आता घरीच बाहेरील शिवणकाम आणते आणि ऑर्डरप्रमाणे कपडे शिवून देते. रोजच्या कामातून ती रु. १५,०००/- पेक्षा जास्त मिळवू लागल्याने घरी आर्थिक स्थैर्य आले आहे आणि याचा तिलाही खूप अभिमान वाटतो.

**घडविता दर्शन कर्तृत्त्वाचे । धागे जुळले नात्याचे ।।**

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडणाऱ्या महिला या खरं तर समाजाच्या आधारस्तंभ असतात. असे असले तरी अनेक ठिकाणी आजही समाजाकडून किंवा प्रत्यक्ष त्यांच्या कुटुंबाकडूनच त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. आजही सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थिक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना महिला बळी पडतात. याचेच एक उदाहरण म्हणजे **प्रज्ञा जालींद्रे.**

३७ वर्षाची प्रज्ञा सासरच्या छळाला कंटाळून, आपल्या १६ वर्षाची मुलीला आणि १३ वर्षाच्या मुलाला घेऊन घराबाहेर पडली. सासवड येथे तिचे माहेर. माहेरची स्थिती खूप बिकट. वयस्कर आई-वडील. घरची बिकट परिस्थिती पाहून उदरनिर्वाहासाठी प्रज्ञा एका स्टेशनरीच्या दुकानात कामाला लागली. तिची लहान बहीण पुण्यात राहते. तिने एकदा तिला वर्धिनीमध्ये चालू असलेल्या रुग्ण सहाय्यक वर्गासंबंधी माहिती सांगितली. आपले वय जास्त असल्यामुळे या कोर्सला प्रवेश मिळेल का अशी शंका तिच्या मनात होती पण बहिणीच्या आग्रहामुळे ती वर्धिनीमध्ये आली. तिने नर्सिंग वर्गाला प्रवेश घेतला.

वर्गात आपण सगळ्यात मोठे आहोत, दुसऱ्या मुलींसारखा आपल्याला अभ्यास करता येईल का अशा विचारांमुळे तिची खूप चिडचिड होत असे. वर्धिनीतलं मोकळं वातावरण, मैत्रिणी आणि शिक्षकांची साथ, प्रेरणादायी व्याख्याने ह्यामुळे तिचा गमावलेला आत्मविश्वास परत आला. सकाळी ७ वाजता के. ई. एम. हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिक असताना पहाटे लवकर उठून सासवड ते मंगळवार पेठ प्रवास करून ती वेळेवर हजर असायची. तिच्या ह्या जिद्दीला खरंच सलाम.

तिने हा वर्ग यशस्वीरित्या पूर्ण केला. तिला चांगली नोकरी लागली. तिच्या नवऱ्यालाही आपण केलेल्या कृत्याची व व्यसनाची लाज वाटू लागली. तिची माफी मागून मानाने तिला आणि मुलांना घरी घेऊन आला. आता प्रज्ञा तिच्या सासरी बारामतीला रहाते. महाजन हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करत आहे. नवऱ्याला तर आता तिचा खूप अभिमान वाटतो. नर्सिंग वर्ग पूर्ण केल्यामुळे माझा संसार सुखाचा झाला असं प्रज्ञा अभिमानाने सर्वांना सांगते.

**संकटं कोसळली, धीराने संघर्ष केला... आता ''प्रतीक्षा'' सुखाच्या क्षणांची –**

ती वर्धिनीतील तिच्या एका मैत्रिणीशी बोलत होती. ''अगं तुला खरंच सांगते, माझ्या आयुष्यात परीक्षा पाहणारे इतके प्रसंग आले. त्यांच्याशी झुंज देताना मी आधारासाठी ''माझी माणसं'' शोधत होते. रुग्ण सहाय्यक कोर्सच्या निमित्ताने मला 'माझी माणसं' वर्धिनीत भेटली.'' प्रतीक्षाचं हे बोलणं माझ्या कानावर पडलं आणि माझ्या डोळ्यासमोर तिच्या जगण्याचा संघर्ष उभा राहिला. खडतर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते याचं उदाहरण म्हणजे **प्रतीक्षा माने**. करोना काळात पतीचे निधन झाले. वय जेमतेम २४ वर्षे. सासरच्यांनी आधार देण्याऐवजी तिला घरातून बाहेर काढलं. तिच्या पदरात पाच आणि सहा वर्षांची अशी दोन लेकरं. दोन्हीही मुली. माहेरी आईकडे आली खरी पण सख्ख्या भावाने सांभाळण्यास नकार दिला. सुदैवाने आई-वडिलांमुळे तिला माहेरी आसरा मिळाला. १० वी पास इतकंच शिक्षण झाल्याने तिने के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये मावशीची नोकरी स्वीकारली. तिथेच तिला वर्धिनीतील वर्गाबद्दल समजले. के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये नोकरी करत असलेल्या वर्धिनीच्या आधीच्या तुकडीतील विद्यार्थिनींनी तिला हवी ती आर्थिक मदत करण्याची तयारी दाखवली. आई-वडिलांच्या साथीने वर्धिनीमध्ये २०२१-२२ च्या रुग्ण सहाय्यक वर्गाला तिने प्रवेश घेतला. निकाल लागण्याअगोदरच तिला बुधरानी हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. आहे ती परिस्थिती स्वीकारून, नशिबाला दोष न देता, झुंज द्यायची ठरवलं तर संकटंसुद्धा माघार घेतात हे तिने सिद्ध केले.



२००६ मध्ये मित्तल उद्योग समूहाचे प्रमुख लक्ष्मी मित्तल (पोलाद उत्पादन क्षेत्रातील तज्ज्ञ) यांनी युरोपमधील 'आर्सेलर' विकत घेण्याची बोली लावली आणि पुढील काही वर्षात व्यवहार पूर्ण केला.

# पाकोळी बालवाडी

२०२२ साल उजाडले तरी करोनाच्या निर्बंधामुळे बालवाडी दूरदृष्य प्रणालीने (ऑनलाईन) सुरू होती. प्रत्येक गुरुवार व शनिवार गुगल मिट द्वारे एक ते दीड तासाचा वर्ग होत होता. यात सहभागी झालेल्या मुलांची संख्या १६० होती. निर्बंध शिथील झाल्यावर प्रत्यक्ष ३ फेब्रुवारी २०२२ पासून करोनाचे सर्व निर्बंध पाळून मोठ्या गटातील मुलांसाठी बालसंस्कार वर्ग नियोजनपूर्वक सुरू करण्यात आले. यातील एक विशेष उपक्रम –

**उन्हाळी निवासी शिबिर**

शिबिर दि. १२ व १३ एप्रिलला मोठ्या उत्साहात पार पडले. मोठ्या गटातील सहभागी मुलांची संख्या ४७ होती. शिबिराचे उद्‌घाटन श्रीमती अपर्णाताई निरगुडे यांनी केले. ‘खरा तो एकची धर्म’ या प्रार्थनेतून शिबिराला सुरुवात झाली. ताईंनी बकासुर व चिमणीची गोष्ट छान रंगवून सांगितली. गटांच्या फुलांच्या नावाप्रमाणे मुलांना फुलांचे तोरण, रंगीबेरंगी पंखांचे वॉलपीस तयार करण्यास शिकवले. संध्याकाळी मुले छान तयार होऊन शिस्तबद्ध पद्धतीने ओळीत बागेत जाण्यासाठी निघाली. बागेत गेल्यावर भरपूर खेळली. नंतर गोलावर बसून रोजचा परिपाठ, मनाचे श्लोक, बडबडगीते, प्रार्थना, शुभंकरोती मुले छान म्हणत होती. वर्धिनीत आल्यानंतर हातपाय स्वच्छ धुऊन थोड्या विश्रांतीनंतर रात्री गरम गरम खिचडी आणि पापड खाऊन झोपी गेली.

दुसऱ्या दिवशी मुले लवकर उठली. स्वतःचे स्वतः आवरून त्यांनी ओंकार सभागृहात व्यायाम, योगासने व कवायतीचे काही प्रकार केले व सूर्यनमस्कार देखील घातले. नाश्ता झाल्यानंतर मुलांच्या विविध मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानंतर मुलांकडून कार्डशीटपासून ससे बनवून घेतले. जेवण झाल्यावर थोडा वेळ विश्रांती घेऊन मुलांनी ‘देवा तुझे किती सुंदर आकाश’ या गीताचा सराव केला व समारोपासाठी माडगावकर सभागृहामध्ये एकत्र जमली. प्रमुख पाहुण्या सौ. शिल्पाताई पोफळे व श्री. शिरीष पटवर्धन सरांनी पालक व मुलांशी संवाद साधला. या शिबिरामुळे बालवाडीची पुढील वर्षाची मुलांची संख्या वाढण्यास मदत झाली.

**बालवाडीचे नवीन वर्ष**

* १३ जून २०२२ रोजी बालवाडी सुरु झाली. फुलांच्या पायघड्या घालून, फुलांचे तोरण लावून, पारंपारिक पद्धतीने औक्षण करून मुलांचे स्वागत करण्यात आले. मुलांचे नियोजनपूर्वक विविध पाठातून शिक्षण तर होतेच पण विविध उपक्रमातून कळत नकळत ती संस्कारितही होत असतात.

**स्वच्छता असे जेथे, आरोग्य वसे तेथे**

स्वच्छता म्हणजे आपले शरीर, मन व परिसर स्वच्छ ठेवणे. वर्गांमध्ये मुलांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते. उदा. : मुलांची नखे, केस, दात, कपडे, हातांची स्वच्छता इत्यादी. गांधी जयंतीच्या निमित्ताने मुलांनी वर्ग, व्हरांडे, जिने स्वच्छ केले. या उपक्रमामुळे मुले घरी आईच्या कामात मदत करू लागली. पालक तशी प्रतिक्रिया देऊ लागले. गौतमीच्या आईने सांगितले, ‘आता ती स्वतःच्या कपड्यांची घडी स्वतः घालते. भाजी निवडण्यास मदत करते. कचरा इकडे तिकडे न टाकता कचऱ्याच्या डब्यातच टाकते.’

मार्च २००६ मध्ये अमेरिका व भारत यांच्यात अणुकरार झाला. अण्वस्त्र प्रसारबंदी करारावर सही नसूनही भारताशी झालेला हा जगातला पहिला आणि अजून तरी एकमेव असा आण्विक सहकार्याचा करार आहे.

## अनुभवातून शिक्षण

अनुभवातून शिक्षण मिळावे हा मुख्य हेतू ठेवून मुलांपर्यंत शालापूर्व शिक्षण पोहोचविले जाते. भाषा, गणित, विज्ञान, जीवन व्यवहार, कला हे विषय मुले हसत खेळत शिकत असतात. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो. मुलांच्या पंचज्ञानेंद्रियांचा विकास होतो. मुक्त व्यवसाय, खेळ खेळल्यामुळे स्नायूंची वाढ योग्य दिशेने होते. विज्ञानासारखा अवघड विषय प्रत्यक्ष प्रयोग दाखवून गमतीजमतीतून मुलांसमोर मांडण्यात येतो. दि. २८ फेब्रुवारीला विज्ञान दिनानिमित्त मुलांनी तरंगणे, बुडणे, ज्वलनास हवेची गरज असते, लोहचुंबकाला चिकटणाऱ्या वस्तू, जलचक्र इत्यादी प्रयोग करून दाखवले. श्री. विश्वास कुलकर्णी सरांनी वर्गाला भेट दिली. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली व प्रयोग करून दाखवले. नवरात्रीनिमित्त परडीमध्ये गहू, ज्वारी, बाजरी मातीमध्ये पेरले. मुलांना रोजच्या निरीक्षणातून धान्य कसे उगवते, कसे वाढते हे समजले.

## जीवेत् शरदः शतम्

प्रत्येक महिन्याच्या २९ तारखेला मुलांचे त्या महिन्यातील वाढदिवस साजरे होतात. कार्यक्रमाला ज्या मुलांचे वाढदिवस आहेत त्यांच्या पालकांना आमंत्रित करून मुलांना औक्षण केले जाते. मुले संकल्प करतात. त्यांना भेटवस्तू दिल्या जातात व पौष्टिक खाऊ दिला जातो. वाढदिवसासाठी काही पालकांनी देणगी स्वरूपात मदत केली तर सौ. रुपाली गायकवाड, सौ. स्वाती खुडे, सौ. पोर्णिमा सोनवणे, सौ. सपना सूर्यवंशी, सौ. शिवकन्या तावरे या पालकांनी खाऊ म्हणून खजूर, मूग, राजगिरा लाडू वेफर्स दिले.

## आपली संस्कृती मुलांपर्यंत...

सणांमुळे भारतीय संस्कृतीचे महत्त्व कळते. सणांमुळे मुलांवर संस्कार घडतात. सणांची माहिती मुलांना मिळते, म्हणून आपण बालवाडीमध्ये सण साजरे करतो. त्यातील काही विशेष सण –

* बालवाडी सुरू झाली आणि लगेच दुसऱ्या दिवशी १४ जूनला वटपौर्णिमेचा सण उत्साहात साजरा झाला. मोठ्या गटातल्या मुलांनी कुंडीत वडाचे रोप लावले. सर्व शिक्षिकांनी त्याची पूजा केली. या झाडाची, झाडापासून मिळणाऱ्या गोष्टींची व होणाऱ्या फायद्यांची माहिती व वटपौर्णिमेची गोष्ट श्रीमती पुष्पाताई नडे यांनी मुलांना सांगितली. शाळेत साजरा होणाऱ्या सणांची माहिती मुले घरी सांगतात. झाड लावताना मुले बोलत होती की 'आम्ही पण घरी गेल्यावर झाड लावणार आणि आम्हाला पण ऑक्सिजन मिळणार.'
* २१ जूनला जागतिक योग दिन साजरा केला. मुलांनी योगासनाचे प्रकार केले. त्यामध्ये वज्रासन, वृक्षासन, त्रिकोणासन, ताडासन, पद्मासन असे योग प्रकार घेतले. मुले रोज वर्गात योगासने करतात.
* आषाढी एकादशीला वर्धिनीमध्ये जणू पंढरपूर अवतरले होते. विठोबा रखुमाई, वारकरी, संत यांच्या वेशभूषेत मुले आली होती. वर्धिनी ते कण्वाश्रम मंदिरापर्यंत निघालेल्या पालखीचे दर्शन घेऊन विठोबा रखुमाईला वंदन करून येणारे–जाणारे जात होते. एक आजीबाई म्हणाल्या की, 'मला पंढरपूरला जायला नाही मिळाले, पण माझा विठोबा मलाच भेटायला आला.' बाल शाखेच्या मुलांनी चौकांमध्ये छान रिंगण केले. मंदिरामध्ये कु. श्रावणी गुळंबेने 'करोना व स्वच्छता' या विषयावर कीर्तन सादर केले. हे कीर्तन सौ. मोनालीताई यंदे यांनी लिहिले होते.
* १३ जुलैला गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. मुलांना गुरु, पर्णकुटी, आश्रम म्हणजे काय हे समजावे म्हणून मुलांना एक दिवस आधी चित्रफीत दाखवली. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या दिवशी ताई गोष्ट सांगत असताना मुलं गोष्टीत सहभाग घेऊन ऐकत होती. फळ्यावर काढलेले गुरुपौर्णिमेचे चित्र पाहून मुले म्हणाली की, 'बाई आपण टीव्हीवर पाहिलेली गोष्ट आहे ना, हे गुरुजी आहेत ना'!
* दीप अमावस्येला दिव्यांचे पूजन करून दिव्यांची गोष्ट सांगण्यात आली. गोष्ट अश्विनीताईंनी स्वतः तयार करून सांगितली. नागपंचमीला मुलांनी ताईंच्या मदतीने मातीचे वारूळ केले व फेर धरून गाणी म्हटली.



भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला 'एकमेवाद्वितीय ओळखपत्र' (युनिक आयडेंटिफिकेशन) द्यायच्या प्रकल्पाला २००६ मध्ये मान्यता मिळाली. श्री. नंदन नीलेकेणी यांची यासाठी अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली.

* नारळी पौर्णिमेला मधल्या व मोठ्या गटातील मुलांनी कोळी नृत्य सादर केले. मुलांनी एकमेकांना राखी बांधली.
* १५ ऑगस्ट झेंडावंदनाला मुले वेगवेगळी वेशभूषा करून आली होती. उदा. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, सिंधुताई सपकाळ, क्रांतीकारक.
* दहीहंडीला मुले छान राधाकृष्ण बनून आली होती. मुलांनी 'नंदकिशोरा...' या गाण्यावर अभिनय नृत्य केले व प्रभात फेरी काढली.
* गणेशोत्सवात मुलांनी गणपती मंडळापुढे जाऊन अथर्वशीर्ष म्हटले.
* नवरात्रीमध्ये श्रीमती पुष्पाताई नडे यांनी कन्या पूजन केले व मुलींना भेटवस्तू दिल्या. दसऱ्याला दाराला फुला पानांचे तोरण लावून, वर्ग सजवून पाटी व शैक्षणिक साहित्याचे पूजन सर्वांनी केले.
* दिवाळी साजरी करताना मुलांनी तयार केलेले आकाश कंदील पूर्ण बालवाडीत लावले. रांगोळ्या काढून, पणत्या लावून दिवाळी साजरी केली. मुलांनी दिवाळीचा फराळही केला.

**सहल**

सर्वांना आवडणारा व हवाहवासा वाटणारा उपक्रम म्हणजे सहल ! दर महिन्यात आपल्या बालवाडी गटानुसार दोन छोट्या सहली काढण्यात येतात व वर्षभरात एक मोठी सहल असते. उदा. वर्धिनी इमारत, भाजी मंडई, पोस्ट ऑफिस, बँक, किराणा दुकान, मच्छी बाजार इत्यादी. वर्धिनी इमारत दाखवताना छोट्या गटातील मुलांनी 'संस्थापकांच्या फोटोकडे हात दाखवून हा फोटो कोणाचा ?' विचारले. त्यावर शिक्षकांनी कै. किशाभाऊ सरांविषयी थोडी माहिती सांगितली. सर्व मुले सरांच्या फोटोला वंदन करून पुढे गेली. अभ्यासिकेत मुलं गेली असता 'आपला दादा अभ्यास करत आहे आणि त्याला त्रास व्हायला नको' असे म्हणत त्यांनी शांतपणे अभ्यासिका पाहिली. 'अबब केवढी ही पुस्तकं ?' मुलं ग्रंथालयात गेल्या गेल्या म्हणाली. मुलांची भाजी मंडईची सहल ही त्यांचा परिचय पाठच झाला. तेथील मच्छी बाजार, भाज्यांचे वेगवेगळे प्रकार, खरेदी विक्री हे सर्व मुलांनी पाहिले. मुलांचे व शाळेचे कौतुक करत एका भाजी विक्रेत्या आजोबांनी मुलांना खाऊ दिला. दिवाळी सुट्टीनंतर पालकांसमवेत मुलांची ऐतिहासिक स्थळ-भेट शनिवार वाडा येथे झाली. ७२ पालक आपल्या मुलांसमवेत तिथे आले होते. 'आम्ही गड्या डोंगरचे राहणार...' हे पद्य मुलांनी खड्या आवाजात म्हटले. 'जय भवानी जय शिवराय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

**पौष्टिक पोषण आहार**

मनात जाण्याचा मार्ग पोटातून जातो, चिमुकल्यांना नेमके काय आवडेल, हे लक्षात घेऊन, मुलांना दर बुधवारी नियोजनपूर्वक पूरक आहार दिला जातो. पूरक आहार करण्यासाठी आपले पालक सौ. पुष्पा कांबळे या जोडल्या गेल्या आहेत. मुलांना प्रार्थनेनंतर रोज मोड आलेले मूग व भिजवलेले शेंगदाणे दिले जातात. यामुळे मुलांची प्रतिकारशक्ती व वजनही वाढते हे लक्षात आले आहे. यामुळे घरी खायला नको म्हणणारी मुले शाळेत श्लोक म्हणत जेवतात. घरीही प्रार्थना म्हणूनच जेवायला बसतात, हा संस्कार घराघरापर्यंत पोहोचतो.

**पालक सभा**

पालकांना संस्थेची ओळख व्हावी व बालवाडीत चालणाऱ्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढावा या हेतूने पालकसभा घेतल्या जातात.
* दि. २९ जून - शाळेचे नियम, वर्षभर होणारे विविध उपक्रम याबद्दल पालकांना सांगण्यात आले. माजी पालक श्री. हनुमंत सकाटे यांनी मनोगतातून शाळेत आलेले अनुभव सांगितले व सर्व शिक्षकांचे, वर्धिनीचे कौतुक केले. मुलांमध्ये होणारे बदल व त्यांच्या विकासाचा आढावा, वर्गातील वर्तन, मुलांची प्रगती यावर पालकांशी संवाद साधण्यात आला. **पालक संख्या - ११२.**

* दि. १६ सप्टेंबर – सौ. मेघाताई नगरे ह्यांनी पालकांचे 'मुलांसमोरील नकारात्मक व सकारात्मक भाव' या विषयावर पालकांशी संवाद साधला. शिक्षकांनी हाच विषय छोट्याशा नाट्य स्वरूपात पालकांसमोर सादर केला. **पालक संख्या– ६०.**

* दि. १० ऑक्टोबर – श्री. विवेक वसंत देशपांडे ह्यांनी 'पर्यावरण आणि मी' याविषयी पालकांशी संवाद साधला. पर्यावरणाचे नुकसान कसे होते, त्याची जपणूक आपण कशी केली पाहिजे, स्वच्छतेची गरज, पाण्याचा वापर, वृक्षारोपण, पर्यावरणाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानानंतर पालकांनी उत्तम प्रतिक्रिया व अभिप्राय लिहून दिले. **पालक संख्या – १२५.**

**पालकांचा अभिप्राय**

नाव – आराध्या आकाश गायकवाड, गट – मधला गट

विषय – शाळेत आल्यापासून झालेली प्रगती

मला सांगण्यास एवढा आनंद होत आहे की माझी कन्या आराध्या हिच्यामध्ये भरपूर सकारात्मक बदल दिसून आला आहे, त्याबद्दल शाळेचे व सर्व शिक्षकांचे मनापासून आभार. तिच्यात झालेले काही बदल माझ्या निदर्शनास आले आहेत ते आपणास सांगू इच्छिते. ती रोज सकाळी लवकर उठते. क्षुल्लक कारणासाठी शाळा बुडवत नाही. शाळेतला डबा रोजच संपवत असते आणि या सवयीमुळे घरी पण स्वतःच्या हाताने जेवते. ताट स्वच्छ करते. शाळेतून आल्यावर शाळेचा गणवेश काढून त्याची घडी करून जागेवर ठेवते. शाळेत शिकवलेले श्लोक आजीला म्हणून दाखवते. रात्री लवकर झोपते.

असे बरेच बदल तिच्यात दिसून आले आहेत. त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार.

**– जयश्री आ. गायकवाड**

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भेटी**

संपर्क हा आपल्या कामाचा आत्मा आहे. दोन वर्षे करोनामुळे बालवाडी बंद होती. त्यामुळे सर्व शिक्षकांनी परिसरातील मंगळवार पेठ वस्ती, पीएमसी कॉलनी, जुना बाजार, सोमवार पेठ अशा आजूबाजूच्या सर्व परिसरात अनेक ठिकाणी बालवाडीत नवीन प्रवेश देण्यासाठी सर्वेक्षण केले. वर्धिनीतील विविध उपक्रम व बालवाडीतील मुलांचे प्रवेश याविषयी पालकांना माहिती दिली. बाई आपल्या घरी आल्या याचे मुलांना फार अप्रूप असते. त्यामुळे पालक व मुलंही खूप आनंदित होतात. मोठ्या गटातील मयूर दवाखान्यात असताना त्याला पाहण्यासाठी शिक्षिका दवाखान्यात गेल्या तेव्हा शिक्षकांना पाहून त्याच्या पालकांना भरून आले. अशा संपर्कातून पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचे दृढ नाते तयार होते.

**शिक्षिकांसाठी स्पोकन इंग्लीश कोर्स**

सप्टेंबर महिन्यापासून 'गर्जे मराठी' ह्यांच्या सहयोगाने शिक्षिकांना इंग्रजी सहज बोलता यावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन वर्ग दर शनिवारी वर्धिनीमध्ये सुरू करण्यात आला. इंग्रजी विषय तसा अवघड, श्री. माधव दाबके सर व अमेरिकेतून सौ. सुनिता ताई यांनी सोप्या पद्धतीने हसत खेळत शिकवण्यास सुरुवात केली. सर्वजणी या प्रशिक्षणास आत्मविश्वासाने प्रतिसाद देऊ लागल्या आहेत.

**बालमेळावा**

विभागाच्या वार्षिक उपक्रमांपैकी एक अतिशय महत्त्वाचा उपक्रम म्हणजे बालमेळावा. यावर्षी दि. २ डिसेंबरला डॉ. नीला धडफळे यांच्या हस्ते बालमेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात आले. पालकांशी बोलताना त्या म्हणाल्या, 'आपल्यात काय कमी आहे हे शोधण्यापेक्षा आपल्यात जे गुण आहेत ते दाखवण्याचा प्रयत्न करा. मोबाईलचा



भारतातलं पहिलं यूआयडी – 'आधार कार्ड' २९ सप्टेंबर २०१० साली नोंदवलं गेलं.
सरकारी योजनांचा सर्वसामान्य लाभार्थ्यांपर्यंत थेट लाभ पोहोचण्याची सुविधा यामुळे झाली.

वापर मुलांना अभ्यासासाठी करायला शिकवा. शारीरिक, मानसिक, बौद्धिक या पाकळ्यांचे फुलणारे फूल तुमच्या हातात आहे त्याला मुक्तपणे फुलू द्या. हे फुलाचे रोप तुम्हाला मोठे करायचे आहे. त्याला लाडाचे पाणी कमी आणि बंधनाचे खत योग्य प्रमाणात घाला.'

जीवन व्यवहार, कला, क्रीडा, कौशल्ये, खेळ, भाषा, विकास व गणित व विज्ञानाची ओळख अशा विषयांवर आधारित उपक्रम, भाजी मंडई, पाकोळी जनरल स्टोअर्स पपेट शो व शैक्षणिक साधनांची मांडणी वेगवेगळ्या वर्गांमध्ये करण्यात आली. परिसरातील शाळा, पालक, विद्यार्थी, हितचिंतक अशा अनेकांनी दिवसभर चाललेल्या या उपक्रमाला भेटी दिल्या. **आबासाहेब अत्रे प्रशालेच्या मुख्याध्यापिका म्हणाल्या, 'या बालमेळाव्यातील सर्व दालने बघून मला असे वाटले की आम्ही आमच्या शाळेत मुलांसाठी उपक्रम राबवण्यात कमी पडतो. तुम्ही खूपच प्रयत्नशील राहून मुलांना शिकायला मदत करीत आहात.'**

बालमेळाव्याला भेट देण्यासाठी आलेल्या बालवाडीपासून पूर्व-प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी वरील सर्व विषयांच्या उपक्रमांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विशेष म्हणजे बालवाडीच्या पालकांनी पूर्वतयारी करून अनेक साधनांची ओळख आलेल्या विद्यार्थ्यांना करून देण्यामध्ये उत्साहाने सहभाग घेतला. त्याचबरोबर बालवाडीच्या माजी शिक्षिकांचीही मदत झाली.

**आत्मियतेचा सुपरिणाम**

ऑगस्ट महिन्यात एका तीन वर्षाच्या मुलाला घेऊन एक ताई माझ्यासमोर उभ्या राहिल्या. चेहऱ्यावर तणाव, डोळ्यात पाणी, मी विचारपूस केली. त्यांना बसून धीर दिला. 'काय झाले ताई ?'. त्यावर त्या म्हणाल्या, 'माझ्या मुलाला कोणत्याच शाळेत प्रवेश मिळत नाही, एका इंग्रजी शाळेत पैसे देऊन प्रवेश घेतला होता. काही दिवसांनी शाळेने भरलेले रु. १५०००/- परत केले. चेक हातात देऊन 'आम्ही या मुलाची जबाबदारी घेऊ शकत नाही' असे म्हणून त्यांनी प्रवेश नाकारला. मला जवळ राहणाऱ्या लोकांकडून वर्धिनीतील पाकोळी बालवाडीची माहिती मिळाली, म्हणून मी मुलाच्या प्रवेशासाठी इथे आले.' येथे आलेली सर्व मुलं बालवाडीत सारखीच असतात, या हेतूने मी त्या मुलाला छोट्या गटात प्रवेश दिला. सुरुवातीला लोकेश फारच कर्कश रडायचा, ओरडायचा, ताईंचे काही ऐकायचा नाही. त्यामुळे शिक्षकांनी त्याच्याकडे विशेष लक्ष दिले. खेळाच्या, गोष्टीच्या माध्यमातून त्याला आपलेसे केले. ताईने सांगितलेला प्रत्येक शब्द तो आता छान लक्षात ठेवतो. त्याचे वर्तनही सुधारले आहे. तो रोज आनंदाने शाळेत येतो. त्याच्या आईचे वाक्य मला वारंवार आठवते, 'मी खूप हताश झाले होते, पण आपल्या बालवाडीमुळे अंधारात आशेचा एक किरण दिसला.'

**– सौ. राणी काळे**

२८ ऑगस्ट २०१४ ला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणतेही पैसे न भरता बँकेत बचत खाते सुरू करण्याची 'जन धन योजने'ची सुरुवात केली.

# स्पर्धा परीक्षा केंद्र

'स्व'-रूपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राबरोबर पुणे शहरात चार ठिकाणी अभ्यासिका सुरू झाल्या आहेत. या अभ्यासिकांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सर्व विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम गेल्या वर्षी झाले. त्यातील काही विशेष –

**✻ शैक्षणिक पालकत्व योजना ✻**

स्पर्धा परीक्षा म्हणजे मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्य या गुणांची कसोटी होय ! अशा अवघड वाटेवर प्रवास करून यशस्वी झालेला अधिकारी नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा प्रवास नक्कीच सुकर करू शकतो. 'पुढच्याच ठेच मागचा शहाणा...' या उक्तीप्रमाणे स्वानुभवातून हे अधिकारी संभाव्य समस्यांचे वेळीच समाधान करू शकतात. केंद्राने फेब्रुवारी २०२२ पासून काही निवडक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक पालकत्व योजना सुरू केली आहे. वर्धिनी परिवारातील यशस्वी प्रशासकीय अधिकारी त्यांना जोडून दिलेल्या उमेदवाराचे/गटाचे शैक्षणिक पालकत्व घेतील. किमान एक वर्ष सर्व परीक्षा होईपर्यंत हे अधिकारी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संवादाद्वारे सतत प्रेरणा देतील.

**✻ Five Points Daily उपक्रम ✻**

MPSC मार्फत दि. २६ फेब्रुवारी रोजी आयोजित संयुक्त गट ब– पूर्व परीक्षेसाठी 'Five Points Daily' हा उपक्रम सुरू करण्यात आला. Telegram या समाज माध्यमाचा प्रभावी वापर करून केंद्राच्या Telegram Channel वर सलग १८ दिवस (दि. ८ फेब्रुवारी ते दि. २५ फेब्रुवारी पर्यंत) दररोज महत्त्वाचे पाच प्रश्न उत्तराच्या पर्यायांसोबत देण्यात आले. या परीक्षेसाठी एकूण ६ विषयाचे प्रत्येकी १५ प्रश्न म्हणजेच सलग तीन दिवस एक विषय घेऊन त्याचे रोज ५ प्रश्न अशा प्रकारे खूप महत्त्वाच्या ९० प्रश्नांची तयारी होण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

**✻ अभिरुप मुलाखत उपक्रम ✻**

राज्यसेवा परीक्षेच्या मुलाखतींचे वेळापत्रक MPSC आयोगाने जाहीर केल्यानंतर प्रत्यक्ष मुलाखतीपूर्वी तयारी म्हणून उमेदवारांना अभिरुप मुलाखत फार गरजेची वाटते. केंद्रातर्फे दि. ९ आणि दि. १० एप्रिलला अभिरुप मुलाखतींचे आयोजन करण्यात आले. वर्धिनी परिवार आणि इतर जिल्ह्यातील ३७ उमेदवारांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. प्रत्येक मुलाखत पॅनेलमध्ये वेगवेगळ्या विभागांमध्ये कार्यरत असलेले (वर्ग अ आणि वर्ग ब चे) १६ अधिकारी उपस्थित होते. प्रत्येक उमेदवाराची मुलाखत घेऊन पॅनेलने वैयक्तिक मार्गदर्शन केले. यामध्ये उमेदवारांच्या जमेच्या बाजू, त्रुटी, कोणत्या गोष्टींवर तयारी केली पाहिजे यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

**✻ तयारी राज्य सेवा पूर्व परीक्षेची ✻**

दि. १८ ऑगस्टला राज्यसेवा पूर्व परीक्षेला असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. मुख्याधिकारी, कवठेमहांकाळ नगरपरिषद, डॉ. संतोष मोरे सर, व श्री. रुपेश जाधव यांनी मुलांना पूर्व परीक्षा

 १८ डिसेंबर २०१४ ला जीएसएलव्ही Mk III तिसऱ्या पिढीच्या क्रायोजेनिक इंजिनाची यशस्वी चाचणी झाली.

संबंधित असलेल्या काही शंकांचे निरसन केले. ताण न घेता आत्मविश्वास बाळगून परीक्षेला सामोरे कसे जावे याचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे श्रीमती नेत्रा कुलकर्णी यांनी परीक्षेचे सराव सत्र घेतले.

**✲ शिष्यवृत्ती बॅच ✲**

चालू २०२२–२३ वर्षासाठी मुलींचे आगरकर हायस्कूल येथे चाचणी परीक्षा झाली. परीक्षेसाठी एकूण १३० विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी ९० मुलांची निवड मुलाखतीकरिता करण्यात आली. केंद्राचे माजी विद्यार्थी जे सध्या प्रशासकीय सेवेत अधिकारी पदांवर आहेत त्यांनी व वर्धिनीच्या सदस्यांनी या मुलाखती घेतल्या. यातून ४० मुलांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आली. यंदा राज्यसेवा मुख्य परिक्षामध्ये बदल झालेले असून, मुख्य परीक्षा आता UPSC प्रमाणे लेखी स्वरूपात असल्याचे नवीन नियोजन आलेले आहे. त्यामुळे बॅचसाठी पहिल्या सप्ताहात मुख्य परीक्षेसाठी मार्गदर्शन वर्ग झाले. वर्गात परीक्षेचे स्वरूप, लेखन तयारी इत्यादी विषयांवर तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने योजली होती.

**✲ तयारी राज्यसेवा मुख्य परीक्षेची ✲**

दि. ११ नोव्हेंबरला सर्व राज्यसेवा मुख्य परीक्षांच्या दृष्टीने विशेष सत्राचे आयोजन केले होते. परीक्षेला समोरे जाताना कोणत्या अडचणी येतात, अभ्यासाचे नियोजन कसे असावे, याचे मार्गदर्शन केंद्राचे माजी विद्यार्थी श्री. विशाल महादेव यादव (कक्ष अधिकारी) व त्यांचे सहकारी मित्र श्री. वैभव मोरादे यांनी केले. कमी वेळेत गुणवाढीसाठी अभ्यासाचे योग्य नियोजन कसे करावे, उत्तरांमधील टाळता येणाऱ्या चुका याबाबत तसेच परीक्षेच्या आधी २ महिने, १ महिना व ३ दिवसांसाठी आपल्या अभ्यासाचे नियोजन कसे हवे याबद्दल स्वतःचे अनुभव सांगितले.

**✲ अधिकारी भेटी ✲**

✲ केंद्राचे अनेक माजी विद्यार्थी शासकीय विविध पदांवर कार्यरत आहेत. काही अधिकारी दरवर्षी वर्धिनीत येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. यावर्षीही श्री. स्वप्निल कांबळे, डॉ. संतोष मोरे, (मुख्याधिकारी, कवठेमहांकाळ नगरपरिषद), श्री. स्वप्नील जाधव (DYSP), श्री. सतिश भारतीय आणि श्री. राजेश शिर्के यांनी सदिच्छा भेट दिली.

**✲ २६ जुलै कारगिल विजय दिन ✲**

यावर्षी कारगिल विजय दिन साजरा करताना ब्रिगेडियर हेमंत महाजन यांच्या व्याख्यानाचे आयोजन झाले. ब्रिगेडियर हेमंत महाजन IMA डेहराडून येथून कमिशन ऑफिसरपदी नियुक्त झाले होते. त्यांनी ७ मराठा लाईफ इन्फंट्रीला 'ऑपरेशन रक्षक'चे कमांडंट म्हणून नेतृत्व केलेले आहे. त्यांनी मुलांना कारगिल विजयात महत्त्वाची भूमिका असणारे अधिकारी व जवानांची भूमिका दृकश्राव्य माध्यमातून (PPT द्वारे) सांगितली. अग्नीपथ योजना व त्याबाबतचे गैरसमज दूर करून मुलांना त्यामध्ये कसे सामील व्हायचे, त्याची तयारी याबद्दल मार्गदर्शन केले.

**✲ श्रमिकांचा बाप्पा ✲**

दरवर्षी अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश उत्सव विधायक रीतीने साजरा होतो. श्रींच्या आरतीचा मान समाजातील कष्टकरी श्रमिक वर्गातील व्यक्तींना दिला जातो. श्री. कमृदिन शेख चाचा, श्री. सुनीलभाऊ भांडले, श्रीमती शोभा कोरले, श्री. कांबळे काका, सौ. चिव्हे मावशी, श्रीमती वाडिया मावशी, श्रीमती मंगल गोरखे मावशी ह्यांच्या हस्ते आरती झाली. श्रींची प्रतिष्ठापना माजी विद्यार्थी श्री. स्वप्नील कांबळे यांच्या मातोश्री सौ. राणी दशरथ कांबळे यांच्या हस्ते झाली. राणी ताई ह्यांचे शिक्षण फक्त तिसऱ्या वर्गापर्यंत झाले आहे. ताईंनी मुलांच्या शिक्षणास कसे प्राधान्य दिले व स्वतःचा संघर्ष उपस्थित मुलांसमोर मांडला. त्या म्हणाल्या, 'आपले दारिद्र्य जर घालवायचे असेल तर मुलांना चांगले शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये

२७ जून २०१६ ला भारत 'मिसाईल टेक्नॉलॉजी कंट्रोल रेजिम (एमटीसीआर)चा सदस्य देश बनला.

पालकांचासुद्धा संघर्ष मोठा असतो. प्रत्येक पालकाची इच्छा असते की आपल्या मुलाने पुढे आयुष्यात चांगली नोकरी किंवा चांगले काही तरी केले पाहिजे हे लक्षात ठेवून तुम्ही यश संपादन करा.'

**❋ नवरात्रोत्सव ❋**

❋ दि. २७ सप्टेंबरला श्रीमती पुष्पाताई नडे यांच्या सामाजिक अनुभवांचे कथन आयोजित करण्यात आले. ताईंनी समाजकार्यात आलेल्या अडचणी, त्यावर केलेली मात आणि मिळालेले यश याबाबत उपस्थितांशी संवाद साधला. ताईंच्या या वाटचालीत विविध टप्प्यांतील घटना आणि त्यातून मिळालेले अनुभव विद्यार्थ्यांना प्रेरणादायी होते.

❋ दि. ३० सप्टेंबरला 'नारी शक्ती सन्मान' शारदीय नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून श्री. निलेश धायरकर सरांनी 'शिक्षणाची गाडी चालली' या गाण्याच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणाबद्दलच्या व्यथा, येणारे अडथळे आणि समस्या यावर चर्चा केली. त्याचबरोबर त्यांनी 'बालविवाह' या विषयावर 'अभिरूप न्यायालय' हा खेळ घेतला. सरांनी पोलीस प्रशासन व अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि पीडित अल्पवयीन मुले-मुली असे चार गट करून सर्वांना आपली मते मांडण्यास सांगितली व न्यायाधीशाच्या भूमिकेतून निकाल घोषित केला.

**❋ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०२ वी विधायक जयंती ❋**

प्रमुख वक्ते – प्राध्यापक श्री. विजय जगन्नाथ रास्ते (समन्वयक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), प्रमुख पाहुणे – श्री. रघुनाथ गौडा (पर्वती दर्शन भागाचे नगरसेवक), विशेष उपस्थिती – श्री. शिरीष पटवर्धन ('स्व'-रूपवर्धिनी उपाध्यक्ष)

'आपण ज्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अभ्यासिकेत शिकतो, त्यांचे चरित्र नक्की वाचायला हवे, त्यातून प्रेरणा घ्यायला हवी. पुस्तकी अभ्यासातून गुण मिळतील. पण खऱ्या अर्थाने जीवन जगायचे असेल तर अण्णा भाऊ साठेंचे चरित्र वाचून जीवनाचे संघर्ष आणि त्यातून प्रेरणा घ्यायला हवी,' असे विचार श्री. पटवर्धन सरांनी मांडले.

'तुम्ही ज्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अभ्यासिकेत अभ्यास करत आहात, शिकत आहात हे तुमचे भाग्य आहे. जर दीड दिवस शाळेत जाऊन अण्णा भाऊ साठे इतके ग्रंथ, कादंबऱ्या लिहित असतील तर तुम्ही त्यांची प्रेरणा घेऊन, तुमच्या ध्येयापर्यंत निश्चित पोहोचू शकता. या अभ्यासिकेचा उपयोग जास्तीत जास्त युवकांनी, तरुणांनी करावा. अण्णा भाऊ साठेंची प्रेरणा घेऊन समर्पित भावनेने देशाची सेवा करणारे अधिकारी घडावेत' हे विचार मा. नगरसेवक रघुनाथ गौडा यांनी मांडले.

अण्णा भाऊ साठेंचे चरित्र, त्यांनी त्यावेळी केलेला संघर्ष अण्णा भाऊ साठेंच्या 'फकीरा' पुस्तकातील प्रेरणादायी प्रसंगांचे दाखले देत जीवन कसे जगावे, अन्यायाला, संघर्षाला तोंड कसे द्यावे, याबद्दलचे विचार प्रा. विजय रास्ते सरांनी मांडले.

**❋ अभ्यास दौरा ❋**

दि. २९ नोव्हेंबरला केंद्रातील व अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी कामथडी, ता. भोर व महाबळेश्वर येथील प्रकल्पास भेट दिली. प्रथम कामथडी, ता. भोर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जाऊन 'स्वानंदी शिक्षण' पद्धत अभ्यासली. या शाळेत मुलांची मानसिकता, मुलांचा सर्वांशी संवाद कसा होईल, त्यांची अभ्यासातील रुची व शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढेल यांचा विचार करून विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमांची माहिती तेथील गट शिक्षणाधिकारी सौ. अश्विनी सोनवणे यांनी दिली. त्यानंतर महाबळेश्वरमधील 'सनराईज कँडल्स' अंध उद्योजक श्री. भावेश भाटिया यांच्या प्रकल्पाला भेट दिली. यातून ३००० अंध व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यांच्या पत्नी सौ. नीता भाटिया यांनी उद्योगाचा आजपर्यंतचा प्रवास व आलेले अनुभव सांगितले.

❖ ❖ ❖



५ जून २०१७ ला 'जीसॅट १९' हा सर्वात ताकदवान दळणवळण उपग्रह, जीएसएलव्ही III रॉकेटवर अवकाशात रवाना करून भूस्थिर कक्षेत प्रस्थापित करण्यात आला.

**समोर आडवी तुला प्रलयलाट येऊ दे । पहाडही मधेच वा ध्येयवाट अडवू दे ।**
**वादळापरी सदा घे पुढेच धाव तू । जाण यत्न देव तू ।**

मी स्वप्निल दशरथ कांबळे, शिष्यवृत्ती २०१९ च्या बॅचचा विद्यार्थी. माझी २०२० च्या परीक्षेत CRPF मध्ये सब इन्स्पेक्टर या पदी निवड झाली. याआधी मी भारतीय रेल्वेमध्ये इंजिनिअरिंग विभागात ट्रॅक मेंटेनर पदावर कार्यरत होतो. माझ्या घरातील परिस्थिती बिकट होती. माझे बाबा जुन्या चपला दुरुस्त करत. आम्ही दोघे भाऊ मी आणि माझा लहान भाऊ आईसोबत घरात प्लॅस्टिक पिशव्या छापायचो. नंतर पेपर, दूध टाकणे, २५ रुपये तास याप्रमाणे काम करायचो. पुढे जायचे असेल तर प्रत्येक संकटांवर मात तर करायलाच पाहिजे. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना वर्धिनीची फार मदत झाली. माझा मित्र हरिश्चंद्र मिसाळ आणि कुलदीप भोलाने यांकडून मला याची माहिती मिळाली. इथल्या मार्गदर्शनाचा खूप फायदा झाला.

मी स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणाऱ्या या केंद्रातील माझ्या सर्व मित्रांना आग्रहपूर्वक सांगेन की, 'परीक्षेची तयारी करताना एक एक पाऊल चढतच शिखर सर केले जाते. त्यामुळे प्रत्येक संधीचं सोनं करा आणि पुढील लक्ष्य निर्धारित करून तयारी चालू ठेवा. कोणत्याही कामाची लाज वाटू देऊ नका. आशावादी रहा. यश मिळाल्यावर आपले पूर्वीचे दिवस विसरू नका.'

**– स्वप्निल कांबळे**

(Sub - Inspector, CRPF )

## अभिनंदन
## अधिकारी वर्ग २०२१ - २०२२

१. UPSC, Asst. Commander - ऋषिकेश बोराडे
२. कक्ष अधिकारी – विशाल यादव, नम्रता मुंदडा, शेखर भिलारे
३. नायब तहसीलदार – शशिकांत बाबर, सोनाली पाटील, सनिता धिमटे, गोकुळ भराडिया, ज्योती कांबळे
४. उपशिक्षण अधिकारी – शर्मिला शेंडे, दर्शन मेहता
५. पोलिस उपनिरीक्षक – किरण उक्रंडे, सोनाली घोंगे
६. म्हाडा लिपीक – शुभम गाडेकर, संकेत पाटील
७. उपअधीक्षक भूमिअभिलेख – यमाजी धुमाळ
८. सहाय्यक निबंधक – विलास नारवटे
९. सहाय्यक प्रकल्प आणि संशोधन अधिकारी – चेतन खंदारे
१०. Sub-Inspector, CRPF – स्वप्निल कांबळे

**सर्व यशस्वी विद्यार्थी अधिकाऱ्यांचे**
**वर्धिनी परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन.**

# पहाट प्रकल्प

पहाट प्रकल्प गेली चार वर्षे खडकवासला व पानशेत खोऱ्यांमधील कातकरी बांधवांसाठी काम करत आहे. दर रविवारी कार्यकर्ते पुण्यातून भोडे आणि लव्हार्डे या वस्त्यांवर जाऊन खेळ आणि विविध उपक्रम घेतात. वस्तीमध्ये संपर्क, कातकरी बांधवांसोबत भोजन, विविध नियोजित उपक्रम आणि आढावा बैठक अशा दिवसभराच्या भेटीतून खूप काही नवीन शिकून, प्रत्येक वेळेस नवीन अनुभव घेऊन परततात. दर रविवारी वस्तीवर मुले ताई दादांची वाट बघत बसलेली असतात आणि जेव्हा गाडी वस्तीवर पोहोचते तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखाच असतो.

* पूर्वनियोजित दिनक्रम ठरलेला असतो. त्यामध्ये खेळ, व्यायाम, अभ्यासपूरक उपक्रम, कला व कौशल्यावर आधारित उपक्रम आणि वस्तीसोबत अनौपचारिक संपर्क अशा विविध आयामांवर काम केले जाते.
* खेळांमध्ये झाडावर चढण्यापासून लंगडी पाणी, फूटबॉल, कबड्डी, बॉल पास, टेलिमॅचेस असे अनेक प्रकार घेतले जातात. सीपीएड कीटचा वापर करून विविध स्पर्धा घेण्यात येतात.
* मुलांना एका ठिकाणी बसण्याची सवय नसल्याने त्यांच्यासोबत धरणावर जाणे, तिथे जाऊन मासे पकडणे, पाण्यात पोहणे अशा अनेक गोष्टीत मुलांसोबत मूल होण्याचा आनंद कार्यकर्त्यांना मिळतो.
* याशिवाय वेगवेगळे सणही आम्ही एकत्र साजरे करतो. दिवाळीमध्ये पणत्या रंगविणे, मेंदी काढणे, किल्ले बनवणे तसेच गणेशोत्सवात रंगभरण स्पर्धा, कागदापासून फुले तयार करणे, रक्षाबंधनानिमित्त राख्या बनवणे असे अनेक सण आनंद द्विगुणीत करतात.

**नवरात्र –** यातील विशेष आठवण म्हणजे यावर्षी नवरात्रीमध्ये श्री. मंदार परळीकर यांनी वस्तीला सहकुटुंब भेट देऊन भोडे वस्तीतील देवीसमोर गोंधळाचा कार्यक्रम सादर केला. यावेळी वस्तीतील ज्येष्ठांपासून लहान मुलांपर्यंत सर्वजण देवीच्या गाण्यांमध्ये तल्लीन झाले.

**सहल –** निलकंठेश्वर येथे झालेल्या सहलीत मुलांनी अतिशय आनंदाने सहभाग घेतला.

**वर्धिनी भेट –** आजवर मुलांनी वर्धिनीबद्दल नुसतं ऐकलं होतं. वर्धिनीची प्रत्यक्ष भेट त्यांना संस्थेच्या अजून जवळ घेऊन आली. दि. ९ व १० ऑक्टोबरला वर्धिनी वास्तू भेट, मल्लखांब प्रात्यक्षिके, पुष्पाताईंची गोष्ट, किरण ननावरे दादाने सांगितलेली शिवकथा, संभाजी उद्यान भेट, मा. रामभाऊ सरांशी संवाद असा भरगच्च कार्यक्रम आखण्यात आला. त्या दिवशी कोजागिरी असल्याने आकाश दर्शन उपक्रम घेऊन सर्वांनी दुधाचा आस्वाद घेतला.

यावर्षी अनेक जणांनी प्रकल्पाला भेटी दिल्या. यामध्ये मा. भन्ते तीसवरो, मा. रामभाऊ डिंबळे, श्री. प्रसाद गाडे, श्री. विक्रांत दिघे, श्री. संदीप मोरे, समता प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, सौ. शिवानी वाणी अशा अनेकांचा समावेश होता.

**विशेष –** कोंढूरमधील अमृतेश्वर महाविद्यालयात वर्धिनीचा युवक कार्यकर्ता हनुमान मेकडे यांनी युवा साथी प्रकल्प राबवला. दर ३ महिन्यांनी प्रकल्पातील कार्यकर्त्यांची आढावा व नियोजन बैठक होऊन आवश्यकतेनुसार प्रशिक्षण रचना करून वस्तीवर काम करण्याची प्रेरणा टिकून राहावी यासाठी प्रयत्न केले जातात.



पुण्यातील सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या जगातील सर्वात मोठी लस उत्पादन करणाऱ्या कंपनीने 'कोविशिल्ड' ही कोरोनावरील लस खूप कमी दिवसात तयार करून या रोगावर नियंत्रण मिळवण्यास मदत केली.




'वाचनाने जीवन समृद्ध होते' ही उक्ती सार्थ आहे. वर्धिनीच्या ग्रंथालयात ७,३८१ पुस्तके आहेत. यांचा लाभ वर्धिनीतील कार्यकर्ते, वर्धक-वर्धिका घेत असतात.

**ज्ञानाची गंगा आपल्या दारी –** लॉकडाऊनमध्ये अनेक पुस्तके PDF स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध करून दिली. याशिवाय काही महत्त्वाच्या व्यक्तींचे जीवनचरित्र रेकॉर्ड करून ते सर्वांपर्यंत पोहोचवले. त्यामध्ये 'वीर सावरकर' या पुस्तकासंदर्भात निलेश धायरकर यांनी, 'एक होता कार्व्हर' यासाठी बागेश्री पोंक्षे यांनी, 'गोष्ट अरुणिमाची' यावर आधारित सौ. दीपाली थोरात यांनी तर 'छोट्यांचे विवेकानंद' यावर सौ. शिल्पा पोफळे यांनी 'पुस्तक परिचय' रेकॉर्ड करून सर्वांपर्यंत पोहोचवला.

**चला पुस्तके चाळूयात –** दि. १८ जानेवारीपासून प्रत्येक मंगळवारी हा उपक्रम दुपारी १२ ते २.३० या वेळेत वर्धिनीच्या ओंकार सभागृहात सुरू केला आहे. काही जुनी व नवीन निवडक पुस्तकांची मांडणी करून वाचनाची आवड वाढवावी या हेतूने हा उपक्रम चालू आहे. विशेष म्हणजे दररोज चालणाऱ्या साक्षरता वर्गातील महिला पण ही पुस्तके चाळताना, बघताना दिसतात.

**वाचनकट्टा –** विद्यार्थ्यांना आणि कार्यकर्त्यांना वाचनाची सवय लागावी आणि सतत नवीन विचार व प्रेरणा मिळावी यासाठी दर आठवड्यात विभागातर्फे शाखा आणि अभ्यासिकांमध्ये वाचन कट्टा उपक्रम घेतला जातो.

**'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल**



@SakalMediaNews www.esakal.com | सकाळ | पुणे, गुरुवार, ८ सप्टेंबर २०२२ | ३

'स्व'-रूपवर्धिनी : गणित, विज्ञान, इंग्रजीबरोबरच मूल्यशिक्षणाचे धडे

## वंचितांच्या शिक्षणाचा चार दशकांचा सेवायज्ञ

सकारात्मका

सम्राट कदम : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ७ : हातावर पोट भरणाऱ्यांच्या घरात शिक्षण ही आवाक्याबाहेरची गोष्ट होत चालली आहे. जिथे खाण्याचीच परवड होते, तिथे अधिकच्या शिकवण्या आणि जीवन कौशल्य धडे घेणार कोठून? पर्यायाने क्षमता असतानाही ही मुले मुख्य प्रवाहातून बाहेर पडतात. अशाच मुलांसाठी 'स्व'-रूपवर्धिनीने 'एकात्मिक बाल विकास केंद्र' व 'उत्थान' नावाने अभ्यासिका प्रकल्प उभारला असून, ज्याद्वारे हजारो विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण मिळवत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

झोपडपट्टी किंवा वंचित घटकातील विद्यार्थ्यांच्या पुनरुत्थानासाठी १९७९ मध्ये किशाभाऊ पटवर्धन यांनीस्व-रूपवर्धिनीची स्थापना केली. 'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे' या ब्रिदवाक्याप्रमाणे संस्था नवनवीन उपक्रम राबवत आहे. संस्थेचे पूर्णवेळ कार्यकर्ते नीलेश धायरकर सांगतात, 'उपेक्षीत आणि वंचित वस्तीतील विद्यार्थ्यांसाठी कार्य करणारे हे स्वयंसेवक खऱ्या अर्थाने शिक्षणमित्रच आहे. वर्गखोल्यांतील गणित, इंग्रजी, शास्त्र या विषयांबरोबरच विद्यार्थ्यांचे अभ्यासपूरक कौशल्येही या उपक्रमातून विकसित होतात. वर्धिनीचे २०० हून अधिक विद्यार्थी वर्ग एक आणि वर्ग दोन पदांवर शासकीय सेवेत कार्यरत आहेत.' उपक्रमात ५५ वस्त्या सहभागी झाल्या असून, पेठांचा पूर्व भाग, बिबवेवाडी, इंदिरानगर, तळजाई, पद्मावती, आंबेगाव पठार, गोखलेनगर, कर्वेनगर, सिंहगड रस्ता आदींचा समावेश आहे.

'स्व'-रूपवर्धिनीच्या केंद्रात विद्यार्थ्यांची तासिका घेताना स्वयंसेवक.

'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या माहितीसाठी क्यूआर कोड स्कॅन करा

'स्व'-रूपवर्धिनीची रचना : विभाग - १ : शाखा विभाग

- शाळा सुटल्यानंतर तीन तासांचा अनौपचारिक शिक्षणाचा कार्यक्रम
- पहिला एक तास शारीरिक विकासाचा, व्यायाम -योगा-खेळ-आहार याचे शिक्षण
- पुढील अर्धा तास सामूहिक प्रार्थना, मूल्यशिक्षण, नेतृत्व घडणीचे कार्यक्रम आणि त्यानंतर दीड तास गणित, विज्ञान, इंग्रजीचे धडे, अभ्यासपूरक कौशल्यांचा अभ्यास
- प्रेरणा जागरण व मूल्यशिक्षणाच्या तासिकेत क्षमतांचा विकास, सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता, नम्रता हे विषय घेतले जातात.
- महापालिकेच्या वर्गखोल्यांमध्ये वर्षभर रोज सातत्याने गणित, विज्ञान आणि इंग्रजीच्या मोफत तासिका घेतल्या जातात
- पाचवी ते १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित युवक-युवती विना मोबदला शिकवितात

विभाग २ : उत्थान विभाग

- दीड तासाची अभ्यासिका
- शिक्षणमित्र म्हणून ओळखले जाणारे हे उच्चशिक्षित तरुण शालेय विद्यार्थ्यांना शिकवितात
- अनौपचारिक शिक्षणाबरोबर बुद्धिमत्ता विकास, परीक्षा तयारी, औपचारिक अभ्यासक्रम यांद्वारे घेतले जातात
- वकिली, सैन्य, प्रशासन आणि व्यावसायिक शिक्षण देण्यास प्राधान्य

किशोरवयात शिक्षण आणि संस्कार रुजविण्याचे कार्य हे युवक युवती शिक्षणमित्र म्हणून करत आहेत. चांगल्या सहवासातून या विद्यार्थ्यांच्या प्रेरणा जागरण करत वस्तीमधील मुलांचे नेतृत्व जडणघडण सुरू आहे.
- शुभम जगताप, एकात्मिक बालविकास प्रकल्पप्रमुख

'स्व'-रूपवर्धिनीत होणाऱ्या खेळ, अभ्यास आणि विविध उपक्रमांवर आधारित अनौपचारिक शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थी तर घडतातच, त्यासोबतच समाजातील विविध प्रश्नांना भिडणारे कार्यकर्तेही तयार होत आहेत.
- चेतन कुसाळकर, युवा विभागप्रमुख

मुलींच्या शैक्षणिक संकल्पना स्पष्ट होण्यावर शाखेत भर दिला जातो. स्वतः वस्तीत राहणारे व सामाजिक, आर्थिक समस्या अनुभवणारे युवती स्वयंप्रेरणेने हे शिक्षणाचे कार्य करतात हे विशेष.
- दिव्या घारे, शालेय विद्यार्थिनीप्रमुख



पुढारी

## गणेशोत्सवात पथनाट्यातून जनजागर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

'ऐका हो ऐका...' असा आवाज गणेशोत्सवाच्या गर्दीत कानी पडत आहे... कारण काही कलाकार गर्दीत पथनाट्य सादर करून सामाजिक विषयांवर जनजागृती करत आहेत. कोणी 'वाहतूक नियमांचे पालन करा' हे पथनाट्यातून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत तर कोणी स्वच्छतेवर पथनाट्यातून दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कलाकारांच्या या प्रयत्नाला लोकांचीही दाद मिळत असून, पथनाट्य पाहण्यासाठी कलाकारांच्या अवती-भवती मोठी गर्दी होत आहे. दोन वर्षानंतर उत्सवात विविध कलापथके आणि संस्थांकडून ठिकठिकाणी पथनाट्ये सादर केली जात आहेत. त्यात शालेय विद्यार्थ्यांपासून ते तरुण, ज्येष्ठ कलाकारांचा समावेश आहे. सर्व जण उत्कृष्टपणे पथनाट्य सादर करीत आहेत. त्यातून सामाजिक विषय लोकांसमोर मांडण्याचा अन् त्यातून जनजागर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गणेश मंडळे, सोसायट्यांमधील गणपती, शाळा-महाविद्यालये येथेही पथनाट्ये सादर होत आहेत. तरुण कलाकार आणि ज्येष्ठ कलाकारांचे यातून अर्थार्जनही होत असून, मोठ्या मेहनतीने, उत्कृष्ट सादरीकरणाने प्रत्येक जण पथनाट्यातून सामाजिक जागृती करत

स्व-रुपवर्धिनीच्या वतीने 'नदी संपावर गेली...' हे पथनाट्य सादर करताना संस्थेतील मुले-मुली.

लस उत्पादनात भारताचा जगात प्रथम क्रमांक आहे. जगाच्या ६०% लसींची गरज एकटा भारत देश भागवतो.

# निधी संकलन

‘तन समर्पित, मन समर्पित, और यह जीवन समर्पित’ असे म्हणत समर्पित वृत्तीने काम करणारे अनेक कार्यकर्ते हीच वर्धिनीची खरी संपत्ती. तरीही अशा कार्यकर्त्यांच्या कल्पनांना सत्यात उतरवण्यासाठी आर्थिक पाठबळ तितकेच आवश्यक आहे. कोविड काळात स्मशानातल्या कामापासून ते ऑक्सिजन प्लँट आणि टँकरपर्यंत जे जे शक्य होते ते काम आपल्या युवांनी जिवाची बाजी लावून केले. पण त्या काळात झालेले मुलांचे शैक्षणिक व भावनिक नुकसान भरून काढण्यासाठी आता प्रयत्नांची शर्थ करावी लागत आहे. शैक्षणिक शिष्यवृत्तीची गरज असलेल्यांची संख्याही वाढली आहे. संस्कृत सुभाषितात म्हटल्याप्रमाणे –

अन्नदानं परं दानं विद्यादानं अतः परम् । अन्नेन क्षणिका तृप्तिः यावज्जीवं च विद्यया ।।

चांगल्या कामाला कधीही पैसे कमी पडत नाहीत. या किशाभाऊंच्या बोलण्याचा प्रत्यय आजपर्यंत येत आहे. तो केवळ समाजातील कृतीशील सज्जन शक्तीमुळेच. जागतिकीकरणाच्या रेट्यात आणि वेगाने बदलणाऱ्या जगात सामाजिक कामाचे संदर्भसुद्धा बदलत आहेत. वर्धिनीचा विस्तारही मोठ्या प्रमाणात होत आहे. मुख्य इमारतीत चालणारे सर्व प्रकल्प, चऱ्होली येथे नुकतेच सुरू झालेले काम, गुजरवाडी व कातवडी येथील प्रस्तावित प्रकल्प असे सारेच काम नजिकच्या भविष्यात वाढत राहणार आहे. कोविडच्या काळातही चऱ्होली येथील संस्थेची भव्य वास्तू उभी राहिली हे आपल्या सर्वांचेच सामुहिक यश आहे. आपल्या रोजच्या जगण्यात तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे आणि त्याचे पडसाद सामाजिक जीवनावरही उमटत आहेत. वर्धिनीतही आपण तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याचा प्रयत्न करत आहोत. या सगळ्यासाठी वर्धिनीला आवश्यकता आहे ती Talent, Time and Treasure या तीन T च्या योगदानाची. आज आपण जी मदत कराल ती खरं तर राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी केलेली गुंतवणूकच ठरेल, असा विश्वास आहे.









टेलिकॉम क्षेत्रातला विस्तार बळकट करण्यासाठी सप्टेंबर २०२१ मध्ये नवे टेलिकॉम धोरण जाहीर झाले. अंतिम ग्राहकाचं हित राखलं जाणं ही या धोरणाची दिशा आहे.

एकूण खर्चातील ८८% खर्च हा उद्दिष्टांवर करण्यात आला हे अभिमानाने सांगायला हवे. तसेच गतवर्षीच्या एकूण देणग्यांपैकी ७.५२ कोटी हे चऱ्होली व कोविड संदर्भातील कामासाठी आले होते. केवळ १.५२ कोटी इतर सर्व प्रकल्पांसाठी मिळाले. त्यामुळे आजही चालू प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता आहेच.

सेवाभावी वृत्तीने काम करणारे व संपत्तीची पूर्णपणे किंमत ठाऊक असणारे कार्यकर्ते, मिळालेली पै अन् पै विचारपूर्वक व काटकसरीनेच वापरतात हे वर्धिनीच्या संस्कारांचे फार मोठे यश आहे. विन्स्टन चर्चिल यांचे एक वाक्य आहे - 'We make a living by what we get but we make life by what we give' चला जगण्याला सार्थकता देऊ या.

**✻ काही बोलके अनुभव ✻**

१) आपले एक हितचिंतक त्यांना त्यांच्या वडिलोपर्जित असणाऱ्या मिळकतीतून काही रक्कम मिळाली त्यांनी सर्वप्रथम संस्थेचा विचार केला आणि एक लक्ष रुपये देणगी वर्धिनीला दिली.

२) माननीय डॉ. निर्मला सरपोतदार यांनी गरीब आणि आदिवासी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उषःकाल प्रतिष्ठानच्या माध्यमातून सतरा लाख रुपयांची देणगी दिली.

३) यु. के. मध्ये स्थित असलेले डॉक्टर सचिन साळवी त्यांच्या वडिलांबरोबर संस्थेत आले. स्वयं प्रेरणेने काही दिवसांनी त्यांनी वर्धिनीच्या नर्सिंग विभागाच्या मुलींना विशेष करून नर्सिंग या विषयातील संधी, वैद्यकीय क्षेत्रातील काही महत्त्वाच्या क्षेत्राविषयी बहुमूल्य मार्गदर्शन केले.

**✻ विविध क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तींची वर्धिनी भेट आणि कार्यकर्त्यांशी संवाद ✻**

✻ दि. १५ सप्टेंबरला डॉ. वर्षा पोतदार (MSc. Ph.d.) यांनी लसीकरण, संशोधन आणि आरोग्य या विषयावर वर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. शारदा शक्ती सन्मान, इंडिया टुडे कडून विशेष सन्मान आणि महाराष्ट्र कोविड योद्धा सन्मान अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी येथे संशोधक म्हणून एका विभागाच्या प्रमुख म्हणून त्या कार्यरत आहेत.

✻ राष्ट्रीय सेविका समितीच्या प्रा. मैत्रेयी शिरोळकर यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील संत, कवी, साहित्यिक आणि पत्रकार यांचे योगदान हा विषय मांडला.

✻ सह्याद्री ज्युदोच्या सौ. रचना धोपेश्वर यांनी ज्युदो खेळ, फिटनेस आणि अंध मुलींना ज्युदोचे धडे देताना येणारे अनुभव मांडले तर एका हाताने दिव्यांग असलेली बॅडमिंटन खेळाडू आरती पाटील हिने तिचा एका खेड्यापासून पॅरा-ऑलिम्पिक प्रवेशासाठी चालू असलेला प्रेरणादायी प्रवास मांडला.

✻ विशाखा चांदेरे यांनी सौर ऊर्जा तर प्रियदर्शन सहस्त्रबुद्धे यांनी बायोगॅस या ऊर्जा स्त्रोताविषयी प्रात्यक्षिकातून यांची पुढील काळातील गरज यावर चर्चा केली.

✻ श्री. श्रीकांत भानू, श्री. एस. सी. देशमुख डेमाचे अध्यक्ष तर डॉ. विश्वास उडपीकर संशोधक आणि उद्योजक आहेत. अशा तीन मित्रांनी संरक्षण क्षेत्रातील संदेश वहन आणि भारताची सद्य:स्थिती यावर मार्गदर्शन केले.

✻ स्मिता घुगे यांनी अनेक संकटांवर मात करत गिर्यारोहकापर्यंतचा प्रवास आणि तिने सर केलेल्या काही मोहिमांचे सचित्र सादरीकरण केले. यातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

✻ श्री. प्रतिक खरे हा तरुण उत्तम सतार वादक आहे, त्याचबरोबर 'स्वमग्न'सारख्या आजार असलेल्या अनेक रुग्णासाठी म्युझिक थेरपी उपचार म्हणून देतो. त्याच्या अनोख्या कामाची माहिती कार्यकर्त्यांना मिळाली.

# क्षण अभिमानाचे

⁕ **व्यक्ती व्यक्ती में जगाए राष्ट्रचेतना – डॉ. प्रमोद चौधरी** 'स्व'–रूपवर्धिनीचे हितचिंतक, मार्गदर्शक आणि गेली अनेक वर्षे कार्यकारिणीचे सन्माननीय सभासद आहेत. प्राज इंडस्ट्रीजचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. जैवतंत्रज्ञानाचा औद्योगिकदृष्ट्या वापर ही संकल्पना मा. प्रमोदजींच्या मार्गदर्शनाने पुढे आली. त्यांच्या या कामाला भारतात अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

सन २०२० मध्ये मा. प्रमोदजींना जागतिक स्तरावरील Biotechnology Innovation Organisation (BIO) चा औद्योगिक जैवतंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधनाबद्दल **'जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर' पुरस्कार** मिळाला होता. वर्ष २०२२ चा जैव अर्थशास्त्रातील प्रतिष्ठित **'विल्यम सी. होल्मबर्ग जीवनगौरव' पुरस्कार**ही त्यांना जाहीर झाला आहे. हा जागतिक सन्मान मिळवणारे ते पहिले आशियाई व्यक्ती आहेत.

⁕ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त वर्धिनीच्या सहकार्यवाह, महिला विभाग पालक **श्रीमती पुष्पाताई नडे** यांना **'कृतज्ञता' पुरस्काराने** सन्मानित करण्यात आले.

⁕ रमणबाग प्रशालेत ऋषिपंचमीनिमित्त समाजातील ऋषितुल्य व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये वर्धिनीचे उपाध्यक्ष **श्री. शिरीष पटवर्धन** यांचा सामाजिक कामाच्या योगदानासाठी सत्कार करण्यात आला.

⁕ वर्धिनीचे सहकार्याध्यक्ष **डॉ. संजय तांबट** यांचा गोव्याचे मुख्यमंत्री मा. श्री. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सत्कार झाला. Orientation Program for Journalism या कार्यक्रमात सरांनी 'Changing Media Environment... Challenges & Opportunities in Contemporary Journalism' या विषयावर मार्गदर्शन केले.

⁕ पालघर जिल्यातील भालिवली गावात 'सेवा विवेकचे' बांबू केंद्र आहे. तेथे तयार होणाऱ्या वस्तूंची **स्वप्न उद्योग** मार्फत विक्री केली जाते. तसेच लवकरच या वस्तूंची देशाबाहेर निर्यातही सुरू होणार आहे. या कार्यासाठी सेवा विवेक या संस्थेतर्फे 'स्व'–रूपवर्धिनीचे कार्यकर्ते व सध्या सहकोषाध्यक्ष ही जबाबदारी निभावणारे, स्वप्न उद्योगचे संचालक **श्री. सुमीत श्रीकांत डोळे** यांचा महाराष्ट्राचे राज्यपाल मा. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

⁕ 'स्व'–रूपवर्धिनीच्या सामाजिक व शैक्षणिक कामात गेली २० वर्षे सक्रिय काम करणाऱ्या **समुपदेशक सौ. मेघा नगरे** यांचा सत्कार रोटरी क्लब तर्फे करण्यात आला. याशिवाय समुपदेशन क्षेत्रात गेली १० वर्षाहून अधिक काळ कार्यरत असल्याने सौ. मेघा नगरे यांचा सत्कार 'दादाची शाळा' या संस्थेतर्फेही करण्यात आला.

⁕ **केतन नव्हे सहाय्यक प्राध्यापक केतन क्यादर –** गंज पेठेतील स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवक कार्यकर्ता केतन क्यादर महाराष्ट्र राज्य प्रात्रता परीक्षा (MH-SET) गणित विषयात उत्तीर्ण झाला. सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग येथे Assistant Professor of Mathematics म्हणून काम करत आहे. शिक्षण पूर्ण करताना केतन दोन वर्षे शाखा प्रमुख व दोन वर्षे केंद्रीय तासिका व्यवस्थेत सक्रिय होता.

⁕ वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते **श्री. पराग लकडे** यांची Architects, Engineers & Surveyors Association (AESA)



भारतातलं पहिलं 'आधारकार्ड' २९ सप्टेंबर २०१० मध्ये नोंदवलं गेलं.
सरकारी योजनांचा सर्वसामान्यांपर्यंत थेट लाभ पोहोचण्याची व्यवस्था यामुळे झाली.

या संस्थेचे प्रेसिडेंट म्हणून निवड झाली.

✻ पर्वती दर्शन येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अभ्यासिकेतील विद्यार्थी **श्री. अक्षय मजगुडे** (SRPF), **श्री. शशिकांत होटकर, श्रीमती छाया मौर्य** यांची मुंबई शहर पोलीस खात्यात निवड झाली.

✻ केंद्राचे माजी विद्यार्थी **श्री. राहुल बैरागी,** जिल्हा प्रकल्प प्रमुख, पालघर, 'सेट परीक्षेत' उत्तीर्ण झाले.

✻ कोविड काळात केलेल्या कामाबद्दल महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री. राजेश टोपे यांच्या हस्ते केंद्राचे माजी विद्यार्थी, विशेष कार्यकारी अधिकारी **श्री. कैलास अंडिल** यांना गौरवण्यात आले.

✻ भारतीय स्त्री शक्ती जागरण तर्फे आयोजित राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत वर्धिनीच्या युवा गटाच्या 'Breaking Gender Stereo types' या विषयाला अनुसरून वैकुंठ स्मशानभूमीत महिलांनी केलेल्या कामावर आधारित **'प्रवाह'** लघुपटाला दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक अभिनेत्री, दिग्दर्शिका मृणाल कुलकर्णी यांच्याद्वारे घोषित करण्यात आले. तसेच याच स्पर्धेत उत्तम संकलनाचे (Best Editor) पारितोषिक सौमित्र गुंडला याला मिळाले. हृषिकेश कायत, शेखर चव्हाण, ऋतुजा नराल, संदीप मोरे, सौमित्र गुंडला या युवकांचा या लघुपटात सहभाग होता.

✻ मैदानातील यश... कबड्डीत विजय... – बदामी हौद संघ, पुणे, आयोजित ४५ किलो वजनी गट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भैरवनाथ संघ भिवरी यांच्याशी लढत देऊन 'स्व'–रूपवर्धिनी संघाने १८ गुण मिळवून दणदणीत विजय मिळवला.

✻ पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन आयोजित आकांक्षा कला क्रीडा केंद्र, पुणे ४५ किलो वजनी गट स्पर्धेत 'स्व'–रूपवर्धिनी कबड्डी संघ द्वितीय क्रमांकाने विजयी झाला.

✻ स्वामी दयानंद सरस्वती शाखेतील युवक **कु. विनायक म्हस्के** यांचे इंजिनिअरिंग मधील पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यावर M.Tech in Aerospace मध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी Government of India, Department of Space Indian Institute of Space Science and Technology (Thiruvananthapuram, Kerala) या ठिकाणी निवड झाली.

✻ कमवायचे किती आणि कशासाठी, नोकरी, व्यवसाय सांभाळून उरलेला वेळ कोणासाठी द्यायचा, आपले गुण, आपली कौशल्ये कुठे वापरायची या सर्वांचे वर्धिनीच्या उद्दिष्टाला समर्पित कृतीयुक्त उत्तर म्हणजे **श्री. संदीप मोरे.** 'पुणे मिरर'या वृत्तपत्राने वर्धिनीच्या या कार्यकर्त्याने 'समता प्रतिष्ठान' नावाने वस्ती भागात सुरू केलेल्या सेवा कार्याची दखल घेतली.

✻ वर्धिनीची जेष्ठ युवती **सौ. संगीता यादव** यांची खडक पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी निवड झाली.

✻ 'सोशल संडे' या यु–ट्यूब वाहिनीसाठी वर्धिनीच्या सहकार्याध्यक्ष **मा. पुष्पाताई नडे** यांची संस्थेची माहिती देणारी अनुभवसंपन्न मुलाखत श्री. किशोर कुलकर्णी यांनी घेतली.

✻ स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक **श्री. विनोद मोरे** यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ समन्वयकपदी निवड झाली.

✻ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेच्या मुळशी तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत खुल्या गटात वर्गाच्या **कु. वेदिका विलास आंबेकर** हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

✻ माले नर्सिंग वर्गाच्या शिक्षिका दुर्गा केणी यांच्या मुलीला, **वैभवी केणी** हिला गुजरातमध्ये झालेल्या भारतीय पातळीवरील ज्युदो कराटे स्पर्धेत सुवर्णपदक मिळाले.

✻ शाखेचा नियमित वर्धक, युवक म्हणून सर्व जबाबदारी उत्साहाने घेणारा स्वामी श्रद्धानंद शाखेचा शाखापालक **प्रवीण पासलकर** सनदी लेखापाल परीक्षा (C.A.) उत्तीर्ण झाला.

९ नोव्हेंबर २०१९ ला सर्वोच्च न्यायालयाने रामजन्मभूमीची
संपूर्ण जमीन रामजन्मभूमीसाठी देण्यात यावी हा निकाल दिला.

# भावपूर्ण श्रद्धांजली

※ विज्ञान भारतीचे संस्थापक–सदस्य व वर्धिनीचे मार्गदर्शक **डॉ. वसंत अंबादास तथा दादा पुणतांबेकर** यांचे व त्यांच्या पत्नीचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

**डॉ. दादा पुणतांबेकर – एक हरहुन्नरी प्राध्यापक**

दादांचा आणि 'स्व'–रूपवर्धिनीचा स्नेह जुनाच ! तो अधिक दृढ झाला वर्धिनीच्या वास्तूत प्रयोगशाळा सुरू झाल्यावर. दादांना मुलांना शिकवायला आवडायचे. वर्धिनीचे विज्ञान शिबिर असो किंवा १० वी मार्गदर्शन वर्ग दादा आनंदाने सहभागी होत असत. महाविद्यालयात मोठ्या विद्यार्थ्यांना इंग्लीशमधून शिकवणाऱ्या प्राध्यापकाला लहान मुलांना मराठीतून विज्ञान शिकवणे आणि तेही मुलांना आवडेल असे हे कठीण होते. पण हे कठीण काम दादा अगदी सहज करीत असत.

वर्धिनीत जेव्हा प्रयोगांचे साहित्य आले तेव्हा दादांचा चेहरा उजळला. त्यावेळी दादा म्हणाले होते, ''आता विज्ञान शिकवताना खरी मजा येईल.'' दादा मग वेगवेगळे प्रयोग दाखवत भौतिकशास्त्रातील एकेक संकल्पना स्पष्ट करू लागले. मुलांना ती मेजवानीच होती. दादाही न थकता हा आनंद घेत होते.

प्रयोगशाळा स्थिरस्थावर झाली; अशातच १९९६ साल उजाडले. किशाभाऊ व दादांनी ठरवले की ह्या प्रयोगशाळेचा उपयोग पुण्याजवळील ग्रामीण भागातील मुलांनाही झाला पाहिजे. किशाभाऊंनी दादांना सांगितले, ''मी गाडी व ड्रायव्हरची व्यवस्था करतो, दादा तुम्ही शिक्षक तयार करा.'' दादांनी विज्ञान भारतीतील शिक्षकांना तयार केले. प्राज इंडस्ट्रीजने एक जीप दिली आणि दर शनिवारी विज्ञान भारती व वर्धिनीची फिरती प्रयोगशाळा मुळशी खोऱ्यात जाऊ लागली. दर शनिवारी दादा सर्वप्रथम येऊन उपकरणे बरोबर घेतली आहेत ना; ह्याची खात्री करून घेत. वाटेत दादा त्या दिवशीच्या प्रयोगाबरोबरच मुलांचे कुतुहूल जागवणारी कोणती माहिती सांगायची ह्याची चर्चा करीत असत. त्यामुळे आम्हा कार्यकर्त्यांची जडणघडण होत होती. पुढे मोठी गाडी मिळाल्यावर दादा आणि आम्ही आठवड्यातील पाच दिवस ग्रामीण भागात जाऊ लागलो. दादाही न थकता पाचही दिवस यायचे. त्यामुळे आम्हालाही वेगळी ऊर्जा मिळत असे. दादांनी ग्रामीण शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्गही घेतले.

अमेरिकेतून येताना त्यांनी वर्धिनीतील मुलांना शिकवताना उपयुक्त ठरतील असे काही वैज्ञानिक खेळ व मॉडेल्स आणली होती. त्या खेळातील वैज्ञानिक संकल्पना समजावून सांगताना दादा अक्षरशः मुलांमधलेच एक होत असत. चेहऱ्यावर एक विलक्षण आनंद असायचा. न कळत आमच्यातील एक शिक्षक घडत होता. त्यामुळेच आज २५ वर्षे फिरती प्रयोगशाळा कार्यरत आहे. ह्याच्या श्रेयात दादांचा वाटा मोठा आहे. 'स्व'–रूपवर्धिनी परिवार दादांचा नेहमीच कृतज्ञ आहे.

'स्व'–रूपवर्धिनीवर नितांत प्रेम करणाऱ्या दादा व वहिनींना वर्धिनी परिवारातर्फे आदरांजली.

– श्री. सुनील कुलकर्णी



२००१ मध्ये जगातील पहिल्या क्रमांकाची 'ऑल इंग्लंड मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा' पी. गोपीचंद यांनी जिंकली.

गेल्या वर्षात खालील सर्व ज्येष्ठ, सुप्रसिद्ध तसेच वर्धिनीच्या परिवारातील व्यक्तींच्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाले.

❊ भारतरत्न, स्वरसम्राज्ञी **लता मंगेशकर**

❊ पद्मश्री पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या **मा. सिंधुताई सपकाळ**

❊ सामाजिक कार्यकर्ते, लेखक, पत्रकार, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक, **डॉ. अनिल अवचट**

❊ पुणे शहर माध्यमिक शिक्षक संघटनेचे माजी उपाध्यक्ष व न्यू इंग्लीश स्कूल टिळक रोड या प्रशालेतील शिक्षक **श्री. शंकर दत्तात्रय दाबके**

❊ प्रसिद्ध उद्योगपती बजाज ग्रुप उद्योग समूहाचे चेअरमन, पद्मभूषण **राहुलकुमार बजाज**

❊ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ चित्रकार **श्री. रवी परांजपे**

❊ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि भारतीय शिक्षण मंडळाचे अखिल भारतीय संघटन मंत्री **श्री. विनायकराव कानेटकर**

❊ मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री **श्रीमती हीराबेन मोदी**

❊ आमदार श्री. महेशदादा लांडगे यांच्या मातोश्री **श्रीमती हीराबाई लांडगे**

❊ वर्धिनीचे हितचिंतक श्री. सुनीलबुवा तापकीर यांचे वडील **ह.भ.प. भाऊसाहेब तापकीर**

❊ वर्धिनीचे देणगीदार **श्री. यशवंत पटवर्धन, श्री. पद्माकर वझे, श्री. बंडोपंत साठे**

❊ समर्थ रामकृष्ण शाखेचे युवक श्री. अक्षय भेगडे यांचे वडील **श्री. गोरख (आप्पा) भेगडे**

❊ 'स्व'-रूपवर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या डॉ. सौ. मनीषा नारकर यांच्या आई **श्रीमती तारामती नरेंद्र बोईन**

❊ वर्धिनी युवती विभाग प्रमुख सौ किरण भट्टड यांचे वडील, माहेश्वरी बालाजी मंदिराचे माजी कोषाध्यक्ष **श्री. जसराज काळूराम राठी**

❊ वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. मयूर शेडगे यांच्या आजी **श्रीमती जनाबाई राघोबा शेडगे**

❊ वर्धिनीच्या कार्यकर्त्या श्रीमती बागेश्री पोंक्षे यांच्या आई **सौ. मंदा मोहन गोखले,** सासूबाई **श्रीमती शोभना दत्तात्रय पोंक्षे व** दीर **श्री. शिरीष दत्तात्रय पोंक्षे**

❊ वर्धिनीचा कार्यकर्ता निखील लोणकर याचे आजोबा **श्री. सूर्यकांत तुळशीराम लोणकर**

❊ वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. सुनील व अनिल भरतिया यांचे वडील **श्री. रतिलालजी भरतिया**

❊ वर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र व परेश शहा यांचे वडील **श्री. कांतीलाल शहा**

❊ स्वामी दयानंद शाखेचा युवक **कु. ओंकारेश्वर गौतम वाघमारे** याचे अपघाती दुःखद निधन झाले.

**वर्धिनी परिवार वरील सर्व कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभागपालक–श्री. विनोद बिबवे ✆ : ९८५०८९०८२२** **युवा विभागपालक–श्री. अमोल उंदरे ✆ : ९८२२८४४१६९**
**शाखा विभागप्रमुख–श्री. शुभम जगताप ✆ : ९७६३४७१३७२** **युवा विभागप्रमुख–श्री. चेतन कुसाळकर ✆ : ९८८११४४९६१**

**शाखा विभाग समन्वयक – श्री. तुषार काब्दुले ✆ : ९९२११२३०२३५**
**युवा विभाग सचिव – श्री. आकाश देशमुख ✆ : ७७९८११६९६३**
**केंद्रीय निर्माण शाखाप्रमुख –श्री. रोहन देशमुख ✆ : ७२१८२४२२२३**
**केंद्रीय प्रेरणा शाखाप्रमुख – श्री. सचिन सनगरे ✆ : ९८६०५०३१९४**

## भाग १ (पूर्व शहर विभाग)

**भागप्रमुख : श्री. रोहित धायरकर ✆ : ८३७८८३६६०८** **भाग युवाप्रमुख : श्री. राज जाधव ✆ : ९९७०५८५९७५**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **समर्थ रामकृष्ण शाखा** | बाबुराव सणस कन्याशाळा, २२/१, मंगळवार पेठ, पुणे – ११. | **कु. शंतनु घारे** ✆ : ९२८४८६४८३० | **श्री. तुषार मुढे** ९८२२८२२८९० |
| **स्वामी योगानंद शाखा** | एम. ई. एस. भावे हायस्कूल, (पेरुगेट) सदाशिव पेठ, पुणे – ३० | **कु. यश दुधभाते** ✆ : ७३८७९१५६५३ | **श्री. विनीत तांदळेकर** ९०२८८०९८८२ |
| **स्वामी श्रद्धानंद शाखा** | म. गांधी विद्यालय घोरपडे पेठ, पुणे – ४२ | **कु. सिद्धेश बलवार** ✆ : ८३२९९१४७४२ | **श्री. संदीप जगधने** ९१३०२८४८३५ |
| **वीर अभिमन्यू बालशाखा** | 'स्व'–रूपवर्धिनी वास्तू २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ११ | **कु. सागर मोहिते** ✆ : ९११९५०८१८९ | |

## भाग २ (बिबवेवाडी विभाग)

**भागप्रमुख : श्री. किशोर बेंडगे ✆ : ९८३४७३४३३४** **भाग युवाप्रमुख : श्री. चेतन ठाकरे ✆ : ८८८८६५०५८७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी अखंडानंद शाखा** | सीताराम आबाजी विद्यालय, बिबवेवाडी, पुणे – ३७ | **कु. श्रेयस खंडाळे** ✆ : ८०१००१५३७२ | **श्री. तुषार काब्दुले** ९९२११२३०२३५ |
| **स्वामी दयानंद सरस्वती शाखा** | प्रियदर्शनी शाळा, व्हीआयटी शाळेशेजारी, बिबवेवाडी, पुणे ३७ | **कु. आदित्य दिवटे** ✆ : ९६८९९३२११२ | **श्री. प्रतिक कडू** ८२३७०६०७०१ |
| **ओंकार शाखा** | ओंकार ट्रस्ट, गुजरवाडी कात्रज, पुणे ४६ | **श्री. संदीप चौगुले** ✆ : ९०९६९११२७० | |

## भाग २ (पद्मावती विभाग)

**भागप्रमुख : श्री. अजय रायकर ✆ : ८३२९१६६४५६** **भाग युवाप्रमुख : श्री. चेतन ठाकरे ✆ : ८८८८६५०५८७**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी शिवानंद शाखा** | वि. स. खांडेकर शाळा,<br>सहकारनगर, पर्वती, पुणे-९. | **कु. व्यंकटेश भालके**<br>✆ : ७४४७८२२७१३ | **श्री. आशुतोष कांबळे**<br>७३५०५३४०९१ |
| **धर्मवीर शंभू राजे शाखा** | प्रेरणा माध्यमिक विद्यालय,<br>गणेश चौक, आंबेगाव पठार, पुणे ४६ | **श्री. अक्षय ठोकरे**<br>✆ : ९६५७८८३०४ | **श्री. संदेश मनवल**<br>९७६२५७७३२३ |

## भाग ३ (कर्वेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. सतीश बिराजदार ✆ : ७०५७८७४६७०** **भाग युवाप्रमुख : श्री. अक्षय मुळे ✆ : ८०८७१७९४९४**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी सुबोधानंद शाखा** | पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यालय,<br>एरंडवणे गावठाण, पुणे - ५२ | **कु. गौरव शेडगे**<br>✆ : ८०१०४९३०६७ | **श्री. ऋषिकेश भागवत**<br>७४४८२२६५४२ |
| **राजर्षी शाहू शाखा** | सम्राट अशोक विद्यालय,<br>कर्वेनगर, पुणे - ५२ | **श्री. पुष्कर सागडे**<br>✆ : ७७१९८१६२८८ | **श्री. अक्षय मुळे**<br>८०८७१७९४९४ |

## भाग ३ (सिंहगड रोड विभाग)

**भागप्रमुख : श्री. मुरली गायकवाड ✆ : ९६८९८१०६९२** **भाग युवाप्रमुख : श्री. अनिकेत जावलीकर ✆ : ९३२५१६१२३४**

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| **स्वामी ब्रह्मानंद शाखा** | म.न.पा. शाळा क्र. १६८,<br>हिंगणे खुर्द, पुणे - ५१ | **कु. ओम इजंतकर**<br>✆ : ७६६६४६३०१३ | **श्री केतन खेडकर**<br>८३९०१४१५०३ |
| **नरवीर तानाजी मालुसरे शाखा** | बंडुजी खंडुजी विद्यालय,<br>धायरी. पुणे-४१ | **कु. आशीष सावंत**<br>✆ : ७५०७४३८१८४ | **श्री. रोहित शिंदे**<br>७८८७६३४४१४ |
| **जनता वसाहत वस्ती** | सीताराम जावळे प्राथमिक शाळा,<br>जनता वसाहत, पुणे-९ | **कु. गणेश वनमाने** | |

## भाग ४ (गोखलेनगर विभाग)

**भागप्रमुख : श्री. अक्षय कदम** ✆ : ८४०८८२६९९५ **भाग युवाप्रमुख : श्री. सागर मोहिते** ✆ : ८६९८०१९६०९

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवा प्रमुख |
|---|---|---|---|
| स्वामी विवेकानंद शाखा | रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय पांडवनगर, वडारवाडी, पुणे-१६ | कु. सुदीप सुभेदार ✆ : ९८९०२७१९७७ | श्री. चेतन धोत्रे ८३९०१९०३८७ |
| स्वामी अभेदानंद शाखा | वीर बाजीप्रभू विद्यालय गोखलेनगर, पुणे - १६ | कु. विजय चव्हाण ✆ : ८४८२८३९२२७ | श्री. राहुल इंगळे ७७९८४७७१२३ |

## भाग ५ (वर्धिका विभाग)

**भागप्रमुख : कु. दिव्या घारे** : ८७८८४२७९७६ **युवती प्रमुख : किरण भट्टड** : ९८५००३४६७४

| शाखा | पत्ता | शाखाप्रमुख | युवती प्रमुख |
|---|---|---|---|
| भगिनी निवेदिता शाखा | आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११ | कु.योगिता जिरेसाळ ✆ : ९३५९९३६५७० | कु. पायल जिरेसाळ ८६००१९५३२३ |
| क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शाखा | महर्षी शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२ | कु. सुमेधा लोधा ✆ : ७४९९०६९३७७ | कु. प्राजक्ता कांबळे ७८७५५८०१७२ |

**शाखा संपर्काच्या वेळा :** सोमवार ते शुक्रवार - सायं. ६ ते ८.३०, शनिवार- दु. ४.३० ते ७.३०, रविवार- स. ७.३० ते १०.३०

## उत्थान विभाग

**विभाग पालक** – **श्री. संदीप मोरे** ✆ ९९२२२४८७८३
**विभाग प्रमुख** – **श्री. उमेश माळेकर** ✆ ९६८९२४५९६५
**विभाग समन्वयक** – **श्री. विठ्ठल शिंदे** ✆ ७०६६२१२४५६

कसबा भाग प्रमुख
कु. पूर्वा भिडे
९५४५०३६३२३

महात्मा फुले
भाग प्रमुख
कु. पायल शहा
९१७२६५२११९

लष्कर, भवानी
भाग प्रमुख
कु. मृणाल सुतार
७४९९९६९९७८

कोरेगाव पार्क
भाग प्रमुख
कु. अनिल काळे
८६००१६०५८६

## ✻ शारदामणि महिला विभाग ✻

महिला विभाग पालक – **श्रीमती पुष्पाताई नडे** ✆ : ९८२२८२३७५७

महिला विभाग प्रमुख – **सौ. मंजूषा कुलकर्णी** ✆ : ९८५०२०८००९

महिला विभाग सहाय्यक – **सौ. सुनिता गंगावणे**

'पाकोळी' बालवाडी प्रमुख – **सौ. राणी काळे**

बचतगट समन्वयक – **सौ. वनिता जगताप**

## ✻ उद्योगशिक्षण वर्ग ✻

| | | |
|---|---|---|
| रुग्ण सहाय्यक (पुणे वर्ग) | – | **सौ. लता सत्तूर, कु. अतिशा भोसले** |
| रुग्ण सहाय्यक (माले वर्ग) | – | **सौ. दुर्गा केणी, सौ. साधना सातपुते** |
| शिवण वर्ग (पुणे) | – | **सौ. संगीता पाटील, श्रीमती मनीषा कुलकर्णी** |
| प्रौढ साक्षरता वर्ग | – | **श्रीमती सुगंधाताई कबीर** |

### ✻ कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, चऱ्होली ✻

श्री. निशिकांत भालेकर मो. ८४४६३३१५१३, श्री. मिलिंद दाते मो. ८६०५९८६२७३

श्री. चारुता कडूरकर मो.९२२५५०२१७१, कु. सुहानी भोसले मो. ९२८४८४४७०५

## ✻ प्रकल्प व संपर्काच्या वेळा ✻

| **✻ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र** | **✻ अभ्यासिका केंद्र** | **✻ ग्रंथालय** |
|---|---|---|
| श्री. बापू शिंदे | श्री. निखिल गोरखे | श्रीमती नीला कुडलिंगार |

### ✻ विज्ञान व तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा

पालक – श्री सुनील कुलकर्णी ✆ : ९६०४०१६७१५

विभागप्रमुख – श्री. विश्वास कुलकर्णी ✆ : ८६००१०१३०७

## ✻ विस्तार विभाग ✻

**शाखा उपक्रम – वर्धिनीची उपकेंद्रे**

✻ लक्ष्मीकेशव प्रतिष्ठान, सातारा ✻ फुले नगर प्रयत्न शाखा, नाशिक

**रुग्ण सहाय्यक वर्ग**

✻ भगिनी निवेदिता प्रतिष्ठान, सांगली

**संपर्काच्या वेळा**

सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.००

भारताच्या कर पद्धतीत १ जुलै २०१७ पासून 'वस्तू आणि सेवा कर' (जीएसटी) लागू होऊन क्रांतिकारक सुधारणा झाली.

## ✻ असे उपक्रम... असे तास... असे दिवस ✻

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत**

१) बालवाडी : सकाळी ९ ते दुपारी १

२) अभ्यासिका : सकाळी ६ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते दु. ४ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योगशिक्षण वर्ग : दुपारी १२ ते ४

२) साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते २

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखा विभाग : सायं. ६ ते रात्री ९

२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८

३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

पहाट कातकरी प्रकल्प – दर रविवारी ✻✻✻✻

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प✻

२) अभ्यासिका

३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी

२) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

३) साक्षरता वर्ग

४) रुग्ण सहाय्यक वर्ग

५) शिवण वर्ग

६) बचतगट

७) कुटुंब सल्ला केंद्र

८) वस्ती विकास प्रकल्प – 'उत्थान'✻✻✻

९) फिरती प्रयोगशाळा /ग्रामविकास प्रकल्प ✻✻

१०) अभ्यासिका केंद्र

✻ हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.

✻✻ हा प्रकल्प पुणे व परिसरातील ४० शाळांमध्ये चालतो.

✻✻✻ कसबा, भवानी, सोमवार व मंगळवार पेठ येथील वस्तींमध्ये संध्याकाळी.

✻✻✻✻ रविवार पूर्ण दिवस मुळशी तालुक्यातील गावांमध्ये चालतो.

उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत नियोजित वेळेत चालतात.

**समुपदेशन विभाग – सौ. मेघा नगरे**

### कार्यालय विभाग

श्री. शिवयोगी कुपस्थ, श्रीमती प्रगती तांबट,

श्री. चंदन डाबी (समन्वयक – निधी संकलन),

श्री गणेश जसवंते (अंतर्गत लेखापाल).

**कार्यालय –** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११०११

मो. : ९०११३८६३८६

**संपर्क –** सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०



भारताने २०२२ मध्येच अक्षय ऊर्जा निर्मितीचं २०३० साठी आखलेलं उद्दिष्ट साध्य केलं आहे.

# प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास–यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती–ध्यास हा ।। ३ ।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे, ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

स्वातंत्र्योत्तर काळात बाबा आमटे व कुटुंबीय, ईलाबेन भट, सुंदरलाल बहुगुणा, चंडीप्रसाद भट्ट, अण्णा हजारे, कैलास सत्यार्थी, राजेंद्र सिंह, डॉ. अभय व राणी बंग अशा सर्वांनी समाजसेवेत योगदान दिले.

Mahendra P. Oswal

**Cell : 9822028189**

M/s. D. Pratap

Iron Merchants & Suppliers

1196, Bhawani Peth, Pune - 411 042

**Ph. : 26383585, 26383595**

**Resi. : 24264847, Fax : 26388607**

**E-mail : dpratap.oswal@gmail.com**

**With Best Compliments From -**

CHEM-TECH

***M/s. Chemtech Laboratories Pvt. Ltd.***

**Testing-Laboratory for Oils, Fuels, Rubber, Plastics & various other chemicals**

Off. No. 501 to 504, Rajdhani Complex,
Pune-Satara Road,
Near Shankar Maharaj Math, Pune - 411009.
Tel. : 020-24366994/24377515, Telefax : 24366996
Email : chemtechlabs@yahoo.com

# संपदा सहकारी बँक लि., पुणे.

**मुख्य कार्यालय** : ७१७ बुधवार पेठ, डि.आय.सी. बिल्डींग, कसबा गणपती मंदिराजवळ, पुणे ४११ ००२.

**फोन नं.** : (०२०) २४४९३२६१, २४४५१८३०, २४४५९७०८

**ई-मेल** : headoffice@sampadabank.com

**वेब साईट** : www.sampadabank.com

## सदा सर्वदा संपदा !!

*"सेवेतून संपन्नता" हे ब्रीद बाळगणारी बँक..*

## संपदा सहकारी बँक !

मोबाईल ॲप, ए.टी.एम., डेबिट कार्ड इ. अद्ययावत सेवा सुविधांसह

*संपदा बँक आपल्या सेवेत!*

* सर्व कर आणि जी.एस.टी. भरण्याची सुविधा *

* आकर्षक कर्ज योजना *

कर्जावर किमान व्याजदर, वेगवान कर्ज मंजुरी !!

* सुस्मित ग्राहकसेवा *

*आजच आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा,अथवा बँकेच्या वेबसाईटला भेट द्या.*

| गिरीश सरदेशपांडे | सी.ए. महेश लेले | सी. ई. अश्विनीकुमार उपाध्ये |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |



*With Best Compliments From*

# M/S KBC Systems

- Cold Storage and Refrigeration Engineers
- Manufactures of Surface Coating Systems
- Authorized Distributor for TTK Healthcare Ltd.
- Panipuri and other Fryums product for Maharashtra

**Vijay Bane**
9422301700

**Satish Chapekar**
9422031071

# CHIRRANTAN

2, Swaroop Apartment, Bhigwan Road, Baramati, Dist. Pune | **M. : +91 9422503047**

Advance & Specialized technologies in Water & waste water treatment

**- V Wire under Drain Systems**
**- Rapid Gravity Sand Filters**
**- Screening Solutions**
**- WTP Strengthening, Coating and Augmentation**
**- Water Distribution Pump and Piping**

***We Design, Construct and Operate***
Water treatment Plants
Sewage treatment Plants
Effluent Treatment Plants
Pressure Filters
Distribution piping and pumping

***Expertise Services***
Plant augmentation & up-gradation
Operation & Maintenance Services
Trouble shooting Services for small & big treatment Plants
Specialty Chemicals & Consumables

**Contact - Email : chirrantan.baramati@gmail.com**
**Contact : 9765822950, 7083139790**



LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## Rahul Parkhi

Member Divisional Manager's Club

Agents Code No. : 32036 953

## LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

**Off. :** Br. No. 953, Camp, Aditi Complex, 2-Floor, G.T. Road, Pune - 411001

**Resi. :** Welcome City, A 2/303, Sukhsagar Nagar No. 2, Katraj, Pune 411046

**Tel. : (M) 9822478707, 9881493006**

**E-mail : insure.with.rahul@gmail.com**

# Om Driving School

**- Proprietor of Om Driving School -**

**Sachin Chavan - 9766373737, 9822840420**

**-: My Office Add. :-**

Gera Landmark, Shop No. 12A, Near ICICI Bank or Irani Cafe, Opp. Kalyani Banglow, Kalyaninagar, Pune - 411006

**Bibwewadi Branch -** Hill View Terrace, Shop No. 4, Behind Maruti Mandir, Bibwewadi Gaonthan, Pune 411 037 Mobile : 9860605757 (Nitin Chavan)

**-: My Services :-**

● Individual Attention ● Safe Driving Techniques and Technical know how of functioning of vehicle ● Reasonable Rates ● One month course, Daily 5 kms per day (Sunday Off) ● All Type training like Highway, Slow and Fast driving, slope driving, Heavy Traffic, U Turns, Night driving, Parking etc.

**ALL TYPE RTO WORKS DONE.**

**Nitin Chavan - 9860605757**



**❊ सर्व प्रकारचे कर वेळेवर भरा ❊ देशाच्या उन्नतीमध्ये पुढे व्हा ❊ देशाचे सच्चे नागरिक बना**

# व्यापारी मित्र

व्यापारी, उद्योगपती, चार्टर्ड अकौंटंट, कर सल्लागार, करदाते, दिवाणजी, कॉलेज विद्यार्थी, सहकारी संस्था, पतसंस्था, कर अधिकारी, कॉलेज व सर्वसामान्य व्यक्ती इ. मध्ये लोकप्रिय असलेले

**१९५० पासून नियमित प्रकाशित होणारे व्यापारी मित्र**

**– मासिकातील नेहमीची सदरे –**

१) व्यापारी बंधूंनी घ्यावयाची दक्षता २) आयकर, जीएसटी, कायद्याचा सल्ला, न्याय-निवाडे, दुरुस्त्या ३) अन्य कायदे निर्णय ४) विविध कायदे विभाग ५) आरोग्य विभाग ६) व्यवस्थापन-यशस्वी लोकांचे जीवन दर्शन

**मासिकाची वार्षिक वर्गणी रुपये ७००**

**सवलतीची योजना –** २ वर्षे – १३०० रुपये, ३ वर्षे – १९०० रुपये

वर्गणी रोख, मनिऑर्डर, एनईएफटीने अथवा ॲटपार चेकने भरावी

वर्गणी पुढील नावाने पाठवावी – **व्यापारी मित्र पब्लिकेशन्स प्रा. लि.**

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, शामराव कलमाडी हायस्कूलसमोर, **पुणे ४११ ००४**

**फोन : ०२०-२५४३ १०९४/४१२६ ७३६०, ९४२१८ ८०२९०**

**E-mail :** sampadak@vyaparimitra.com, **Website :** www.vyaparimitra.com, **Facebook :** vyaparimitra

**❊ आपल्या मित्रांना 'व्यापारी मित्र' वार्षिक भेट म्हणून पाठवा ❊ व्यापारी मित्रातील माहिती जुनी होत नाही. सर्व अंक सांभाळून ठेवा.**

# नील इंजिनियर्स

सिव्हील इंजिनियरींग, *Construction*
वॉटर अॅण्ड एनर्जी मॅनेजमेंट सर्व्हिसेस

**श्री पराग लकडे**
फोन नं. ९४२२००११७४, ९८२२११७९३१

751, Kasba Peth,
Sattoti Chowk,
Pune 411 011



## ENERGY CONSERVATION
**IT DOESN'T COST MUCH.BUT IT SAVES MORE.**



ANSHA ENERGY SYSTEMS

: Our Products :
Solar On Grid Systems (NET-METERING)
Solar Off Grid Systems | Solar Hot Water Systems
Solar Pumps | Solar Street Lights

**CONTACT : +91 9028578015**
anshaenergy@gmail.com



## शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी आता मदत जनता बँकेची!



जनता
**एज्युफ्लेक्स**
कर्ज योजना

**शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज**

| देशांतर्गत शिक्षणासाठी | परदेशी शिक्षणासाठी |
|---|---|
| ₹ 20* लाख | ₹ 40* लाख |

*अटी लागू

**आकर्षक व्याजदर**

**जनता सहकारी बँक लि., पुणे**
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.janatabankpune.com

**Best Compliments From -**

# M/s. Baldota Samal & Asso.

"Krutanjali" Shangrila Restaurant Lane,
65/20, Erandavana, Law College Road,
PUNE - 411 004

**Contact**

**Tel. : 2543 3000 / 3200**

**Mobile : 99223 - 00044**

With Best Compliments From

# CADMOSIL CHEMICALS PVT. LTD.

(Mfg. of Photo Resists & Allied Chemicals)

**A-58, MIDC-Latur**

**Latur 473531.**

**www.imagetechindia.com**

With
Best Compliments
from

**JAYASINH V. MARIWALA**

**TRUSTEE**

**THAKKAR K. M. BHATIA NIWAS &**

**THAKKAR V. CHAWL TRUST**

## WITH BEST COMPLIMENTS FROM : DEODHAR GROUP

### PRODUCT COATING

*An ISO 9001 : 2008 Certified Company*
*Manufacturing & Supply of*
*Resin coated sand,*
*shell cores & core assemblies*

### DECENT DECORATORS

*For Quality Coatings*
*Industrial and Decorative*
*painting contractors*
*Civil Engineers & Contractors*

### JANSEVA BHOJANALAYA

*Maharashtrian Dining Hall*

### MEHFIL CATERING SERVICES

**Vrindavan Banquet Hall**
*Two Marriage Halls with*
*Ample Parking Space*

### RAMRAI

*Farming, Horticulture, Nursery*

**Chinchwad Office :** Plot No. 81, D-III Block, MIDC, Chinchwad, Pune 411019.
Telephone : 27473730, Web : decentdecoratos.com
Email : product_coating@yahoo.com,
decentdecoratorspune@gmail.com

**Pune Office :** 759/55, B, Deccan Gymkhana, Pune 411004
Telephone : 25678217, 25679488, Fax : 25679497


प्रति,

______________________

______________________

______________________


हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक श्री. प्रफुल्ल कुलकर्णी, प्रबोध संपदा, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून व प्रकाशक श्री. विश्वास विनायक कुलकर्णी यांनी २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११ येथे प्रसिद्ध केले.